मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

वर्ष १०


अंक ७

आक्टोबर १९५५

संपादक :

दि. व. पंडित

श्री. विनोबाजी खास अंक



अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

संपादकीय ....

उपनिषदथर्व्याख्या : ६ कठोपनिषद – डॉ. के.ल. उर्फ भाऊजी दफ्तरी ....

गुरु-माउली विनोबा – कुन्दर दिवाण ....

आधुनिक उपनिषदकार विनोबा – श्रीनिवास नारायण बनहट्टी ....

महाराष्ट्राचे विचारधन ....

विनोबांची गीताई आणि गीताप्रवचने – आ. प्र.के. अत्रे ....

पूज्य विनोबा – मा.ज. कानेटकर ....

विनाशाकडून शाश्वत सौख्याकडे – प्रा. गो.स. कामत ....

विनोबाजींचा भारतीय संस्कृतीचा पायाशुद्ध प्रचार – शि.व्यं. याळगी ....

भूदानयज्ञ-अभिनंदन – कृ.ना.देशपांडे ....

विनोबा – पु.य. देशपांडे ....

गांधी आणि विनोबा – लक्ष्मीनारायण भारतीय ....

भूदानाचे अर्थशास्त्र – प्रा. म.अ. चान्सरकर ....

संघवार्ता ....

वि. सा. संघाचें मुखपत्र

युगवाणी

संपादक :
श्री. दि. ब. पंडित

संपादक मंडळ :
डॉ. ना. के. महाजन
श्री. तु. ना. काटकर
श्री. म. अ. चान्सरकर
श्री. मा. नी. गलगलीकर
श्री. रा. ना. घाटोळे

वर्ष १० वें : अंक ७ वा

आक्टोबर १९५५

संपादकीय

युगवाणीचा हा विनोबा विशेषांक. आमच्या भाग्याने ह्या वर्षी विनोबाजींची षष्ट्यब्दपूर्ति झाली असें आम्हीं मागे एकदा लिहिलें होतें. भाग्य एवढ्याच साठी म्हणायचें की विनोबाजीसारखे लोकोत्तर पुरुष युगायुगाचें लेणें असतें आणि प्रत्येकाच्या आयुष्यांत षष्ट्यब्दपूर्ति एकदाच व्हावयाची असते. तो योग आमच्या संपादन-कालांत आला ह्याची उपपत्ति 'भाग्य' शब्दाविना अन्य प्रकारें कशी लावायची !

लोकोत्तर पुरुषांची परंपरा इतिहासांत कधीच खंडित होत नाही. पण त्यांतहि कांहींचें जीवन अलौकिक असतें. ज्यांची लोकोत्तरताहि अलौकिक अशा महापुरुषांपैकी विनोबाजी एक होत. असे एक एकाकी नसले तरी अनेकहि नसतात.

महात्माजींनी हृदयपरिवर्तनाचें तत्त्वज्ञान प्रत्यक्ष प्रयोगानें आपल्या जीवनाचा श्वास करून सोडलें होतें. श्वास देहपातानें वातावरणांत विरून गेला, पण तत्त्वज्ञान मात्र विनोबांच्या रूपानें साकार झालें. नाही तर धनमद असलेल्यांना धनीपण सोडायला तत्पर करणारा त्यांचा शब्द अवरुद्धच राहिला असता.

माणसाला अखेर साडेतीन हात जमीन पुरेशी होते हें कौण्ट टॉल्स्टायने आपल्या अमरकथेंत नमूद करून ठेवलें असलें तरी शेवटीं आपल्याला भूमातेच्याच कुशीला जायचें आहे, हें माणूस विसरलेला असतो. विश्ववंद्य सीतामाईलाहि अगतिक होईपर्यंत हें उमजलेलें नव्हतें, तेथे इतरांची काय कथा? म्हणूनच माणसाला हव्यासाने ग्रासलेलें असतें. This world is but a bridge. Pass thee over it, but not build upon it हा ईसा मसीहाचा संदेश ध्यानीं रहात नाही. मनुष्य तेथेच कायम वस्तीला रहाणार अशा आवेशाने मनोरे उभारतो. त्यासाठी झगडतो, धडपडतो. ह्या धडपडींत त्याला आपल्याच नव्हें तर साऱ्या जीवसृष्टीच्या नियतीचा विसर पडलेला असतो.

हें विस्मरणहि वावगें नाही. मृत्यूचें संतत स्मरण म्हणजे सदैव मरत रहाणें. मृत्यूवर मात करून अमृतत्वाची प्राप्ति हें मानव वंशाचें ध्येय. वाईट एवढेंच की माणूस आपल्या मृत्यूला विसरतो ह्याचा अर्थ तो मृत्यूच्या भयांतून मुक्त होतो असा होत नाही. तो भयसंकुलच रहातो. त्याच्या मनांत मृत्यु डोकावत नसला तरी

अनुक्रमणिका

मरण त्याला समीप वाटतें. ही समीपता किती ह्याचा त्याच्या अल्पदृष्टीला अंदाजच येत नाही. म्हणून तो मृत्यूच्या भयांतून मुक्त होत नाहीच; उलट त्याला जीवनच भयावह वाटूं लागतें. पुढच्या क्षणाची भीति वाटते म्हणून तो प्रचलित क्षणाला चिकटूं पहातो. आणि तेव्हांहि त्याला भीति सोडत नसल्याने तो कांचनाश्रयी बनतो. आणि असें करीत असतां तो इतरांना निष्कांचन करीत असतो.

त्याची ही चूक त्याला उमजत नाही म्हणून ती समजावून सांगावी लागते. कांचन मुक्ति ही मोक्षाची, अमृतत्वाची साधना होय, हा संदेश त्याला द्यावा लागतो. हा संदेश देशाच्या कोपऱ्या कोपऱ्यांत विनोबांनी आपल्या शब्दांनी प्रसृत केला. आपल्या जीवनांत त्यांनी तो आचरला, पारखला, रुजवला आणि मग तो जगासमोर मांडला. संदेश जीवनांत स्फुरत असतो, त्या स्फुरणाची सुस्पष्ट जाणीव झाली की प्रज्ञा उजळून निघते. प्रज्ञेचा प्रकाश दुरितांचें तिमिर हरण करीत असतो. ज्यांची प्रज्ञा अशी प्रकाशमान् असते ते अवतारी पुरुष असतात. त्यांच्या प्रज्ञेची दीप्ति अढळ ध्रुवताऱ्याप्रमाणे समाजाच्या नौकेला दिग्दर्शन करीत असते. ह्या ध्रुवावर ज्याचा डोळा स्थिर झाला त्याला [illegible]राचाहि प्रवास अवघड नाही.

विनोबांची प्रज्ञा अशी दीप्तिमान् होईपर्यंत त्यांची जी साधना चालू होती, त्यांचें जें चिंतन-मनन चाललें होतें, त्यांच्या ज्या कांही आंतरिक प्रक्रिया होत होत्या, त्या सगळ्यांची नोंद त्यांच्या वाङ्मयांत झालेली आहे. विनोबा अपूर्व म्हणून त्यांची शैली अपूर्व, त्यांचें वाङ्मय अपूर्व. तुम्हा आम्हासारख्यांच्याच जड शब्दांत अशी तरल भावसंपदा कुठून येते, ते मूढ शब्द ज्ञानाने साजून कसे दिसतात, त्या उथळ उच्चारांत कल्पनांची गाढता कशी पैदा होते? वाऱ्यावर तरंगणारा अरळ शब्द कल्पना, ज्ञान, भाव ह्यांनी संपृक्त होऊन चिरंजीव कसा बनून जातो?

हे सारे प्रश्न आम्हासारख्या लहान माणसांना स्तिमित करून सोडतात. उत्तर गवसत नाही. 'ठावो न पवता जयाचा। मनेंसीं मुरडली वाचा। तो देवो होय शब्दाचा। चमत्कारु ॥' असें म्हणून तृप्ति होत नाही. साक्षात् देव शब्दसौंदर्याचा अवतार घेऊन आम्हापुढे ठाकल्यावर हा निव्वळ चमत्कार म्हणून समाधान कसें व्हावें? ह्याचा तपास करावा, शोध घ्यावा, प्रश्नप्रतिप्रश्न विचारावेत, जिज्ञासेला खिजवावें, विचक्षणेला उद्दीपित करावें, तिला थकेपर्यंत स्वस्थ होऊंच देऊं नये, शेवटीं ती थकली, पांगुळली आणि तिला ग्लानि आली की तिच्या पापण्यावर फुलपाखराच्या पंखानें अवतरणाऱ्या निद्रेच्या तंद्रीचा आस्वाद घ्यावा, अशी सहाजिकच इच्छा होते. ह्या तंद्रेलाच समाधि-सुख म्हणत असतील कां?

हें सुख आम्हाला लाभावें आणि युगवाणीच्या वाचकवर्गाला तें रुचत असल्यास त्यांनाहि मिळावें म्हणून ह्या खास अंकाचा प्रपंच केला. प्रपंच करणेंहि सोपें नाही. भातुकलीचा खेळ खेळणाऱ्यांनी अफाट प्रपंचाची अपेक्षा करणें म्हणजे टिटवीनें अफाट सागरीं चांचुवरी माप सुणें होय ह्याची जाणीव आम्हाला आहे. पण आम्हावर प्रेमा असणाऱ्यांच्या आश्रयानें हें काम तडीला जाईल अशा विश्वासानें आम्ही ह्या कार्याचा अंगीकार केला. थोरांवर ठेवलेली श्रद्धा व्यर्थ नसते हा नित्याचा अनुभव आम्हांला ह्याहि वेळीं आला. त्यांच्या कृपाप्रसादाचें हें फळ ह्याला प्रपंच म्हणायचें की भातुकली म्हणायची हें आम्ही कोण ठरवणार? प्रपंच म्हणा वा भातुकली म्हणा आम्हाला संतोष आहे. आम्ही आनंदाने गाणारच, 'चंपाने आणली कांदाभाकर। गंगाने आणली दहीसाखर। भातपिठलें शंकरचें। केळीं आंवे संपतचे। पंगत बसली। पंगत झाली। अंगतपंगत छान झाली ॥'

ह्या चंपादि साऱ्या सुहृदांचें संपादकमंडळ फार फार आभारी आहे. पण विशेष उल्लेख करायला हवा श्री कुंदर दिवाणांचा. ह्या अंकांतील किती तरी साहित्य त्यांच्याच कृपेने आम्हाला उपलब्ध झालें आहे. युगवाणीच्या ह्या विशेषांकाचें श्रेय आमचें नाही. आमचें श्रेय येवढेंच आम्ही आमच्या सुहृदांना प्रीतीयोग्य वाटतों.

—संपादक

अनुक्रमणिका

क ठो प नि ष द्

डॉ. के. ल. ऊर्फ भाऊजी दफ्तरी

वल्ली तिसरी

वल्ली ३ श्लोक १-२—

ऋतं पिबंतौ सुकृतस्य लोके ।
गुहां प्रविष्टौ परमे परार्धे ॥
छायातपौ ब्रह्मविदो वदंति ।
पंचाग्नयो ये च त्रिणाचिकेताः ॥१॥
यः सेतुरीजानानां अक्षरं ब्रह्म यत्परम् ।
अभयम् तितीर्षतां पारं नाचिकेतं शकेमहि ॥२॥

पहिल्या श्लोकाचा अन्वयः—पंचाग्नयो ये च त्रिणाचिकेताः ते ब्रह्मविदः सुकृतस्य लोके ऋतं पिबंतौ छायातपौ गुहां परमे परार्धे प्रविष्टौ (इति) वदंति। असा अन्वय करण्याचें कारण असें आहे की मागील वल्लींतील शेवटच्या श्लोकांत जो प्रश्न आहे त्यास उत्तर ह्या श्लोकांत आहे असें मानून ह्या श्लोकाचा अन्वय व अर्थ केला पाहिजे. इतरांनी "परमे परार्धे गुहां प्रविष्टौ ऋतं पिबंतौ, छायातपौ (इति) वदंति" असा अन्वय केला आहे तो अग्राह्य आहे.

अर्थ—पंचाग्नि धारण करणारे आणि तीन नाचिकेत अग्नि धारण करणारे ब्रह्मवेत्ते म्हणतात की "सुकृत करावयाच्या ह्या लोकांत [सुकृतस्य लोके] सत्कर्मापासून उत्पन्न होणाऱ्या आनंदाचा अनुभव घेणारे [ऋतं पिबंतौ] सूर्य व त्याचें सूर्यकांत मण्यांतून पडणारें प्रतिबिंब ह्यासारखे असलेले [छायातपौ] ईश्वर (ब्रह्म) व जीव हें दोनहि आत्मे शरीराच्या गुहेंत अतिशय खोल भागांत [परमे परार्धे] प्रवेश करून राहिले आहेत. ॥१॥ जो यज्ञ करणाऱ्यांचा [ईजानानाम्] सेतु म्हणजे आधार आहे (कारण जीवस्थितींतच यज्ञ करतां येतो), जो खरोखर शाश्वत [अक्षर] श्रेष्ठ [परम्] ब्रह्मच आहे, व जो संसारसागराच्या पार जाऊं इच्छिणाऱ्यांची भयरहित नौकाच आहे त्या नाचिकेतसंज्ञक जीवात्म्याचें वर्णन आम्ही करूं शकतों किंवा करावें. ॥२॥

टिप्पणें—मागील वल्लीच्या शेवटच्या श्लोकांतील प्रश्न एकाविषयीच असतां उत्तर दोघांविषयी कां? अशी शंका घेण्याचें कारण नाही; कारण ब्रह्म व जीव खरोखर एकच होत, असें पुढील श्लोकांतच "अक्षरं ब्रह्म यत्परम्" ह्या वाक्यांत सांगितलें आहे.

"पंचाग्नयः"—छांदोग्य ३।१३ मध्ये जे पांच (प्राण, वाणी, श्रोत्र, मनस् आणि चक्षुस्) ब्रह्मगुप्ति सांगितले आहेत व 'केनांत'ही वर्णिलें आहेत तेच पंचाग्नि शब्दाने निर्दिष्ट आहेत. "पंचाग्नि" म्हणजे ह्या पांचांचा योग्य उपयोग करून ज्ञान मिळविणारे आणि त्रिणाचिकेत म्हणजे अन्न, वस्त्र आणि गृह ह्यांकरितां योग्य कर्म करणारे.

"छायातपौ"—हाच शब्द पुनः वल्ली ६ श्लोक ५ येथे आला आहे. तेथे त्याचा अर्थ आम्ही केला तसा कां करावा ह्याचें कारण दिलें आहे, तें पहा.

"ऋतं पिबंतौ"—ब्रह्म व जीव हे दोघेहि आनंदाचा अनुभव घेतात हें म्हणणें बरोबर नाही अशी शंका कोणी घेतात. जीव नेहमी दुःखीच असतो. त्या अर्थी तो आनंदाचा अनुभव घेतो, हें म्हणणें बरोबर नाहीं असें तें प्रतिपादतात. पण तें बरोबर नाही. कारण जीवाला ब्रह्माचें ज्ञान होतें तेव्हा तोहि त्या परमानंदाचा अनुभव घेतोच (मुंडक ३।१।१-३ पहा). उपनिषदें

ज्या आनंदाचा उपाय सांगतात तो जीवस्थितींतच प्राप्त होतो म्हणून "ऋतं पिबंतौ" हें ब्रह्मज्ञ जीवासच खरो-खर पूर्णपणें लागतें.

"गुहा" —ही गुहा वल्ली ३ श्लोक १०–११ येथेच वर्णिली आहे.

"शकेमहि":–हें शक् धातूचें रूप होय असें इतर मानतात. पण शक् धातूचें रूप 'शक्नुवीमहि' किंवा 'शक्येमहि' असें व्हावें. हें आर्षरूप मानूनहि कार्य भागत नाही. पुनः 'वर्णयितुम्' असें पद अध्याहृत मानावें लागतें. त्यापेक्षा पाठभ्रंश मानून मूळ पाठ "शचेमहि" असा मानणें अधिक चांगलें दिसतें. 'शच्' ह्याचा अर्थ 'सांगणें' असा आहे व ती धातु आत्मनेपदाची आहे. तिचें विधिलिङाचें रूप 'शचेमहि' असें होतें व त्याचा अक्षरसाम्यामुळे 'शकेमहि' असा पाठभ्रंश होऊं शकतो. आणि तो पाठ घेतल्याने कोणतेंच पद अध्याहृत मानण्याची गरजहि रहात नाही.

"नाचिकेत"—नाचिकेत म्हणजे जीव असें मागे दाखविलेंच आहे. येथेहि नाचिकेताचें वर्णन करतां येतें किंवा करावें असें म्हणून पुढे श्लोक ३–६ मध्ये जीवाचचें वर्णन केलें आहे. म्हणून नाचिकेत म्हणजे जीव असाच अर्थ असला पाहिजे.

मागील वल्लींतील शेवटचे श्लोक आणि ह्या वल्लींतील आरंभीचे श्लोक ह्यांचा परस्पर संबंध पुढील प्रमाणे आहे. वल्ली २ श्लोक २३ मध्ये "विवृणुते तनुं स्वाम्" ह्यांत किंवा वल्ली २ श्लोक २४ येथील "प्रज्ञानेन" ह्यांत ज्या ज्ञानाचा निर्देश आहे तें ज्ञान कोणतें ह्याचा विचार सहज येतो. त्या विचाराचे दोन भाग होतात. (१) एक तो आत्मा कोठे असतो व (२) दुसरा तो कसा आहे. पहिल्या भागाविषयी प्रश्न वल्ली २ श्लोक २५ येथे आहे आणि त्याचें उत्तर वल्ली ३ श्लोक १ येथे आहे. दुसऱ्या भागाविषयी कांही सांगण्या-पूर्वी, वल्ली ३. श्लोक १ येथे निर्दिष्ट केलेल्या आत्म्याच्या दोन रूपांपैकी कोणत्या रूपाविषयी तें सांगितलें आहे हें सांगणें जरूर आहे आणि तेंच वल्ली ३ श्लोक २ येथे सांगितलें आहे. व पुढे जीवात्म्याचें वर्णन केलें आहे. वल्ली ३ श्लोक २ चा अर्थ करतांना त्याचा अन्वय श्रीशंकराचार्यांनी "यः ईजानानां सेतुः तं नाचिकेतं (अग्निं) ज्ञातुं शकेमहि, अक्षरं ब्रह्मयत्परं, तितीर्षतां अभयं पारं तत् (ब्रह्म) च ज्ञातुं शकेमहि" असा केला आहे. तो अग्राह्य आहे हे उघड आहे. कारण "नाचिकेत" शब्दाचा फारच दूरच्या शब्दांशीं संबंध जोडला आहे आणि 'च' हा शब्द अध्याहृत घेतला आहे.

वल्ली ३ श्लोक ३–६

आत्मानं रथिनं विद्धि शरीरं रथमेव तु ।
बुद्धिं तु सारथिं विद्धि मनः प्रग्रहमेव च ॥३॥
इंद्रियाणि हयानाहुः विषयांस्तेषु गोचरान् ।
आत्मेंद्रियमनोयुक्तं भोक्तेत्याहुर्मनीषिणः ॥४॥

यस्त्वविज्ञानवान् भवत्ययुक्तेन मनसा सदा ।
तस्येन्द्रियाण्यवश्यानि दुष्टाश्वा इव सारथेः ॥५॥
यस्तु विज्ञानवान् भवति युक्तेन मनसा सदा ।
तस्येंद्रियाणि वश्यानि सदश्वा इव सारथेः ॥६॥

अर्थ—आत्मा (जीवात्मा) हा रथी आहे, शरीर हा रथ आहे, बुद्धि हा सारथि आहे आणि मन हा लगाम [प्रग्रह] आहे. असें जाण. ॥३॥ इंद्रियें हे घोडे आहेत, विषय हे त्या घोड्यांच्या फिरण्याचे प्रदेश [तेषु गोचरान्] आहेत असें म्हणतात. शहाणे लोक असें म्हणतात की शरीर, [आत्मा] इंद्रियें आणि मन ह्यांनी युक्त असलेला आत्मा सुखदुःखांचा उपभोग घेणारा [भोक्ता] होतो. ॥४॥ ज्याची बुद्धि चांगली नाही [अविज्ञानवान्] आणि ज्याचें मन सदा न आवरलेलें [अयुक्त] असतें, त्याचीं इंद्रियें खट्याळ घोडे [दुष्टाश्वा] सारथ्याच्या काबूंत नसतात, त्याप्रमाणे त्याच्या काबूंत नसतात. ॥५॥ परंतु ज्याची बुद्धि चांगली असते आणि ज्याचें मन सदा आवरलेलें असतें, त्याचीं इंद्रियें, चांगले घोडे सारथ्याच्या काबूंत असतात त्याप्रमाणे, त्याच्या काबूंत असतात. ॥६॥

टिप्पणें—"अविज्ञानवान्"—"विज्ञान" म्हणजे "बुद्धि" असा अर्थ आहे असें पुढील नवव्या श्लोकांतील 'विज्ञानसारथि' ह्या प्रयोगावरून दिसतें, कारण मागे "बुद्धी"लाच सारथि म्हटलें आहे. अर्थात् धनवान्, बुद्धिमान्, ह्याप्रमाणे विज्ञानवान् म्हणजे चांगली बुद्धि ज्याला आहे तो असा अर्थ होतो.

"आत्मेंद्रियमनोयुक्तं" येथील "आत्मा" शब्द शरीरवाचक मानावा लागतो हें उघड आहे.

वल्ली ३ श्लोक ७-९

यस्त्वविज्ञानवान् भवत्यमनस्कः सदाशुचिः।
न स तत्पदमाप्नोति संसारं चाधिगच्छति ॥७॥
यस्तु विज्ञानवान् भवति समनस्कः सदा शुचिः।
स तु तत्पदमाप्नोति यस्माद् भूयो न जायते ॥८॥
विज्ञानसारथि यस्तु मनः प्रग्रहवान् नरः।
सोध्वनः पारमाप्नोति तद्विष्णोः परमं पदं ॥९॥

अर्थः--ज्याची बुद्धि चांगली नाही, ज्याचें मन ताब्यांत नाही आणि ज्याचे विचार नेहमी अपवित्र असतात [सदा अशुचिः] म्हणजे वासनांनी युक्त असतात त्याला तें (पुढे नवव्या श्लोकांत वर्णिलेलें) पद मिळत नाही आणि जन्ममरणरूपी संसाराची प्राप्ति होते. ॥७ ज्याची बुद्धि चांगली आहे, ज्याचें मन ताब्यांत आहे आणि ज्याचे विचार नेहमी पवित्र म्हणजे वासनारहित असतात, त्याला तें (पुढे नवव्या श्लोकांत वर्णिलेलें) पद प्राप्त होतें. आणि तें पद ज्याला प्राप्त होतें, तो मेल्यानंतर पुनः जन्मत नाही. ॥८॥ चांगली बुद्धि हाच ज्याचा सारथि आहे आणि ताब्यांत असलेलें मन हाच ज्याचा चांगला लगाम [प्रग्रहवान्; ह्याचा "धनवान्" प्रमाणे अर्थ करावा.] आहे, तोच रस्त्याच्या पैल स्थानास म्हणजे शेवटच्या मुक्कामास [पारं] म्हणजे त्या सर्वव्यापक [विष्णोः] आत्म्याच्या परमपदास म्हणजे अतिश्रेष्ठ अवस्थेस (ब्रह्मलोकास) पोचतो. ॥९॥

टिप्पणें--ह्या श्लोकांत जीवाच्या दोन गति सांगून "येयं प्रेते विचिकित्सा" इत्यादि प्रश्नाचें उत्तर दिलें आहे. तें असें आहे की ज्याला परमपदाची प्राप्ति होते तो मेल्यानंतर पुनः जन्मत नाही. आणि ज्याला परमपदाची प्राप्ति होत नाही तो मेल्यानंतर पुनः जन्मतो. हेंच उत्तर पुनः वल्ली ५ श्लोक ६-७ येथेहि दिलें आहे.

वल्ली ३ श्लोक १०-११

इंद्रियेभ्यः परा ह्यर्था अर्थेभ्यः परमं मनः।
मनसस्तु परा बुद्धिर्बुद्धेरात्मा महान् परः ॥१०॥
महतः परमव्यक्तं अव्यक्तात्पुरुषः परः।
पुरुषान्न परं किंचित् सा काष्ठा सा परा गतिः ॥११॥

अर्थः--रूपादि विषयांचीं इंद्रियांमध्ये घडणारीं प्रतिबिंबें [अर्थाः] हीं इंद्रियांच्या आंतमध्ये [पराः] असतात. ह्या अर्थांच्या पलीकडे आंतमध्ये [परमम्] मन आहे. मनाच्या पलीकडे आंतमध्ये [परा] बुद्धि आहे. बुद्धीच्या पलीकडे आंतमध्ये [परः] महान् आत्मा म्हणजेच जागृतींतील आत्मा म्हणजेच अहंकाररूपी किंवा त्रिपुटीरूपी किंवा द्वैतरूपी आत्मा आहे. महान् आत्म्याच्या पलीकडे आंतमध्ये [परम्] आत्म्याच्या अद्वैतरूपाला (हें झोपेंतहि असतें) जागृतींतील द्वैतरूप देणारें अव्यक्त म्हणजे अज्ञेय असें कारण आहे. आणि त्या अव्यक्ताच्या पलीकडे आंतमध्ये [परः] पुरुष (ब्रह्म किंवा ईश्वर किंवा परमात्मा) आहे. त्या पुरुषाच्या पलीकडे आंतमध्ये कांहीच नाही. तोच अखेरची सीमा आहे [काष्ठा]. तोच गतीचा शेवटचा मुक्काम [परा गतिः] आहे. ॥११॥

टिप्पणें--श्लोक १ मध्ये निर्दिष्ट केलेल्यीं आत्म्याचीं दोन रूपें समजवून देण्याकरितां हे श्लोक लिहिले आहेत. तीं दोन रूपें येथे "महान आत्मा" आणि 'पुरुष' ह्या शब्दांनी निर्दिष्ट केलीं आहेत. अद्वैतरूपी पर पुरुषाला द्वैतरूपी जीव स्थिति प्राप्त होण्याच्या कारणाला "अव्यक्त म्हणजे "अज्ञेय" म्हणून ह्या उपनिषदाने उच्च प्रकारची निर्दोष विचारसरणी प्रगट केली आहे. त्या कारणाविषयी तर्कवितर्क करूं नयेत असा भाव त्या "अव्यक्त" शब्दांत आहे.

वल्ली ३ श्लोक १२

एष सर्वेषु भूतेषु गूढात्मा न प्रकाशते।
दृश्यते त्वग्र्यया बुद्ध्या सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभिः ॥१२॥

अर्थ--सर्व भूतांमध्ये लपून बसलेला (गूढः) हा आत्मा प्रकाशत नाही म्हणजे जाणला जात नाही; परंतु श्रेष्ठ प्रकारच्या सूक्ष्मबुद्धीच्या साधनाने सूक्ष्मपणें विचार करणाऱ्यांकडून तो पाहिला जातो.

टिप्पणें:--"गूढात्मा" ह्याचीं पदें "गूढः आत्मा" अशीं आहेत. ह्यांचा संधि "गूढ आत्मा" असा व्हावा पण तो "गूढात्मा" असा केला आहे. हा आर्ष संधि होय.

अनुक्रमणिका

वल्ली ३ श्लोक १३-१५

यच्छेद्वाङ् मनसी प्राज्ञः तद्यच्छेज्ज्ञान आत्मनी ।
ज्ञानमात्मनि महति नियच्छेत्तद्यच्छेच्छांत आत्मनि १३

उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत.॥
क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया ।
दुर्गं पथस्तत्कवयो वदंति ॥१४॥

अशब्दमस्पर्शमरूपमव्ययम् ।
तथारसं नित्यमगंधवच्च यत् ॥
अनाद्यनंतं महतः परं ध्रुवम्
निचाय्य तन्मृत्युमुखात्प्रमुच्यते ॥१५॥

अर्थ—वाणी वगैरे इंद्रियांचें मनामध्ये नियमन करावें. मनाचें बुद्धीमध्ये [ज्ञाने आत्मनि] नियमन करावें. बुद्धीचें अहंकारामध्ये [महति] नियमन करावें आणि अहंकाराचें शांत आत्म्यांत म्हणजे वासनारहित अशा मागे ज्याला पुरुष म्हटलें त्या आत्म्यांत नियमन करावें. ॥१३॥ उठा, जागे व्हा, आणि श्रेष्ठ मनुष्याकडे [वरान्] जाऊन हें चांगलें समजावून घ्या [निबोधत]. (असें न केलें तर नियमन करणें म्हणजे काय ह्याचा खरा अर्थ तुम्हांस समजणार नाही असा भाव आहे. खरा अर्थ टिप्पणांत दाखविला आहे.) वस्तऱ्याच्या तीक्ष्ण धारेवरून चालणें जितकें कठीण आहे [दुरत्यया] तितकाच [तत्] वर वर्णिलेला नियमनरूपी मार्ग चालून जाण्यास कठीण [दुर्गम्] आहे असें शहाणे लोक सांगतात. ॥१४॥ ज्याला शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध नाही, जें अव्यय आणि नित्य आहे आणि ज्याला आदि व अंतहि नाही, त्या महताच्याहि (अहंकाराच्याहि) आंत पलीकडे [परं] असलेल्या ध्रुव परमात्म्याला आपणांत गोळा करून म्हणजे मिळवून घेऊन [निचाय्य] म्हणजे त्याचीं अद्वैत आणि वासनाराहित्य हीं लक्षणें वर्तनांत बाणून घेऊन म्हणजेच जीवात्मा व परमात्मा ह्यांचें ऐक्य घडवून आणून जीव मृत्युमुखांतून मुक्त होतो. म्हणजे त्याचा मृत्यु दूर पळतो आणि त्याचें दुःख नाहीसें होतें आणि त्याला अत्यानंदाची प्राप्ति होते. ॥१५॥

टिप्पणें—आत्मा व त्याची आवरणें मागे दहाव्या व अकराव्या श्लोकांत सांगितलीं तीं जाणून घेऊन पुढे काय करावयाचें तें तेराव्या श्लोकांत सांगितलें आहे. वाङ् हें द्वितीया विभक्तीचें रूप आणि "मनसी" हें सप्तमीचें रूप सर्वांनीच मानलें आहे तसें आम्हीहि मानलें आहे. "वाङ्" त्याचा मूळचा अर्थ जरी वाणी हें एकच इंद्रिय असा आहे तरी येथे "सर्व इंद्रियें" असा अर्थ सर्वांनीच घेतला आहे व तें योग्यच आहे. ज्ञान म्हणजेच ज्ञानाचें साधन जी बुद्धि ती असाहि अर्थ सर्वांनी घेतला आहे, तसेंच करणें योग्य आहे.

येथे 'नियमन करणें' म्हणजे लोप करणें असा अर्थ नाही काबूत ठेवणें असा अर्थ आहे. कारण 'लोप करणें' असा अर्थ घेतल्यास निर्बीज समाधि म्हणजेच पुढे वल्ली ६ श्लोक १०-११ मध्ये वर्णिलेला योग करावा असा अर्थ होईल; पण त्या योगाचें तर तेथेच श्लोक १२-१५ मध्ये खंडन केलें आहे हें पुढे दिसून येईलच. म्हणून "नियमन करणें" त्याचा अर्थ काबूत ठेवणें असाच करावा आणि शब्दशः त्याचा अर्थ तोच आहे. "विलयं नयेत्" असा अर्थ नसून "वशे कुर्यात्" असा अर्थ आहे. एकूण श्लोकाचा अर्थ असा की "इंद्रियें मनाच्या काबूंत ठेवावींत, मन बुद्धीच्या काबूंत ठेवावें, बुद्धि अहंकाररूपी आत्म्याच्या काबूंत ठेवावी आणि अहंरूपी आत्मा अद्वैतरूपी आत्म्याच्या काबूंत ठेवावा. बुद्धि अहंकाराच्या काबूंत ठेवणें म्हणजे, काय तें स्पष्ट करतों. अहंकारावस्थेंत चेतना म्हणजेच ज्ञान (knowing), सुखदुःखभावना (feeling) आणि वासना (desire) हे तीन प्रकार असतात, तरी चेतना हाच मुख्य अपरिहार्य भाग आहे. तोच कायम ठेवून सुखदुःखभावना आणि वासना ह्यांचा त्याग करणें त्यालाच अहंकाराच्या काबूंत बुद्धि ठेवणें असें म्हटलें आहे. "चितितन्मात्रेण तदात्मकत्वादित्यौडुलोमिः" त्या व्याससूत्रांतहि हेंच निर्दिष्ट आहे. (तेथील आमचें भाष्य पहा). अहंकारास शांत आत्म्याच्या काबूंत ठेवणें म्हणजे शांत आत्म्याचीं अद्वैत आणि वासनाराहित्य हीं लक्षणें अहंकारावस्थेंतहि धारण करणें (मुंडक ३।१।३ चें विवरण पहा).

श्लोक १३ मध्ये जें कर्तव्य सांगितलें तें समजणें कठीण आहे म्हणून तें श्रेष्ठ पुरुषाकडून समजवून घ्या असें श्लोक १४ मध्ये सांगितलें आहे. अशा श्रेष्ठ पुरुषाकडे न गेल्यास तें कर्तव्य म्हणजे मन, बुद्धि व अहंकार ह्यांचा

अनुक्रमणिका

लोप करणेंच होय असेंच कोणी चुकीने समजेल; पण खरोखर मन, बुद्धि व अहंकार ह्याचें नियमन करणें हेंच तें कर्तव्य होय असा चवदाव्या श्लोकाच्या पूर्वार्धाचा भाव आहे. हें कर्तव्य खरोखरच फार कठीण आहे, असें चवदाव्याच्या उत्तरार्धात सांगून पंधराव्यांत त्या कर्तव्याचें स्वरूप "निचाय्य" ह्या शब्दाने स्पष्ट करून त्याचें फळहि सांगितलें आहे.

"निचाय्य"—ह्याचा अर्थ जाणून असा कोणी करतात पण तो चूक आहे. "चि" म्हणजे गोळा करणें ह्यापासून हा शब्द झाला आहे त्याचा अर्थ अर्थातच "गोळा करून" म्हणजे "आपणांत मिळवून घेऊन" असाच होतो. परमात्म्याच्या केवळ ज्ञानाने कांहीच होत नाही; त्याचे गुण आपणांत मिळवून घेतले पाहिजेत हें उघड आहे, हेंच येथील "निचाय्य" ह्या शब्दाने आणि तेराव्या श्लोकांतील "शांत आत्मनि यच्छेत्" ह्या शब्दांनी सांगितलें आहे.

मृत्युमुखात्प्रमुच्यतेः—ह्याचा अर्थ मनुष्य मरणरहित होतो असा नाहीच; कारण तसें केव्हाच होत नाही. दुःखरहित होतो किंवा अकालमृत्यु टळतो असाच अर्थ केला पाहिजे. ईशोपनिषदांतील श्लोक ११ वरील टिप्पण, उपसंहार प्यारा २८, आणि कठांतील वल्ली १ श्लोक १४–१९ वरील "मृत्यु" वरील टिप्पण पहा.

वल्ली ३ श्लोक १६–१७

नाचिकेतमुपाख्यानं मृत्युप्रोक्तं सनातनम् ।
उक्त्वा श्रुत्वा च मेधावी ब्रह्मलोके महीयते ॥१६॥
य इदं परमं गुह्यं श्रावयेत् ब्रह्मसंसदि ।
प्रयतः श्राद्धकाले वा तदानन्त्याय कल्पते ।
तदानन्त्याय कल्पत इति ॥१७॥

अर्थ—मृत्यूने नाचिकेतास सांगितलेलें हें सनातन उपाख्यान ऐकणारा किंवा सांगणारा बुद्धिमान मनुष्य ब्रह्मलोकांत पूजिला जातो किंवा आनंदाचा अनुभव घेतो. ॥१६॥ जो हें अतिशय गुह्य आख्यान पवित्र होऊन ब्राह्मणांच्या सभेंत किंवा श्राद्धप्रसंगीं ऐकवील, त्याला त्यापासून अनंतफळ मिळेल, त्याला त्यापासून अनंतफळ मिळेल. ॥१७॥

टिप्पणें—सनातनम्—ह्याचा मूळचा अर्थ नेहमी टिकणारें असा आहे. हें विशेषण उत्तम ग्रंथाला लावतां येतें, कारण त्याच्या उत्तमपणामुळे तो ग्रंथ लोक केव्हाच लुप्त होऊं द्यावयाचे नाहीत.

गुह्यम्—गुह्य म्हणण्याचें कारण, हें अयोग्य मनुष्यास केव्हाच सांगणें योग्य नाही, हें आहे. ह्याचा अर्थ हें केव्हाच कोणास सांगूं नये असा नाही हें ह्याच श्लोकावरून उघड आहे. मृत्यूला नचिकेतास जेवढें सांगावयाचें होतें तेवढें सांगून झाल्यामुळे ग्रंथकाराने येथे ग्रंथ समाप्त करून हे समाप्तिदर्शक श्लोक लिहिले व शेवटच्या वाक्याची द्विरुक्ति केली. पण नंतर कांही काळाने त्यालाच पुनः काव्यस्फूर्ति झाल्यामुळे त्याने तिसऱ्या वल्लींतीलच ज्ञान पुढील तीन वल्लींमध्ये जास्त विस्ताराने, जास्त स्पष्टपणे व निराळ्या शब्दांनी सांगितलें.

गुरु–माउली विनोबा

कुन्दर दिवाण

पूज्य विनोबांसंबंधी कांही बोलणें किंवा लिहिणें किती अवघड ! काय बोलावें वि कसें बोलावें, कांही कळत नाही. सुरवात कशी करावी, प्रश्नच पडतो. कांही लिहावोलायला गेल्यास तें वाकडेंच तर नाही जाणार, अशी धास्ती वाटते. पण मित्रांच्या आग्रहामुळे वेडेंवाकडें जसें जमेल तसें लिहीत आहें.

लहानपणीं खामगांवला असतांना पहिल्या प्रथम मी विनोबांचें नांव ऐकलें. परिचयाचा आरंभ प्रायः नामापासूनच होतो. कधी कधी त्याबरोवर रूपहि असतें इतकेच. नांव ऐकून जरा चमत्कारिकच वाटलें. त्यावेळीं मला असल्या नांवांचा फारसा परिचय नव्हता. वास्तविक हें नांव म्हणजे अस्सल मराठी नांव आहे, ज्ञानोबा, एकोबा, तुकोबा सारखें. आणि पुढे मला त्या नांवाचा इतिहास कळला तेव्हा तर तें त्याच जातीचें आहे, हें कळून आलें. विनोबांचें आई–वापांनी ठेवलेलें मूळ नांव विनायक. पण पुढें विनोबा साबरमती आश्रमांत येऊन राहिले तेव्हा स्वतः बापूजींनी त्यांना 'विनोबा' पदवी दिली–त्यांची ज्ञानोबा–तुकोबा ही परंपरा वा कुळी ओळखून. आणि तेव्हापासून ते विनोबा झाले–स्वतः गांधी महात्मा बनले त्याप्रमाणें आणि म्हणून मला कोणी त्याच्या नांवाच्या आगे–मागे 'आचार्य' 'संत' अथवा 'जी' आदि उपपदें जोडतात तेव्हा तें बरें वाटत नाही. श्रीकृष्णाला श्री. श्रीकृष्ण म्हणण्याप्रमाणे तें हास्यास्पद वाटतें. 'बा' ची पदवी दिल्यानंतर आता आणखी कशाला पुस्ती ?

या 'बा' ने साबरमतीला एकदा मोठी मौज झाली होती, म्हणतात. अनसूयाबाई अहमदावादच्या प्रसिद्ध धनिक कार्यकर्त्या. आश्रमांत बापूजींच्याकडे नेहमी यायच्या. एकदा बापूजीकडें त्या आल्या असतां बापूजींनी त्यांना सांगितलें की "आश्रम विनोबा आयग छे. विद्वान् तपस्वी छें. एमने मळी ल्यो." बाईंना वाटलें कोणी बाई आहे. चला, आपण तिला भेटूं या; म्हणून त्या मोठ्या उत्सुकतेनें गेल्या. पण जाऊन पाहतात तों तिथे एक बोवा बसला आहे ! कस्तूरबा, भक्तिबा प्रमाणें तिथे गुजराती 'बा' (आई) नव्हती, तर तो मराठी 'बा' होता.

माझ्या पुरता मीं या गुजराती 'बा' चा समन्वय केला आहे. म्हणजे विनोबा मला बाबा आणि आई दोन्ही झाले. म्हणून मीं म्हटलें आहे गुरु–माउली विनोबा. गुरु = बा (मराठी), माउली = बा (गुजराती) गुरु = माउली शब्दांत मोठी खुबी आहे. गुरु ज्ञानाचें नांव आहे, तर आई, प्रेमाचें नांव आहे. नुसत्या एक-एकानें आमचें पोट भरत नाही. म्हणून आम्ही गुरु–माउली हा कलमी शब्द कल्पिला आहे. त्याचें एकरस सार म्हणजे 'बा'.

'बा'–पदवीचें हें रहस्य जे ओळखतील त्यांना विनोबा नांवतांच सर्व गौरव येऊन गेलें, हें पटेल आणि मग ते अन्यप्रकारें त्यांना उपपदें लावून अर-सिकता करणार नाहीत आणि सवंगपणे वाटेल त्याला बा–पद्धतीने संबोधणारहि नाहीत.

१९२६ च्या मे मध्ये मी पहिल्या प्रथम वर्ध्याच्या आश्रमांत आलों. तोंपर्यंत मी विनोबांना पाहिलेंच नव्हतें. आश्रम नांवाने माझ्या मनांत ज्या कल्पना उठत त्या आपल्या प्राचीन ऋषीमुनींच्या आश्रमाच्या अर्थात् आश्रमांत राहणारेहि तसेच जटा, कौपीन, दंड–कमंडलु धारण करणारे अथवा तत्सदृश असतील अशी कल्पना. पण प्रत्यक्षांत येऊन पाहिलें तो थाट कांही औरच होता. त्याचें स्मृति–चित्र माझ्या 'आश्रमचें प्रथम दर्शन' यांत कांहीसें येऊनच गेलें आहे. तें इथें विस्तारत नाही. पण विनोबांचें जें दर्शन झालें, तेंच इथें देतों. आश्रमांत आल्याबरोबर प्रथम मीं मनोहरजींकडे

गेलों. त्यांचा तो धमनि–संतत अस्थिपंजर पाहून तर् मला रडूंच कोसळलें होतें. पण त्यांच्याकडून थोडया वेळानें विनोबांकडे गेलों तों त्यांना पाहून मोठें समाधान झालें असें नाही. कारण त्यांची देहाची आयतीहि तशीच रोड होती. तिच्यावर शिरा–जाल दिसत नव्हतें इतकेंच. साडेपांच फूट उंचीचा देह, पण वजन काय तर ९०–९२ पौंड ! कपाळ भव्य आणि त्याचे कोपरे निवालेले, हात रोडके आणि खांदे किंचित् झुकलेले, पोटऱ्या त्या मानानें जरा भरदार आणि डौलदार, पोट चापट आणि छाती उन्नत पण कृशच, डोळे विलक्षण ..दक आणि नाक धारदार एक लहानसा शुभ्र पंचा नेसलेली ती मूर्ति पाहून दर आणि आदर दोन्ही एकदमच वाटले. पहिल्याच भेटींत त्यांनी मला विचारलेले प्रश्न आणि दिलेले आदेश विलक्षण होते. त्यांत त्यांची ज्ञानदृष्टि आणि प्रेमसृष्टि आज मला स्पष्ट दिसते आहे. त्यांच्या लोकोत्तरतेचा ठसा तेव्हाच पडला, जरी तिचें ज्ञान आणि भान मागाहून झालें. त्यांची ती कृश–काया म्हणजे मूर्तिमती तपस्विताच वाटली. जणूं ती सर्वांना सांगत होती—

नायं देहो देहभाजां नृ–लोके,
कष्टान् कामान् अर्हते विड्भुजां ये।
तपो दिव्यं पुत्रका येन सत्वं
शुद्धेद् यस्माद् ब्रह्मसौख्यं त्वनन्तम्॥

नाम–रूप मिथ्या म्हणतात. आणि त्याचेंच चिंतन मी आतापर्यंत केलें. पण मी म्हणतों, ती मिथ्या असलीं तरी गुणाधार म्हणून त्यांची मातब्बरी आहेच. 'पुष्पमाळानुषङ्गेण सूत्रं शिरसि धार्यते.'' ती तुच्छ असली तरी प्रकाशासाठी तिचा संग्रह करा लागतो. फुलें धारण करण्यासाठी धागाहि डोक्यावर घ्यावा लागतो.

कोणता आहे हा प्रकाश ? कोणतें व्यक्तिमत्व ? कोणतें वैशिष्टय ? मी म्हणतों वैराग्य, ज्ञान आणि क्रियावत्ता. तसें तर अनेकांच्या ठिकाणीं अनेकानेक सद्गुण असतात आणि तसे ते विनोबांच्याहि ठाईं सापडतील. गुण तसे अवगुणहि सापडतील. पण तें कांही व्यक्तिमत्व वा वैशिष्टय म्हणतां येणार नाही. व्यक्तिमत्व म्हणजे ते विशिष्ट महद् गुण की जें उत्कट-त्वानें प्रत्ययास येतात.

वैराग्य हा विनोबांचा अव्वल गुण आहे.

"तें हें विषय–वैराग्य। जें आत्म–लाभाचें भाग्य
जेणें ब्रह्मानंदायोग्य। जीव होती॥"

हा गुण पूर्व–जन्मार्जितच म्हणावा लागेल. कारण त्यासाठी त्यांना चालू जन्मांत फार धडपड करावी लागली, असें दिसत नाही. त्यांची ब्रह्मचर्याची साधना सहज दिसते. त्यांचें वैराग्य भक्कम आहे. कारण त्याला तत्वज्ञानाचा सुदृढ पाया आहे. त्यांत भक्तीचा जिव्हाळा आहे, कर्मयोगाचा प्रवाह आहे. शंकर–ज्ञानदेव, रामदास–तुकाराम, टिळक-गांधी यांच्यापासून त्यांना सतत स्फूर्ति आणि बळ मिळालीं आहेत. "भक्ति–ज्ञानाविरहित गोष्टी इतरा न कराव्या। प्रेमभरें वैराग्याच्या युक्ती विवराव्या॥" हें त्यांचें आवडतें वचन आहे. त्यांच्या वैराग्याच्या युक्ति फार मजेदार असतात. आणि ते त्या नित्य–नव्या शोधून काढीत असतात. वैराग्य–पोषक आचार, विचार आणि उच्चार ते सारखे साधीतच असतात. ब्रह्मचारी स्त्री–पुरुषांना भूषा उपयोगाची नाही. म्हणून भूषा–त्याग पुरुषांप्रमाणे स्त्रियांनीहि आश्रमांत करावा. अलक म्हणजे अलंकारच आहे. वेणीला केश–पाश म्हणतात. पण तो मोह–पाशच आहे. म्हणून त्याचा त्याग विहित आहे. गांधीजींनी मीराबाईं (मिस स्लेड) आणि विनोबांनी अनेक स्त्रियांना त्याची दीक्षा दिली आहे. 'न अ–कामी अलंकरिष्णुः' जो विरक्त असतो तो नटत नसतो. "स्त्री–पुरुष–भावना, भेद भासे मना। तेथे ब्रह्मज्ञाना गमन कैचें?" म्हणून अभेद साधायचा. ब्रम्हचर्याची खरी सिद्धि त्यांत आहे. गांधीजींचीहि अशीच दृष्टि होती. महायोगी परमज्ञानी शुकाचार्यांची तर तशी स्थितीच होती, हें पुढील भागवती उक्ती-वरून दिसून येतें.

दृष्टानुयान्तमृषिमात्मजमप्यनग्नं।
देव्यो ह्रया परिदधुर्न, सुतस्य, चित्रम्॥
तद्वीक्ष्य पृच्छति मुनौ जगदुस् तवास्ति।
स्त्री–पुं–भिदा, न तु सुतस्य विविक्त–दृष्टेः॥

या सम दृष्टीला पोषक असेंच चालणें बोलणें पाहिजे. आपल्या लिंगानुसारी क्रियापदांवरहि विनोबा

टीका करून म्हणतात—'मी जातों,' 'मी जातें', हें काय ? दर वेळेला सांगायचें की मी पुरुष आहे आणि मी जात आहें; मी स्त्री आहें आणि मी जात आहें ! संस्कृत इंग्रजी भाषांमध्ये असा प्रकार नाही. तेथे स्त्री–पुरुष दोन्ही म्हणतील 'अहं गच्छामि', 'I go', भाषा जर विचाराचें प्रतिबिंब मानली, तर अशा संस्कृत, इंग्रजी वगैरे भाषा बोलणारे हे अधिक समत्व–युक्त म्हणतां येतील. मी जातों म्हणणारी नागपूरकडील स्त्री हें स्त्रीपुरुष–समाजांतील अधिक समतेचें चिन्ह समजलें पाहिजे. पुरुषाला हाक मारायची तेव्हा अरे म्हणायचें, स्त्रीला हाक मारतांना अगे म्हणायचें, हें दर वेळेला भेदन कशाला ? या विचाराने स्त्रीलाहि अरे म्हणून संबोधतांना मी विनोबांना पाहिले आहे. यांचा ते इतरांना उपदेश करतात असें मात्र नव्हे. ती त्यांची व्यक्तिगत साधना आहे. रामकृष्ण नव्हते का एका हातांत पैसा व दुसऱ्या हातांत मातीचें ढेकूळ घेऊन त्यांची अदलाबदल करून दोन्ही माती म्हणून गंगेंत फेकून देत ? तसें हें आहे. स्त्री–पुरुष भेदाचें ज्ञान, गांधीजी म्हणत, एक तर प्रजोत्पादनासाठी लागेल, अथवा व्यभिचारासाठी. एरव्ही व्यवहारांत त्याची काय गरज ? म्हणून अशा पुरुषांची 'समीभूता दृष्टिस् त्रिभुवनमपि ब्रह्म मनुते।' पण ज्यांना ही दृष्टि नाही, त्यांना हा असला आचार आणि उच्चार विचित्र वाटल्यास त्यांत नवल काय ? दृष्टिभेदामुळे सृष्टि–भेद होणारच. सक्त आणि विरक्त यांच्या आचार–विचार–उच्चारांत अन्तर असणारच. हें महदंतर एक संस्कृत श्लोक उद्धृत करून विवेकानंदानी असें दाखविलें आहे.

मेरु–सर्षपयोर्–यत्–तत्, सूर्य–खद्योतयोरिव ।
सरित्–सागरयोर् यत्–तत्, तथा भिक्षु–गृहस्थयोः ।।

म्हणजे संन्यासी आणि संसारी पुरुषांमध्ये महत्ता, ज्ञानवत्ता आणि गंभीरता या गुणांत मेरू व मोहरी, सूर्य व काजवा आणि सागर व नदी यांच्यांत-त्यासारखा फरक आहे. पण गीतेंत याहि पेक्षा सरस व स्पष्ट विरोध दाखविला आहे दोहोंतला—

"सर्व भूतांस जी रात्र, जागतो संयमी तिथे ।
सर्व भूतें जिथे जागीं, ज्ञानी योग्यांस रात्र ती ।।"

दोन्ही सृष्टिच वेगळ्या. एक रात्र, तर दुसरा दिवस. कः केन संबंधः ?

"वैराग्य एका पारड्यांत आणि बाकीची सर्व सात्त्विकता दुसऱ्या पारड्यांत घालून तोल घेतला, तेव्हा वैराग्य जड भरलें" हें विचार–पोथींतील वचन त्यांच्या भूमिकेवर चांगला प्रकाश टाकतें. 'समर्थांचें स्मरण' हा विनोबांचा 'महाराष्ट्र धर्म–चार अंक' यांत आलेला लेख अद्भुत आहे. त्यांत त्यांनी याचें फार प्रभावी विवेचन केलें आहे. रामदासांच्या चरित्राचा आणि दासबोधाचा त्याच्यावर खोल ठसा उमटला आहे. त्याने त्यांच्या अंगीं ज्ञान, वैराग्य आणि सामर्थ्य चढलें आहे, असें स्पष्ट दिसतें. तो लेख अपूर्णच आहे. त्याची पुर्ति स्वतः विनोबांचें जीवन आहे.

विनोबांचें दुसरें वैशिष्टय म्हणजे त्यांचें ज्ञान. त्यांची बुद्धिमता अलौकिक आहे. कोणत्याहि विषयाचें त्यांचें अध्ययन मूलग्राही असतें. त्यांनी मोठमोठे पोथे लिहिले नाहीत. पण त्यांचें थोडेसें लिखाण आहे तें मौलिक आहे, सरस आहे, सकस आहे. हें सारें पुस्तकी ज्ञान नाही, तर अनुभव–जनित आहे. आणि त्यामुळेच तें इतकें जिवंत वाटतें. पण तें नुसतें आनुभविकच नाही तर शास्त्राच्या कसोटीवर कसास उतरलेलेंहि आहे. अशा प्रकारें आत्म–प्रतीति शास्त्राच्या कोंदणांत शोभतेतराम्. शिवाय त्यांचें सर्व बोलणें लिहिणें चाल जीवनाशीं चालू प्रश्नांशीं संबंध राखणारें असतें, त्यामुळे तें ताजें असतें आणि त्यांत तत्त्वविचार असल्यामुळे तें कधी गतार्थ वा गतरसहि होत नाही. त्यांचें धर्म–ग्रंथांचें अध्ययन अति सखोल आहे. याची साक्ष म्हणजे त्यांचें 'गीता–प्रवचनें,' 'स्थितप्रज्ञ–दर्शन,' 'ईशावास्योपनिषत्,' 'उपनिषदांचा अभ्यास,' 'विचार–पोथी,' 'गीताध्याय–संगति,' 'गीताई–कोश,' 'संतांचा प्रसाद,' 'ज्ञानदेवाची भजनें : चिंतनिका,' 'अभंग–व्रतें' इत्यादि सारस्वत होय. यांत विशेष हें की प्रत्येक ग्रंथाची तऱ्हा न्यारी आहे. नाहीतर कित्येकांचें असें असतें की त्यांचा एक ग्रंथ वाचला की बाकीचें वाचतांना जणूं तेंच तें वाचतों आहों, असें वाटतें आणि वीट येतो. त्यांनी लौकिक आणि शास्त्रीय दोन्ही शैलींत लिहिलें आहे आणि प्रत्येकाची गोडी

अपूर्व आहे. गीताप्रवचनें आणि गीताई ह्या दोन कृति मराठी भाषेंत अजर आणि अमर होऊन राहतील. इतरहि ग्रंथ तसे आहेतच, पण हे दोन म्हणजे विनोबांची अबालवृद्धांना, अज्ञांना आणि विज्ञांना, चालू आणि येत्या सर्व पिढ्यांना एक कायमची अमूल्य देणगी आहे. हे पावन ग्रंथ घरोघरीं पोचले पाहिजे आणि पोचतील. भाराभर ग्रंथ प्रसवण्यांत अर्थ नाही, एक की दोनच असले तरी चालतील, पण त्यांनी सर्वांच्या घरांत आणि माजघरांतच नव्हे तर त्यांच्या हृदयांत ठाणें दिलें पाहिजे, अशी अपेक्षा आहे विनोबांची साहित्यिकांकडून. तुलसी रामायणाने जसें हिन्दी जगत् व्यापलें आहे तसें झालें पाहिजे. आज 'गीता-प्रवचनें' मराठी, हिन्दी, सिन्धी, गुजराथी, तेलगू, कानडी, मल्याळी, बंगाली भाषेंत वावरत असून लवकरच उडिया आणि असमिया भाषांतहि तें अवतरणार आहे. रामाचा दूत जसा रामा आधीच जाऊन बरेचसें कार्य उरकतो तसें हें 'गीता-प्रवचन' विनोबांचें कार्य संपादन करीत चाललें आहे. भूदान-यज्ञाचें तें जणूं पुरोहित बनलें आहे. आज विनोबांनी केवळ आध्यत्मिक विषयांवरच लिहिलें आहे असें नाही. त्यांची बुद्धि सर्वच क्षेत्रांत, लौकिक विषयांतहि, अप्रतिहत चालते. स्वराज्य-शास्त्र, खादी-शास्त्र, गोसेवा, शिक्षण-शास्त्र, लिपी-समस्या, भू-समस्या आदि सर्वच विषय त्यांनी आपल्या प्रज्ञेच्या प्रकाशाने उजळले आहेत. कारण त्यांची बुद्धि ग्रंथ-निष्ठ नाही, जीवन-निष्ठ आहे. जो माणूस पूर्णपणे निःस्वार्थ झाला त्याला सर्व भूत-हिता वेगळा दुसरा काय उद्योग सुचूं शकतो? म्हणून त्यांच्या आत्मनिष्ठ बुद्धीला लोक-सेवेपरता दुसरा छंद नाही. आणि म्हणून हे सारे प्रश्न ती कुशलतेने सोडवते. 'मधुकर,' 'जीवन दृष्टि,' 'क्रांत दर्शन,' 'सिंहावलोकन' आदि त्यांचे लेख-भाषण-संग्रह म्हणजे विविध-ज्ञान-विस्तार-मालाच होत.

त्यांची ज्ञानाची पिपासा इतकी दांडगी आहे की रोज नित्य नवें ते शिकतच असतात. आणि नुसतें शिकतच नाहीत तर त्याबरोबर शिकवीतहि असतात. किती भाषा नि किती लिप्यां ते शिकले, हें पाहिलें तरी छाती दडपून जाते. आता त्यांनी भाषाविषयांत भारत पादाक्रांत करून चीनची वाट धरली आहे. म्हणे चीनी भाषा शिकणार आहेत ते! संस्कृत, इंग्रजी, द्रविडी, अरबी (आणि आता चीनी भाषा) किती विभिन्न; पण त्या त्यांनी शिकून घेतल्या आहेत. आणि त्यावरोवर त्यांच्या विचित्र लिप्याहि. आणि हें सर्व नानाविध उद्योग चालत असतात-प्रवासांतहि. पण यांत त्यांची दृष्टि मुख्यतः लोकसेवेची आहे, साहित्य सेवेची नाही. साहित्याची सेवा सहजपणें होतच राहणार, हें वेगळें.

'गधे और पंडित बीचमें' करून जसा नेपोलियन भर रण-धुमाळींत काव्य-शास्त्र-विनोद करीत असे, त्याप्रमाणें चोहोंबाजूला लोक-सेवेचे नाना उद्योग-व्यवसाय चालू करून द्यायचे, त्यांत प्रमुख भाग घ्यायचा, आणि मधल्या वेळांत निरंतर खोल अध्ययन करायचें, अशी विनोबांची रीत आहे. 'गुरोः कर्मातिशेषेण' हें त्यांचें सूत्र आहे.

गणित विज्ञानाचें, व्याकरण भाषेचें आणि मानस व योग-शास्त्र अध्यात्माचें प्रवेशद्वार होय. म्हणून हीं तीन शास्त्रें ज्ञानभंडारांच्या गुरुकिल्याच होत. या तिहींची त्यांना विलक्षण गोडी आहे, आणि त्यांत उत्तम गति आहे.

शास्त्र-शुद्ध आणि अनुभव-सिद्ध अशी विनोबांची एक जीवन-दृष्टि आहे; आणि तद्नुसार त्यांचे प्रयोग आणि उद्योग चालू असतात. परंधामला कांचन-मुक्तीचा प्रयोग आणि देशांत भूदान-यज्ञाचा उद्योग चालू आहे. गुरु कांही पक्षिणी जशी पिलाला भरवते तसा शिष्य-जनाला ज्ञानाने भरवीत नाही. तो कासवीप्रमाणे केवळ दृष्टीनेच पोषण देतो. तो दृष्टि देतो आणि आणि तेथें त्याचें कार्य संपतें. तदनुसार सृष्टि-रचना करणें, प्रयोग आणि उद्योग चालविणें, हें ती दृष्टि आत्मसात् करणारांचें काम आहे. तसा श्रद्धावान्, निष्ठावान् आणि पराक्रमी शिष्य-वर्ग लाभल्यास गुरुकार्य डोळ्यांत भरतें; नाही तर, शीतागारांत पडून राहतें. पण विचार-बीज वाया जात नाही. तयार भूमि आणि अनुकूल ऋतु येतांच तें रुजूं लागतें आणि पल्लवित होतें.

विनोबांचें तिसरें वैशिष्ट्य म्हणजे त्यांची क्रियावत्ता. ते नुसते पढिक पंडित नाहीत. "समजले

आणि वर्तले" असे ते मनस्वी पुरुष आहेत. लहानपणापासून त्यांचा हा गुण उत्कटपणें दिसून येतो. जें पटलें तें तत्काळ अमलांत आणायचें, हा त्यांचा बाणा आहे. स्वदेशीचें व्रत घेतलें तर घरांत विदेशी कांच येतांच ती त्यांनी फोडून टाकली. ब्रह्मचर्यानें जोडा वापरूं नये असें वाचलें आणि जोडा सोडला. कातायचें व्रत घेतलें आणि तकलीची उपासना केली. तिच्या शास्त्राचा अद्‌भुत विकास केला. गोव्रत घेतलें आणि गोसेवेचा मार्ग प्रशस्त केला. लिपी–विचार मांडला आणि लोकनागरी अमलांत आणली. असे लहान–मोठे असंख्य प्रयोग होतच आले आहेत. त्यांच्यामुळे जी शक्ति, जें बळ, आणि जें सामर्थ्य संचित झालें आहे, तेंच सर्व कर्तबगारीचें मूळ आहे.

मुख्यत: आणि अशा गुणांवर लुब्ध होऊन गांधीजींनी इतरांना बाजूला सारून 'प्रथम सत्याग्रही' म्हणून विनोबाना निवडलें होतें. त्यावेळीं कांग्रेस वर्किंग कमिटीच्या अतिरथी–महारथींना मोठा धक्काच बसला होता. आणि देशांत तसे विदेशांतहि लोक बुचकळ्यांत पडले होते की हा कोण कानामागून आला? पण ती सत्याग्रह सेनानीची निवड होती. त्यांच्या मतें सत्याग्रह आणि इतर युद्धें यांत जमीन–अस्मानचें अंतर आहे. इतर युद्धांत बळाचें नि संख्याबळाचें महत्त्व फार आहे. पण इथे सत्याग्रहांत तें बळाला नाही नि संख्येला नाही, तर शुद्धीला आहे. एक शुद्ध सत्याग्रही–प्रल्हादासारखा–विश्वसाम्राज्यसत्तेला भारी आहे. गांधीजींची निवड किती योग्य होती हें जग पाहतच आहे.

उत्तम क्षेत्रांत बीज पेरलें की तें आपोआप भरपूर पीक देणारच, अशा विश्वासानें शेतकरी निश्चित होतो, त्याप्रमाणे आपलीं तत्वें ज्या सत्पुत्रांना ग्रहण करवून गांधीजी निश्चींत होते, त्यांत विनोबांची गणना प्रथम करावी लागेल. भूदान यज्ञरूपानें गांधीजींचा हा विश्वास फलद्रूप होत आहे असें म्हटलें तर तें खचित अतिशयोक्त होणार नाही. पण हें तर केवळ बाह्य फळ आहे. अशा ईश्वरनिष्ठ जीवनाचें वर्णन तर रामनामाप्रमाणे "कल्याणानां निधानं कलिमल–मथनं पावनं पावनानाम्" असेंच करावें लागेल.

विनोबा असे दृढ–संकल्प आणि वैराग्यज्ञानादि दिव्य गुणांनी संपन्न असले, तरी ते आपली मर्यादा कधी सोडत नाहीत. मला ते शास्त्रासारखे वाटतात. "शास्त्रं ज्ञापकं, न तु कारकम्" शास्त्र हें ज्ञान करून देतें पण आचरण करवून घेत नाही. राजा प्रजेकडून धर्माचरण करवून घेतो, पण देशिक धर्म दाखवून मोकळा होतो. राजशक्ति ही कारक आहे, गुरु–दृष्टि ही ज्ञापक आहे. प्रत्येकाची एक मर्यादा असते आणि आणि तिच्या पालनांतच त्याचें बळ असतें. तिचें उल्लंघन म्हणजे अनर्थ. "नक्र: स्वस्थानमासाद्य गजेन्द्रमपि कर्षति" पण तोच नक्र म्हणजे मगर जर जळाबाहेर वाळूवर हातीं लागला तर त्याची कोल्हाहि विटंबना करूं शकेल. मनु राजगुरु होते. म्हणजे ते राजेहि होते आणि गुरूहि होते. गांधी गुरु महाराज होते. म्हणजे ते गुरू होते आणि राजांचेंहि राजे होते. आपल्या विचाराप्रमाणे ते लोकांकडून आणि लोकपालांकडून करवून घेण्याचें सामर्थ्य राखीत होते. अशा ज्ञापक आणि कारक सामर्थ्याचा मणिकांचनयोग सुदुर्लभ आहे. बाप अधिकारानें करवून घेतो. तसें गांधीजींनी केलें आणि ते बापूजी झाले, राष्ट्रपिता झाले. तें स्थान विनोबांचें नाही. विनोबा आमची गुरु माउली आहे.

कळी भिटलेली असते. ती उमलूं लागली म्हणजे तिच्या पाकळ्या फाकूं लागतात. आणि त्या सर्वच्या सर्व पूर्ण उघडल्या म्हणजे फूल फुललें असें आपण म्हणतों. गीतेचे अनन्य भक्त विनोबा. त्यांच्या जीवनांत गीतेच्या योगाचा विकास जर आपण पाहिला, तर त्यांत नवल नाही. गीताकमलाची कर्म, ध्यान, भक्ति आणि ज्ञान हीं चारीं योगदळें इथे उत्तम विकास पावल्याचें दिसून येतें. समत्वरूप ध्यानाच्या निष्कंप भूमिकेवर कर्माचें चक्र अखंड धावतें आहे, ज्ञानाचा नंदादीप अखंड तेवतो आहे, भक्तीची गंगा अखंड वाहते आहे! आमचें जीवन कर्ममय आहे आणि म्हणून कर्मच त्यांत प्रधान दिसणार. पण तें ज्ञानानें उजळलेलें आणि भक्तीनें भिजलेलें हवें. आणि समत्व

(पुढील मजकूर पान १३ वर)

आधुनिक उपनिषदकार विनोबा

श्रीनिवास नारायण बनहट्टी

सूचना करण्यांत आली व कांहीशी अजाणतांच मंजूरहि झाली की पू. विनोबांचें 'मधुकर' हें पुस्तक विद्यापीठाच्या माध्यमिक परीक्षेसाठी आवश्यक विभागांत लावण्यांत यावें. कालेजांच्या चार भिंतींच्या आंत विनोबांच्या वाणीचा अभ्यास सुरू झाला. तिच्या पावन मधुरतेमुळे अध्यापक व अभ्यासक मुग्ध होऊन गेले. विद्यापीठाच्या आवारांत तिचें तेज प्रकट झालें.

वास्तविक त्या वेळेपर्यंत तिचें तेज प्रकट होण्याचें राहिलें होतें असें नाही. बाहेरच्या वातावरणांत तें खुलेपणीं संचारत होतें. विद्यापीठाचीं कवाडें बंद होतीं म्हणून तिथे त्याचा प्रवेश झाला नव्हता. विनोबांचा आवडता सूर्याचा दृष्टान्त इथे लागू पडत होता. "दार बंद करून कोणी निजला आहे तर सूर्य त्याची सेवा करण्यासाठी त्याच्या दाराशीं येऊन उभा राहतो. पण दाराला धक्का देऊन आंत शिरत नाही." विद्यापीठानें आपलें बंद कवाड थोडें किलकिलें करतांच या 'मित्रा'नें आंत प्रवेश केला आणि आपलें मर्यादा पुरुषोत्तमत्व अनुभवास आणून दिलें.

विनोबांच्या वाणीच्या संबंधांत एका संस्कृत श्लोकाची आठवण होते.—

दिक्कालाद्यनवच्छिन्नानन्तचिन्मात्र मूर्तये।
स्वानुभूत्येकसाराय नमः शांताय तेजसे॥

ही वाणी तेजोमय आहे, पण तिच्यांतलें हें तेज कसें तर शान्त, सुखकारक आहे; दाहक, रुक्ष नाही. हें तेज ज्ञानस्वरूपी आहे; तें अनन्त आहे, कारण दिशा आणि काल यांनी तें मर्यादित झालेलें नाही. आणि सर्वांत मोठें लक्षण हें की या वाणींत एका स्थितप्रज्ञ योगवित्तम आत्म्याच्या स्वानुभूतीचें सार ओतलेलें आहे.

विनोबांचें सर्व लिखाण आत्मिक प्रेरणेंतून उद्भवलेलें आहे. शारीरिक, मानसिक, सामाजिक गोष्टींविषयी ते चर्चा करतात. त्यांच्या नजरेंतून कोणचीहि गोष्ट सुटलेली नाही. मजुराला मजुरी किती दिली पाहिजे, खेड्यांतल्या मुलांनी रंगपंचमी कशी साजरी करावी, महारोगावर दवा कोणती लागू पडते, माणसानें अंघोळ कशी करावी, असल्या गोष्टींविषयीहि त्यांनी विचार केला आहे—साधासुधा नाही, तर मौलिक विचार केला आहे आणि तो उद्बोधक वाणीनें सांगितला आहे. पण असल्या प्रतिपादनांत सुद्धा त्यांचें लक्ष आत्म्याकडे, अविनाशीं सारभूत तत्त्वाकडे असतें. सर्व कर्मांची परमात्म्याकडे योजना करायची. महारोग्याला 'देहाहून आपण भिन्न आहोंत; आत्मस्वरूप आहोत' असें चिंतन करायला ते शिकवतील; स्नान करितांना पुरुषसूक्ताच्या आधारें जगदात्म्याच्या कृपाजलाची धारा आपणास शुद्ध करीत आहे असें मनन करण्याचा बोध देतील. त्यांचें ध्यान आणि ध्येय सृष्टीमध्ये ओतप्रोत असलेला अविनाशी अप्रमेय आत्मा हेंच सर्वत्र आहे. स्वराज्याची

गुरुमाउली विनोबा (पान १२ वरून)

जर त्यांत नसेल तर तो सारा श्रमच व्हायचा. हा गीतेचा आदर्श विनोबांनी आपल्या समोर मूर्तिमंत केला आहे. असा एक समाधिस्त स्थितप्रज्ञ काय करूं शकतो तें आपण पाहतच आहों. किती जीवनें त्याच्या संचारांत पावन आणि उन्नत झालीं, हें कोण सांगूं शकेल? असा एक चालता–बोलता आणि आपल्यांत वावरता स्थितप्रज्ञ ज्यांना लाभिला त्यांचें तें परम भाग्य होय. अशाच्या विषयीं भगवंतानें म्हटलें आहे—

"न ब्राह्मणैस् तुलये भूतं अन्यत्
पश्यामि विप्राः किं अतः परं नु?"

अशा ब्रम्हनिष्ठाशीं दुसऱ्या कोणत्याहि, मोठ्यांतल्या मोठ्याहि, सत्वाची तुलना मी करूं शकत नाही; त्याहून श्रेष्ठाची गोष्टच कशाला?

अनुक्रमणिका

चळवळ ही आत्मशुद्धि करणारी आहे असा सिद्धान्त त्यांनी सांगितला. राष्ट्रीय स्वातंत्र्य, सामाजिक उद्धार इ० सर्व गोष्टी त्यांच्या दृष्टीनें परमात्म्याच्या असीम सौन्दर्याचे सीमित आविष्कार आहेत.

देहाला तर विनोबा मडकें म्हणतात. या मडक्यांत कांही तरी ओतलें पाहिजे, असें त्यांनी शरीरपोषणाच्या क्रियेस उद्देशून म्हटलें आहे. 'कटीमटीका बंगला तेरा' असें कबीरांनी म्हटलें आहे. आणि या मानवी देहाचें घृणा उत्पन्न करणारें वर्णन एकनाथादि साधुसंतांनी केलें आहे. विनोबांचें निरूपण त्या परंपरेंत बसूं शकेल. विनोबांचें अलौकिकत्व यांत आहे की देहपूजेला सारसर्वस्व मानणाऱ्या आधुनिक काळांत जन्मून या काळांतलीं भाकरीचीं, शास्त्रीय प्रगतीचीं, शरीरसुखवर्धनाचीं सर्व तत्त्वज्ञानें पचवून विनोबा आत्मवादाच्या भूमिकेवर ठाम उभे ठाकले आहेत. त्या सर्वात्मक परमेश्वराच्या पूजेचें देह हें साधन आहे. त्या नात्यानें त्याची कदर करा, त्याला समर्थ राखा, त्यासाठी पुष्टिकारक सात्त्विक आहार घ्या, हें ते आवर्जून सांगतात. पण देहाची पूजा करायची, त्याचे चोचले पुरविण्यांत दंग होऊन राहायचें, ही जी प्रवृत्ति सध्याच्या काळीं सार्वत्रिक झाली आहे तिचा ते निग्रहानें निषेध करण्यास चुकत नाहीत. शरीर म्हणजे 'मातीचा पुतळा' हें बजावण्याची संधि ते सहसा वाया दवडीत नाहीत. रोगोपचाराच्या आणि शरीरपोषणाच्या आधुनिक कल्पनांस अनुलक्षून लिहितांना ते म्हणतात—

"मन चांगलें व्हावयास, बुद्धि निर्मळ राहावयास, काय केलें पाहिजे...हें मनुष्य पाहतच नाही. शरीराचें वजन कसें वाढेल एवढेंच तो बघतो. पृथ्वीवरची ती माती तेथून उठून या शरीरावर कशी थापटली जाईल, तें मातीचे गोळे, लोथे, या शरीरावर कसे थापले जातील, याचीच तो काळजी करून राहिला आहे...बाहेरची माती या अंगावर ओतून घ्यावी, अंगावर चोपडावी व अंगाचें वजन देहाला झेपत नाही इतकें वाढवावें याचें प्रयोजन काय ? हा प्रचंड थलथलीतपणाचा बोजा कां वाढवावा ? हा देह माझ्या हातांतील एक साधन आहे. तें साधन नीट ठेवण्यासाठी ज्या गोष्टी करायला हव्या त्या मी कराव्या.... सारांश देह हें साध्य नसून साधन आहे ही बुद्धि दृढावली तर वृथा अवडंबर जें मनुष्य माजवून राहिला आहे तें माजवणार नाही." (गी. प्र. १६२)

तात्पर्य 'भक्त ऐसे जाणा जे देहीं उदास।' हें वचन ज्याला पूर्णपणे लागू पडतें, आत्मवाद ज्याच्या रोमरोमीं भिनलेला असून तो ज्याने लिहिलेल्या अक्षराअक्षरांतून निथळत आहे, असा विनोबा हा एकटा एकच स्वयंप्रज्ञ साहित्यकार आधुनिक मराठींत निर्माण झालेला दिसतो. प्रासंगिक गोष्टींवर जरी त्यांनी पुष्कळ लेखन केलें असलें तरी त्याच्या आंतली आत्मपरतेची झळाळी लपत नाही. या आत्मपरतेमुळेच त्यांचें लेखन सर्व काळीं सर्व देशांमध्ये आदरणीय ठरण्याजोगें असें झालें आहे. आत्मा जसा दिक्कालाद्यनवच्छिन्न म्हणजे दिशा आणि काल यांचीं कुंपणें नसलेला आहे, तसेंच विनोबांचें लेखन आहे. हीं आधुनिक उपनिषदें आहेत. भाग्य आमचें की तीं मराठींत प्रकट झालीं व होत आहेत.

उपनिषद् म्हणजे काय ? लोकांना प्रकाश देणारी आत्मनिष्ठ पुरुषाची वाणी. गीताप्रवचनांत विनोबांनी अकर्मदशेप्रत प्राप्त झालेल्या ब्रह्मनिष्ठाचें वर्णन केलें आहे तें जणूं स्वतःचेंच वर्णन त्यांच्या तोंडून बाहेर पडलें आहे असें वाटतें— "तो कांही एक कर्म करीत नाही; परंतु सर्व दुनियेला करायला लावतो. त्याच्यामध्यें अपरंपार प्रेरक शक्ति आहे. अकर्माची खुबी तर हीच. अकर्मांत अनंत कार्यास लागणारी शक्ति भरून राहिलेली असते........या अवस्थेंत अकर्मांत कर्म खच्चून भरलेलें असतें व त्यामुळे प्रचंड कार्य होतें." स्थितधी व प्रशांतात्मा अशा या मुनिवर्याचें कर्म आणि अकर्म राष्ट्रामध्ये केवढी शक्ति निर्माण करीत आहे, केवढ्या सत्कर्माच्या राशि प्रसवीत आहे याचा येथे विस्तार करण्याची जरूरी नाही.

विनोबांचें मन भारताच्या जुन्या परंपरेमध्ये मुरलेलें आहे. वैदिक धर्म, स्मार्त धर्म आणि भागवत धर्म या तीन्हींचा गाभा, म्हणजे ज्ञान, कर्म आणि भक्ति यांचा मधुर समवाय या एका व्यक्तींत झालेला दृष्टीस पडतो. पण त्यांचें वैशिष्टय असें की ते जुन्या परंपरेंत मुरूनहि उरले आहेत. नवीन कल्पना आणि

नवीन परिभाषा यांतेंहि सार त्यांत उतरलें आहे. तरुण पिढीला नवीन कल्पना, नवीन शब्द, नवीन मांडणी पाहिजे असते. ते स्वतः म्हणतात : " 'अचित्तं ब्रह्म जुजुपुर् युवानः' ज्याचें चिंतन कोणीं केलेलें नाही तसलें ब्रह्म तरुणांना आवडतें......त्यांना नवीन कल्पना पाहिजे.........पण या जगांत केवळ नवीन असें काय असतें ? सनातन सत्यें जुनींच असतात. पण तींच नवीन पोषाख, नवीन रूप धारण करूं शकतात. आणि तसें झालें म्हणजे तीं नवीन होतात......साप कात टाकतो, पुनः ताजा होतो. ही कात टाकण्याची शक्ति ज्या विचारकांत नाही, तो विचारक कसला ? तो कर्मयोगी तरी कसला ?" 'जुन्या भूमिवर नवी टवटवी' आणण्याचें, 'जुन्यांतून नवी निष्पत्ति' करण्याचें अद्‌भुत सामर्थ्य विनोबांच्या वाणीमध्ये आहे. विनोबांची वाणी आणि कर्म जुन्या परंपरेची वैठक पतकरणारें असूनहि गीतातत्त्वाप्रमाणे 'नित्यनूतन' असल्यामुळे तें सर्वांचें आकर्षणस्थान बनलें आहे.

आकर्षणस्थान कां बनूं नये ? वाचूं लागलें म्हणजे मन डोलूं लागतें आणि वाटतें की मराठींत एक ज्ञानबा, दुसरे तुकोबा आणि तिसरे विनोबा ! अशी अवीट माधुरी इतरत्र कुठे तरी मिळेल काय ? ती माधुरी अनुभवायची, तृप्त व्हायचें आणि तो मधु निष्यन्द आपल्या जीवनांत जिरविण्यास झटायचें. त्याचें विवेचन, विश्लेषण, मीमांसन करणें कसें शक्य आहे ? कांही थोडेंसें शक्य असलें तरी त्याची जरूरी कितपत आहे ? 'देहपूजेची दास्यभक्ति' या लेखांत विनोबा म्हणतात, "साहित्य 'कसें' यापेक्षा साहित्य 'कश्याचें' हा प्रश्न महत्त्वाचा आहे··· आजपर्यंत साहित्य कसें असावें याची चर्चा पुष्कळ झाली आहे." अर्थात् साहित्याचें विवेचन, विश्लेषण विनोबांच्या मतें विशेष महत्त्वाचें नाही. आणि तें अगदी खरें आहे. पण आम्ही मोडकें तोडकें कांही करूं शकत असूं तर हेंच करूं शकतों. या मिषानें तरी त्यांच्या वाणीचें कांही मनन व कीर्तन घडेल.

विनोबांच्या वाणीमध्ये जें सामर्थ्य अनुभवास येतें त्याचें चार प्रकारांमध्ये विश्लेषण होऊं शकेल. प्रत्येक सामर्थ्यप्रकारास शक्ति म्हटल्यास वेचक शक्ति, वेधक शक्ति, बोधक शक्ति आणि प्रेरक शक्ति अशीं यांना नांवें देतां येतील. समजुतीसाठी हें विश्लेषण करायचें. वास्तविक या चारी शक्ति संमीलित होऊन, किंबहुना एकवटून, कार्य करीत असलेल्या सर्वत्र दिसतात, जशीं स्थितप्रज्ञाच्या ठायीं ज्ञान, कर्म आणि भक्ति हीं एकरूप झालेलीं दिसतात. पण विवेचनाच्या सोयीसाठी आणि साधकाच्या समजुतीसाठी जसें या तिघांचें वेगवेगळें विवरण केलें जातें तसें या चारी शक्तींचें वेगवेगळें विवरण केल्यास विनोबा वाणीच्या सामर्थ्याचा अधिक चांगला उमज पडेल, असें वाटतें.

कोणी म्हणेल, 'या नवीनच शक्ति तुम्ही कुठल्या काढल्या आहेत ?' साहित्यशास्त्रज्ञ म्हणतील, 'रस, गुण, अलंकार इत्यादि साहित्यशास्त्रोक्त कल्पनांना धरून कांही विवेचन करायचें सोडून या कसल्या आडरानांत तुम्ही शिरतां आहांत ?' पाश्चात्य वाङ्‌मयविवेचनपद्धतीचे ज्ञाते असाच कांही तरी आक्षेप रूजूं करतील. मला यांना कांही उत्तर देतां येणार नाही. विनोबावाणींत अवगाहन करीत असतां जें सुचलें तें लिहून काढण्याचा प्रयत्न केला आहे. तें कोणत्याहि पद्धतीमध्ये बसो, न बसो.

वेचक शक्ति मी तिला म्हणतों की जिच्यामुळें उद्दिष्ट विषयाला अनुरूप असे मुद्दे, दाखले, किंवा युक्तिवाद लेखकाच्या मनापुढे नेमके येऊन उभे राहतात. अत्यंत उचित अशा गोष्टी जिथे पाहिजेत तिथें सुचणें हें विशुद्ध उज्ज्वल प्रतिभेचें एक मोठें लक्षण आहे. विनोबांच्या रचनेंत तें सर्वत्र आढळतें.

प्रेमधर्माचें प्रतिपादन करण्यासाठी कोणता मुद्दा किंवा दाखला घ्यावा ? मायलेकरांचा सर्वत्र घेण्यांत येतो, हें ठीकच आहे. विनोबांचाहि तो आवडता दृष्टान्त आहे. पण दाखला म्हणून नव्हे, तर प्रेमधर्माच्या प्रत्यक्ष प्रयोगाकरितां म्हणून मानवानें आपला शाश्वत शत्रु म्हणून मानलेला प्राणी जो साप त्याला आणून पुढे उभें केलें आहे. प्रेमाचें प्रतिपादन अखेरच्या सीमेपर्यंत नेण्यासाठी यापेक्षा अधिक चांगला प्रतियोगी दुसरा कोणता सापडणें शक्य आहे ? "साप विषारी असला तरी मनुष्याच्या मनांतला हा दीर्घद्वेष कमी विषारी नाही. त्याची सापाच्या विषारीपणावर ताण आहे" अशी तीव्र कानउघाडणी करून "आलेल्या

अनुक्रमणिका

अतिथीची जर दुष्टपणाबद्दल ख्याति असली तर ही आपल्या सत्त्वपरीक्षेची वेळ आहे अशी मनांत पक्की खूणगाठ बांधून ठेवावी. समोरचा जर अतिशय दुर्जन असेल तर आपलें सर्व सौजन्य एकवटून त्याचा सत्कार करावा " असें तत्त्व नागपंचमीच्या सणाच्या निमित्ताने विनोबांनी सांगितलें आहे. सर्व सृष्टीमध्ये परमेश्वर पाहण्याच्या उपक्रमांतहि त्यांनी गीताप्रवचनांत सापाला दाखल केलें आहे. ज्याच्याविषयीचा तीव्र द्वेष माणसाच्या हाडींमासीं खिळला आहे त्याच्यावर प्रेम करा, त्याला अतिथि माना, त्याच्यांत परमेश्वर पहा, असें सांगणें, ही आत्मनिष्ठतेची पराकाष्ठा झाली. विनोबांच्या वेचकशक्तीचें हें फार मोठें उदाहरण मी मानतों.

स्वराज्याचा राम भारतांत नव्हता तेव्हाचा तो काळ; विनोबाजी तुलसी रामायणाचें माहात्म्य वर्णन करायला बसले. रामवियोगाने तळमळणाऱ्या, पण वियोगावस्थेंतहि संयमाने कर्तव्यपालन करणाऱ्या भरताची भूमिका नेमकी वेचून काढून तिचें हृदयस्पर्शी निरूपण त्यांनी केलें. " आमच्या नशिबीं परमेश्वराच्या वियोगांत राहून काम करण्याचें लिहिलें आहे'' वियोगाचेंहि भाग्य कसें बनवितां येतें हें समजण्याला भरताचा आदर्श आम्हांला उपयोगी आहे. " असें ते म्हणतात.

' दास–नवमी ' वरती लेख. समर्थांचा उल्लेख त्यांत येणारच. पण विनोबांच्या वेचक शक्तीची खुबी ही, की माघ वद्य नवमीसच सिंहगडावर वीर तानाजी मालुसरे याचा देह पडला, त्याचें स्मरण त्यांना झालें आणि त्याच्या वीरतेच्या वर्णनाने त्यांचा लेख भरून गेला. तानाजी वीर असूनहि दास कसा होता,

देवाच्या सख्यत्वासाठी।
पडाव्या जिवलगांसी तुटी।
सर्व अर्पावें सेवटीं।
प्राण तोहि वेचावा॥

हें समर्थांच्या उपदेशाचें सार तानाजीनेच कसें आचरणांत आणून दाखविलें, इत्यादि भाग अत्यंत मनोरम आहे. पुढें मावळे पळूं लागले असतां त्यांना परतविणारा 'मी तो दोर पूर्वीच कापून टाकला आहे' हा सूर्याजीचा महामंत्र आणि तोच अर्थ आध्यात्मिक भूमिकेवरून सांगणारें गीतेचें वचन–

अश्वत्थमेनं सुविरूढमूलम्। असंगशस्त्रेण दृढेन छित्वा॥
ततः पदं तत् परिमार्गितव्यम्

इत्यादि सर्व भाग इतका गोड आहे की त्याची मनाला मिठी बसते.

दासनवमीवरील लेखांत नुसतें समर्थांचें माहात्म्य वर्णन केलें असतें तर विनोबांच्या वाणीने तेंहि हृदयंगम केलें असतें. पण तानाजीची प्रसंगोचित आठवण काढून समर्थ हे दासवीर व तानाजी हा वीरदास या दोघांच्या मीलनाचें जें रसायन विनोबांनी बनविलें आहे त्याची रसवत्ता कांही विलक्षण आहे.

प्रतिपाद्य विषयाचें कालोचित व प्रसंगोचित अंग नेमकें सुचणें किंवा निवडून काढणें, परिणामकारक वचनें, गोष्टी अगर दाखले विषयाला अनुरूप असे नेमके दाखल करणें हें प्रतिभावंताचें लक्षण आहे. पण विनोबांची वेचक शक्ति अद्भुत आहे. अपूर्व वस्तु निर्माण करण्याचें सामर्थ्य तिच्या अंगीं आहे. इतर प्रतिभावंतांच्या निवडीचें औचित्य आपणास पटतें व आनंद देतें. पण विनोबांची वेचक शक्ति इतर कोणाच्या लक्षांत येणार नाही असलें अपूर्व औचित्य निर्माण करते; तें औचित्य पाहून आपण विस्मयचकित होतों. त्यांच्या वेचक शक्तीने खेचून आणलेल्या गोष्टी आपल्या मनावर कायमचा ठसा उमटवितात, आपलें अंतःकरण उद्दीपित करतात. योगस्थ पुरुषाचें हें सामर्थ्य होय.

दुसरी वेधक शक्ति. वाचकाचें चित्त वेधून घेणारा जो जो गुण किंवा धर्म तो तो वेधक शक्तींत अंतर्भूत होतो. तसें पाहिलें तर विनोबांचें सर्वच लिखाण वेधक शक्तीचें उदाहरण म्हटलें पाहिजे. योगस्थ पुरुषाची ही वाणी सर्वगुणपूर्ण आहे असें यथार्थत्वाने म्हणतां येईल. पण हा 'पूर्ण मदः पूर्णमिदं' अशा तऱ्हेचा तत्त्वार्थ झाला. त्याचा आश्रय केला म्हणजे ' उपशान्तोऽयमात्मा ' असें म्हणण्याची पाळी येऊन बोलणेंच खुंटायचें. तेव्हा विवेचनाला अवसर मिळण्यासाठी खालच्या पायरीवर येऊन पाहिल्यास तारतम्याला कांही अवसर मिळेल. त्यांतल्या त्यांत

अर्थाची रमणीयता वा आल्हादकता ज्या ज्या ठिकाणीं विशेष प्रत्ययास येते, तेथे वेधक शक्तीचा उल्लास आहे असें जाणावें. अर्थाच्या रमणीयत्वाचे स्थूलमानाने दोन प्रकार मानण्यांत येतात: कल्पनाचमत्कृति आणि भावाभिव्यक्ति. यांना साहित्यशास्त्राच्या परिभाषेंत अलंकार व रस असें म्हणण्यांत येतें आणि यांच्या प्रपंचानेच साहित्यशास्त्राचा बहुतेक सर्व प्रांत व्यापला आहे.

विनोबांच्या साहित्यांत वेधक शक्तीचाच उल्लास इतका दृष्टीस पडतो की तो पाहून मन विस्मयानंदाच्या तरंगांवर नाचूं लागतें. अर्थगत चमत्कृतीनें तर त्यांचें लिखाण गजबजलें आहे. ठायीं ठायीं दृष्टान्त, विरोधाभास आणि अनपेक्षित युक्तिवाद यांचा आढळ होतो. 'उपमा श्लेष कोंदा कोंदी' असें ज्ञानेश्वरांनी स्वतःच्या रचनेविषयी म्हटलें, तें विनोबांच्या लेखनास कसें न लागू पडावें ?

विनोबांचे दृष्टान्त अगदी साधे, सूर्य, पाणी, वृक्ष यांसारख्या नित्यपरिचयाच्या सृष्ट वस्तूंचे असतात. त्यांतली सगळी खुबी कोणत्या गुणाचें दिग्दर्शन करण्याकरितां ते आणलेले असतात, यांत असते. योजकतेंत खरें सौन्दर्य ! (वास्तविक सगळीकडेच असें असतें, नाही का ?) सूर्य, आई यांचे दाखले त्यांनी निरनिराळ्या गुणांचें प्रतिपादन करण्याकरितां निरनिराळ्या ठिकाणीं घेतलेले दिसतील. सूर्याचा दाखला एके ठिकाणीं घेतला; कशाकरितां, मतप्रचाराची मर्यादा दर्शविण्याकरितां:—

"सूर्याची प्रचारक शक्ति किती जबरदस्त आहे ? पण तोहि मर्यादा संभाळून असतो. त्यामुळे तो दुनियेचा मित्र राहून प्रचारहि करूं शकतो. दार बंद करून कोणी निजला आहे तर सूर्य त्याची सेवा करण्यासाठी त्याच्या दाराशीं येऊन उभा राहतो. पण दाराला धक्का देऊन आंत शिरत नाही. मात्र दार जरा किलकिलें झालें की सबंधच्या सबंध आंत शिरला. ही प्रचाराची मर्यादा होय."

दृष्टांत अगदी साधा. पण त्याचा विनियोग किती हृदयंगम आणि जीवनोपयोगी ! मांडणी किती मोहक व सूचक ! मतप्रचाराचा आदर्श तर दाखविलाच. प्रचारक प्रथम मित्र व पुढे सेवक असला पाहिजे हें सुचविलें. अंतर्गत सामर्थ्य प्रचंड असलें तरी प्रचाराकरितां अल्पशक्तीचा, तोहि सौम्यपणें उपयोग करावा हेंहि सुचविलें.

मर्यादावृत्तीची अगदी निराळी बाजू प्रतिपादन करीत असतांना घेतलेला पाण्याचा दृष्टान्त पहा।—

"पाण्यासारखी मर्यादावृत्ति राखावी. पाणी ज्याप्रमाणे रस्त्यांतला खड्डा भरून काढल्याशिवाय पुढे सरत नाही, त्याचप्रमाणे आधी आपल्या गावांतला खड्डा बुजवून मग दुसरीकडे मोर्चा वळवावा. ह्यांतच स्वदेशी धर्माची खुबी वाहे. स्वदेशी धर्म नम्र आहे. तो आधी जवळ पाहतो. मग दूर. मग त्याहून दूर."

लगेच पुढे मदतीला धावून जाण्याच्या वृत्तीसाठी पुन्हा पाण्याचा दृष्टांत घेतला आहे, तोहि असाच हृदयंगम आहे. "पाण्याचे बिंदु पडूं पाहणारा खळगा भरून काढण्यासाठी चारी बाजूंनी धावून येतात."

गीताप्रवचनाच्या १५ व्या अध्यायांत 'देहांत रामायण रचलें जात आहे' असें रूपकात्मक प्रतिपादन आहे.—

"रामायणांत रावण, कुंभकर्ण व बिभीषण हे तिघे भाऊ आहेत. कुंभकर्ण तमोगुण आहे, रावण रजोगुण आहे, बिभीषण सत्वगुण आहे. आपल्या शरीरांत या तिघांचें रामायण रचलें जात आहे. या रामायणांत रावण कुंभकर्णांचा नाशच विहित आहे. फक्त बिभीषण–तत्त्व, जर तें हरिचरणशरण होईल तर उन्नतीला साधक व पोषक होऊं शकेल, म्हणून संग्राह्य."

रूपक किती चपखल बसविलें आणि जीवनदायी बोध किती सहज रीतीनें काढून दाखविला !

'इंद्राय तक्षकाय स्वाहा' हा दृष्टान्त अनेकवार येतो. गीता प्रवचनें १८ वा अध्याय—

"सदोष अशीं जीं सात्विक कर्में तीं कशीं टाळावयाचीं ? गंमत अशी आहे की 'इंद्राय तक्षकाय स्वाहा' असें जेव्हा मनुष्य जगांत करूं लागतो, त्या वेळेस इंद्र अमर असल्यामुळे नाहीच मरत परंतु तक्षक सुद्धा न मरतां मजबूत होऊन बसतो ...या असल्या सळमिसळीच्या विवेकहीन त्यागाने पुण्यरूप इंद्र तर

नाहीच मरत; परंतु दोषरूप तक्षक मरता तोहि मरत नाही."

साधा वृक्षाचा दृष्टान्त, पण तो किती मनोहर शैलीने सांगितला आहे व किती उदात्त जीवनधर्माचा बोध त्यांतून काढला आहे! उतारा लांब आहे असें वाचकांनी म्हणूं नये. विनोबांची वाणी जास्तींत जास्त सादर करणें हें या लेखाचें मोठें सार्थक आहे —

"एक दिवस मी उन्हांत फिरत होतों. चहूंकडे मोठमोठे हिरवे वृक्ष दिसत होते. मी विचार करूं लागलों की वरून इतकें कडक ऊन लागत आहे, तरी हे वृक्ष इतके हिरवेगार कसे दिसतात? ते वृक्ष माझे गुरू बनले. माझ्या लक्षांत आलें की जे वृक्ष वरून इतके हिरवेगार दिसत आहेत त्यांचीं मुळें जमिनींत अति खोल गेलीं आहेत आणि तेथून ते पाणी घेतात. याप्रमाणे वरून ऊन आणि खालून पाणी या दोहोंच्या कृपेमुळे हा सुंदर हिरवा रंग त्यांना मिळाला आहे. त्याप्रमाणे आम्हांला आंतून भक्तीचें पाणी आणि बाहेरून तपश्चर्येचें ऊन मिळेल तर आम्ही उंच वृक्षांप्रमाणे हिरवेगार होऊं."

डॉक्टरी औषधाचा दृष्टान्त—

"डॉक्टर औषध देतो...तें घरीं आणल्यावर बाटलींत वर पाणी आणि खालीं औषध असें होतें. म्हणून डॉक्टर रोग्याला सूचना करून ठेवतो की औषध घेतांना बाटली हलवून घे. हलविल्याने संबंध औषध ढवळलें जातें व औषधांतला गुण पदरीं पडतो. समाजाचीहि अशीच स्थिति आहे. समाज जर मथून मथून ढवळला गेला नाही, तर...समाजाची आरोग्यशक्ति कमी होते."

सीधे दृष्टान्त, उपमा किंवा रूपकें यांपेक्षा शैलीची खरी बहार दृष्टान्तकथांमध्ये दिसून येते. विनोबांच्या लेखनाचें हें निरुपम वैशिष्टच आहे. दुसरीकडून घेतलेली किंवा स्वतः रचलेली गोष्ट सांगण्यांत विनोबांचा हातखंडा आहे. तिच्या योगाने प्रतिपाद्य विषय तर उजळला जातोच, शिवाय तिच्या शब्दाशब्दांतून विनोद आणि स्थलविशेषीं नर्मपरिहास पाझरत असतो. ज्यांना घेतले त्यांनाहि रम्य वाटावेत असे रेशमी चिमटे घ्यावे विनोबांनीच.

फायदा काय' या अतिसुंदर लेखाच्या आरंभीं युक्लिड आणि राजाची गोष्ट सांगितली आहे. दुसरीकडून घेतलेल्या गोष्टींपैकी परिहास, विनोद, औचित्य या सर्व दृष्टींनी ती उदाहरणादाखल घेतां येईल.

"युक्लिड हा ग्रीसचा राहणारा. तो ज्या काळांत होऊन गेला त्याकाळीं ग्रीस देशांतल्या सर्व शिकलेल्या लोकांचीं डोकीं राजकारणाने भरून गेलीं होतीं. किंवा त्यांच्या डोक्यांत राजकारणाचे बटाटे भरले होते असें म्हटलें तरी चालेल.... तथापि आज ज्याप्रमाणे चरख्यावर फिदा झालेल्या एका माणसाने बऱ्याच मुत्सद्दी लोकांना डोकें खाजवावयास लावलें आहे त्याप्रमाणे युक्लिडनेहि पुष्कळ राजकारणी लोकांना रेघोट्या काढावयास लाविलें होतें....बरेचसे राजकारणी लोक अश्या प्रकारें युक्लिडच्या नादीं लागलेले पाहून एका राजाला वाटलें, "आपणहि जाऊन पाहावें, फायदा होईल." तो युक्लिडपाशीं येऊन एक हप्त्याभर भूमिति शिकला. शेवटीं त्याने युक्लिडला विचारलें, "मी आज सात दिवस झाले भूमिति शिकतों ह्याचा फायदा काय?" युक्लिड गंभीरपणे आपल्या एका शिष्याला म्हणाला, "अरे, ह्याला रोजीं चार आणे प्रमाणे सात दिवसांचे पावणे दोन रुपये देऊन टाक पाहूं." नंतर त्या राजाकडे वळून म्हणतो, "तुमचें ह्या हप्त्याचें काम संपलें आहे. तुम्ही उद्यापासून दुसरीकडे काम बघा." मुत्सद्दी राजा खजील होण्याऐवजी पावणे दोन रुपये हातांत पडल्यामुळे खुश झाला असेल काय? आपली मनोवृत्ति ह्या ग्रीक राजासारखी बनली आहे."

जर आपण मनावर घेऊं तर आपला जीवनपथ उजळूं शकणाऱ्या अशा कितीतरी हृदयंगम दृष्टान्तकथा विनोबांच्या लिखाणांत विखुरल्या आहेत. 'त्याग आणि दान' या लेखांतील त्यागी माणसाची व घोड्याची कथा, 'स्वरूप पहा' यांत आरंभींच आलेली श्रीमंताच्या मुलाची गोष्ट आणि नारदाच्या पृथ्वीप्रदक्षिणेची गोष्ट, 'कृष्णभक्तीचा रोग' यांतील ब्रह्मदेवनिर्मित टीकाकाराची कथा, 'मुलें निघून जातील' या निबंधांतील कल्पवृक्षाची रूपककथा, गीताप्रवचनाच्या पांचव्या अध्यायांतली चांगदेवाच्या कोऱ्या पत्राची हकीकत,

अनुक्रमणिका

अठराव्या अध्यायांतील गोरखनाथाने मुलाला आपटून वाळत टाकल्याची आख्यायिका, त्याच्याच पुढच्या पानावरची सगळी सृष्टि अमंगळ वाटणाऱ्या गृहस्थाची कथा, 'स्वच्छास्वच्छता व अस्पृश्यता' यांतील पतिव्रतेची व ज्ञानी खाटकाची कथा, अशा किती किती कथा उल्लेखाव्या ?

अशा कथांमध्ये बहुधा संवादाची योजना करून मनोरंजकता आणलेली असते. बोध तर या कथांचा आत्माच. पण त्याबरोबरच विनोदाचे पाझर आणि व्याजोक्तीचे तुषार यांचा लाभ होण्याचीहि सोय केलेली असते. कित्येक वेळां प्रतिपादनाचा रोख स्वतःच्या अंगावर घेऊन स्वतःची हकीकत सांगितल्यासारखें करतात, त्यामुळे परिणामकारकतेंत भरच पडते.

'श्रमजीविका' या लेखांत अशाच तऱ्हेने ते म्हणतात.—"आजच सकाळीं गोष्टी झाल्या. कोणीसें म्हटलें, "आता विनोबाजी शेतकऱ्यासारखे दिसतात." तर दुसरा म्हणतो, "पण जोंवर त्यांचें धोतर पांढरें आहे तोंवर ते पूर्ण शेतकरी नाहीत." या विधानांत एक दंश होता. शेती आणि स्वच्छ धोतर यांचें उभें वैर आहे, या धारणेंत दंश आहे...आपली स्वच्छता केवळ बाह्यांगी आणि दिखाऊ असते. आम्हांला शंका येते की शेतांत राबणारा शेतकरी कसा स्वच्छ राहूं शकतो. परंतु...शेतकऱ्याच्या कपड्यावर जो मातीचा रंग असतो तो मळ नसतो. इ० इ०"

तसेंच गीताप्रवचनामध्ये दहाव्या अध्यायांत सापामध्ये भगवंताचें रूप पाहावयास सांगतांना—"काय काय हिंदु धर्मामध्ये खुळें, असें तुम्ही म्हणा. परंतु नागपूजा करायला सांगितली आहे खरी. लहानपणीं मी आईला म्हणे, "बाजारांत चांगलें चित्र मिळतें." आई म्हणे, "तें रद्दी; तें नको. मुलाच्या हातचें तें चांगलें" मग त्या नागाची पूजा करावयाची."

अशा किती तरी स्वकथा, परकथा, लघुकथा, लघुतम कथा, वैदिक कथा, पौराणिक कथा, ऐतिहासिक कथा, काल्पनिक कथा, यांनी विनोबांच्या लेखनास अपरंपार गोडी आगली आहे. लेखकाची मार्मिकता, विद्वत्ता, समयसूचकता यांची त्या साक्ष देतात.

विनोबांच्या मध्ये विनोदाला स्थान असेल असें, त्यांच्या वाङ्मयाशीं ज्यांचा परिचय नाही त्यांना सहसा वाटणार नाही. पण दोन्ही शब्दांमध्ये एका अक्षराचाच फरक असल्यामुळे जणूं काय, विनोबा आणि विनोद यांचें साहचर्य फार मोठ्या प्रमाणांत आढळून येतें. 'देहपूजेची दास्यभक्ति', 'कृष्णभक्तीचा रोग', 'फायदा काय' अशा कांही लेखांच्या शब्दाशब्दामधुन विनोदाचे मधूबिंदु ठिबकत आहेत असें म्हटलें तरी चालेल. वर उद्धृत केलेली युक्लिडची गोष्ट विनोबांच्या विनोदाचा मासला म्हणून दाखवितां येईल. त्याच लेखांत पुढे—"ह्या फायदावादी लोकांनी आपली फायदेशीर बुद्धि जरा पुढे चालविली तर ते तत्त्वज्ञानाचें शिखर गाठतील. तत्त्वज्ञानाच्या शिखरापासून हे लोक एकच प्रश्न मागे आहेत. तो प्रश्न म्हणजे "फायद्यापासून तरी फायदा कोणता" हा होय..." जितका परिहास तितकेंच उदात्त आत्मज्ञान साठविलेलें आहे या शब्दांत.

विनोदाची खुलावट संवादामध्ये अधिक चांगली होऊं शकते. ही तांत्रिक खुबी विनोबांनी पुष्कळ ठिकाणीं अवलंबिलेली दिसते. 'साक्षर की सार्थक' या लेखांत पुस्तकी ज्ञानाचा वायफळपणा वाचकांच्या मनावर ठसविण्यासाठी नाना युक्तिवाद करून अखेर विनोबा संवादावर येतात—

"दुसऱ्याच्या अनुभवाने शहाणपण शिकण्याची माणसाला इच्छा होत नाही. त्याला स्वतंत्र अनुभव पाहिजे. स्वतंत्र ठेचा पाहिजेत. मी चांगला सांगतों की "पुस्तकांपासून कांही फायदा नाही..." तर तो म्हणतो, "तुम्ही पुस्तकें वाचून चुकलां आणि मला असा उपदेश करतां ?" "होय मी पुस्तकें वाचून चुकलों. पण तूं चुकूं नये म्हणून सांगतों." तो म्हणतो, 'मला अनुभव पाहिजे." "ठीक आहे. घे अनुभव. ठेचाळण्याचें स्वातंत्र्य हा तुझा जन्मसिद्ध हक्क आहे."

शब्दांशीं खेळण्याची किंवा कोटि करण्याची विनोबांची हौस येथे दिसून येते. चुकणें याचा दोन अर्थीं प्रयोग करून इथे कोटि साधली आहे. परिहास, उपहास, कोटि यांचें संमिश्रण होऊन इथे विनोदनिर्मिति झाली आहे.

पुस्तकी विद्या आणि ती देऊं करणारी चालू शिक्षणपद्धति यांच्यावर विनोबांचा मोठा कटाक्ष आहे. प्रसंग उद्भवला तेव्हां त्यांच्यावर साक्षात् टीका त्यांनी केली आहे व शिक्षणासंबंधीचे आपले क्रांतिकारक विचार सांगितले आहेत. पण इतर विषय चालू असतांना त्याच्या ओघांत सध्याचें शिक्षण, शिक्षक व शिक्षित यांना आणून त्यांना कोपरखळी देण्याची संधि देखील ते साधतात. गीता प्रवचनाच्या आठव्या अध्यायांत 'मरणाचें स्मरण असावें' हा विषय चालला असतां अलीकडील विद्यार्थ्यांच्या अंधळचा वृत्तीची हजेरी घेतात आणि नंतर कॉलेजांतल्या प्रोफेसराकडे ते वळतात—

" कॉलेजमध्ये प्रोफेसर तर्कशास्त्र शिकवितो. " मनुष्य मर्त्य आहे. साक्रेटिस मनुष्य आहे. अर्थात् तो मरणार." असें अनुमान प्रोफेसर शिकवितो. तो साक्रेटिसाचें उदाहरण देतो. स्वतःचें कां देत नाही ? ....तें मरण साक्रेटिसावर ढकलून देतो. कारण साक्रेटिस मरून चुकलेला आहे, तो हजर नसतो. तक्रार करावयास. शिष्य व गुरु साक्रेटिसास मरण अर्पून स्वतःच्या बाबतींत 'तेरी भी चूप, मेरी भी चूप' असे राहतात. आपण अति सुरक्षित आहोंत असें जणूं त्यांना वाटत असतें. "

बिचारा प्रोफेसर ! विनोबांची आत्मनिष्ठा आणि मरणाविषयी सावधानता त्याच्या अंगीं अंगीं असती तर कॉलेजांतील बाकांपुढे चर्पटपंजरी करीत तो कशाला बसला असता ? विनोबांच्या उपहासाला तो विषय झाला हें त्याचें मोठें भाग्य मानलें पाहिजे.

उपहासाला विषय कालेजांतला प्रोफेसरच होतो असें नाही. तोच उपहासाचा हात ग्रामसेवकावरूनहि फिरूं शकतो, कारण त्यांत उपहासाबरोबर प्रेमाचा ओलावाहि आहे.

" खादी वापरणारे गाईच्या दुधाची पर्वा करीत नाहीत, गोसेवक खादी वापरीत नाहीत, आणि दोघेहि ग्रामोद्योगाच्या वस्तु वापरीत नाहीत. असें कां ? तर म्हणतात, महाग पडतें ! गाईच्या दूधवाल्याला ग्रामोद्योगाची ढेप महाग पडतें...तात्पर्य, आम्ही एकमेकांचे मित्र एकमेकांना महाग पडतों. म्हणूनच कदाचित् इंग्रजींत 'डियर फ्रेंड' म्हणत असावेत. पण ज्यांना मित्र महाग पडतात त्यांना शत्रु स्वस्त होतात ! "

नर्मपरिहास, कोटि., विरोधाभासयुक्त अर्थान्तरन्यास इत्यादि अनेक गोष्टींचें मधुर मिश्रण या लहानशा वेच्यांत झालें आहे.

विनोबांचा सारा विनोद, परिहास, कोटिबाजपणा बोधाकरितां आहे. जें आध्यात्मिक बाबतींत तेंच साहित्यांत. शरीरादि सर्व साधनें ज्याप्रमाणे अध्यात्माकरितां राबवायचीं त्याप्रमाणे साहित्याचीं रसालंकार विनोदादि सर्व साधनें शिवेतरक्षति (आत्मकल्याण) हें जें महान प्रयोजन त्याकरितां राबवायचीं.

जसें सादृश्यदर्शन तसाच विरोधाभास. त्यांतहि विरोधदर्शनाकडे विनोबांची प्रवृत्ति विशेषच दिसते. त्याचें कारण म्हणूनच जणूं कांही त्यांनी आरंभी आरंभीच्या एका लेखांत ('स्वरूप पहा') सांगितलें आहे—" आम्ही जग सुधारण्याचा ठेका घेऊन बसतों आणि जगांत 'आमची'हि गणना होते एवढी मुद्याची गोष्ट लक्षांत घेत नाही. त्यामुळे आमचें सारें चरित्र म्हणजे 'विरोधालंकाराचें' उदाहरण झालें. आहे." आमच्या चरित्राला योग्य मार्ग दर्शविण्यासाठीच ज्यांचा अवतार आहे, त्यांनी या विरोधालंकाराचें उद्‌घाटन साक्षेपीपणानें करावें यांत नवल काय ? आणि खरोखरच तपासणी जर केली तर विरोधाभासाचा उपयोग विनोबांनी आमच्या जीवनांतील विसंगति, असमंजसता, उक्तिकृतिविरोध इत्यादि दोष दाखविण्याकरितां केला आहे असेंच दिसून येईल. वरील उताऱ्याच्या पुढचेंच वाक्य पहा—

" आम्ही मौनाच्या प्रचारासाठी व्याख्यानें देतों आणि प्रचार झाला नाही म्हणजे विचारांत पडतों. पण उलगडा होत नाही. होईल कसा ? "

निढळोर लोकांना 'कृष्णभक्त' अशी संज्ञा देऊन त्यांचें जें वर्णन 'कृष्णभक्तीचा रोग' या लेखांत त्यांनी केलें आहे त्यांतील एक चमत्कृतिजनक विरोधाभासात्मक मासला पहा—

" दिवसां डोळे मिटले म्हणून अंधार आणि रात्रीं डोळे उघडले म्हणून अंधार. असा स्थितप्रज्ञाच्या कार्यक्रमावरहुकूम ह्या लोकांचाहि (कृष्णभक्तांचा)

कार्यक्रम आहे. पण भगवंतांनी स्थितप्रज्ञाला मोक्ष दाखविला आहे तर यांची रवानगी कपाळमोक्षाकडे केली आहे."

'स्वच्छतेचें इंद्रिय आवरा' या लेखांत अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाचा विषय माळवीत असतां—

"लोक म्हणतात, 'इतरत्र ठीक आहे. पण देवळांत कसें जमणार ?' मी म्हणतों 'इतरत्र जमत नसल्यास आपण त्याचा कांही तरी अर्थ कल्पूं शकूं. पण देवळांत सहजच जमलें पाहिजे. लोक म्हणतात, 'देवळांत मुळीच जमणार नाही, कारण देवळें पवित्र आहेत.' मी म्हणतों, 'देवळांत सहजच जमलें पाहिजे, कारण देवळें पवित्र आहेत.'"

विरोधी विधानांच्या संतुलनाने इथे मोठी चमत्कृति साधली असून थोडक्यांत फार मोठा अर्थ आणला आहे.

'फायदा काय ?' या अतिसुंदर लेखाची सुरवात युक्लिडच्या दृष्टान्तकथेने झाली आहे हें आपण मागे पाहिलें. त्याचा शेवट तितक्याच बहारीच्या विरोधाभासाने झाला आहे. —

"जोंपर्यंत तकलीफ सहन करण्याची तयारी झाली नाही तोंपर्यंत फायदा दिसणारच नाही. फायद्याचें घर नुकसानीच्या उन्हांत बांधलेलें आहे."

अहिंसेच्या प्रतिपादनांत तर विनोबांनी विरोधाभासाची मोठीच मौज केली आहे. जशास तसें या तत्वाची त्याच नांवाच्या लेखांत हळुवार पद्धतीने जी थट्टा केली आहे तशी करणें ही विनोबांचीच चातुरी. इतरांना तें साधणें नाही. त्याच विषयाचें निराळ्या रीतीनें प्रतिपादन 'सिंहावलोकनां'तील 'अयशाचा शक' या उदात्तमनोहर लेखांत केलें आहे. तलवारीचें उदाहरण दोन्ही लेखांत घेतलें आहे. त्यांतील विरोधाभास पहा—

"'शत्रूवर प्रेम करा'! केवढें महान शौर्य! बळकट हृदयाशिवाय कोण एवढी हिंमत करणार ? पण आम्हांला वाटतें जो तलवार उपशील तो बलवान. अरे, जेव्हा तूं तलवार घेतलीस तेव्हाच तूं दुबळा पडलास ! तुकारामाने विनोद केला आहे—'ढाल तलवारें गुंतले हे कर, मी झुंजार कैसा झुंजूं ?'"

शिक्षण हा विनोबांचा आवडता विषय; आणि प्रचलित शिक्षणपद्धतीची झडती घेणें ही त्यांच्या लेखणीची हौसेची कामगिरी. 'फक्त शिक्षण' या लेखांत एक संवाद, ज्यांत त्यांच्या लेखणीला उपरोधाची धार चांगलीच लागली आहे, आणि त्यानंतर शिक्षणविषयक जुन्या कल्पनांची छेडणी व नव्या कल्पनांची फोडणी असें साहित्य आहे. सध्याच्या फक्त शिक्षण देणाऱ्या शिक्षकांना उद्देशून ते म्हणतात—

"ह्या फक्त शिक्षणावर जगणाऱ्यांना मनूनें 'भृतकाध्यापक' उर्फ 'पगारखंद शिक्षक' असें नांव दिलें असून त्यांचा श्राद्धाच्या कामीं निषेध केला आहे. बरोबरच आहे. श्राद्धांत मृतपूर्वजांची स्मृति जिवंत करावयाची असते. ज्यांनी प्रत्यक्ष जीवन मृत करून दाखविलें त्यांचा ह्या कामीं काय उपयोग ?"

उदाहरणें किती देणार ? विनोबांचें सगळें लिखाण विरोधाभासाच्या चमत्कृतीनें गजबजलेलें आहे. त्यांतल्या त्यांत 'मधुकर'मध्ये समाविष्ट झालेल्या त्यांच्या आरंभीआरंभीच्या लेखनांत याचा प्रकर्ष दिसून येतो.

उपमा दृष्टान्त, विनोद परिहास, विरोधाभास इत्यादि अर्थचमत्कृतीचीं साधनें पारिजाताच्या झाडाखाली फुलांचा सडा पडावा त्याप्रमाणे विनोबांच्या लिखाणांत कशीं गजबजून गेलेलीं आहेत हें पाहिलें. वेधकशक्तीचें दुसरें अंग जें भावनांचा उल्लास-याला आपण इथे सोयीसाठी 'काव्य' म्हणूं—त्याचाहि यथोचित प्रकर्ष विनोबांच्या लिखाणांत दिसून येतो. एवढें खरें की, विनोबांचें लिखाण बोधाकरितां अवतरलें असल्यामुळें त्यांत बुद्धिवाद, विचार आणि प्रेरणा यांच्यावर मुख्य भर असलेला आढळतो. सहसा भावनांना आवाहन करण्याची त्यांची रीत नाही. विचारांची बुद्धीला पटेल अशी चमत्कृतिपूर्ण मांडणी त्यांच्या निबंधांत केलेली असते. क्वचित् कोठे भावनांचा सूक्ष्म संनिवेशहि असतो. पण भावनांना प्रामुख्याने आवाहन केलेलें अशीं स्थळें एकंदरीने कमी. तथापि त्यांच्या वाणींत जेव्हा काव्य विलसूं लागतें तेव्हा—

जेथ शांताचेया घरा। अद्भुत आला आहे पाहुणेरा।
आणि येरां हि रसां पांतिकरां। जाला मानु॥

पुस्तकी विद्या आणि ती देऊं करणारी चालू शिक्षणपद्धति यांच्यावर विनोबांचा मोठा कटाक्ष आहे. प्रसंग उद्भवला तेव्हा ह्यांच्यावर साक्षात् टीका त्यांनी केली आहे व शिक्षणासंबंधीचे आपले क्रांतिकारक विचार सांगितले आहेत. पण इतर विषय चालू असतांना त्याच्या ओघांत सध्याचें शिक्षण, शिक्षक व शिक्षित यांना आणून त्यांना कोपरखळी देण्याची संधि देखील ते साधतात. गीता प्रवचनाच्या आठव्या अध्यायांत 'मरणाचें स्मरण असावें' हा विषय चालला असतां अलीकडील विद्यार्थ्यांच्या अंधळ्या वृत्तीची हजेरी घेतात आणि नंतर कॉलेजांतल्या प्रोफेसराकडे ते वळतात—

"कॉलेजमध्ये प्रोफेसर तर्कशास्त्र शिकवितो. "मनुष्य मर्त्य आहे. साक्रेटिस मनुष्य आहे. अर्थात् तो मरणार." असें अनुमान प्रोफेसर शिकवितो. तो साक्रेटिसाचें उदाहरण देतो. स्वतःचें कां देत नाही ? ....तें मरण साक्रेटिसावर ढकलून देतो. कारण साक्रेटिस मरून चुकलेला आहे, तो हजर नसतो. तक्रार करावयास. शिष्य व गुरु साक्रेटिसास मरण अर्पून स्वतःच्या बाबतींत 'तेरी भी चूप, मेरी भी चूप' असे राहतात. आपण अति सुरक्षित आहोंत असें जणूं त्यांना वाटत असतें."

बिचारा प्रोफेसर ! विनोबांची आत्मनिष्ठा आणि मरणाविषयी सावधानता त्याच्या अंगीं अंगीं असती तर कॉलेजांतील बाकांपुढे चर्पटपंजरी करीत तो कशाला बसला असता ? विनोबांच्या उपहासाला तो विषय झाला हें त्याचें मोठें भाग्य मानलें पाहिजे.

उपहासाला विषय कालेजांतला प्रोफेसरच होतो असें नाही. तोच उपहासाचा हात ग्रामसेवकावरूनहि फिरूं शकतो, कारण त्यांत उपहासाबरोबर प्रेमाचा ओलावाहि आहे.

"खादी वापरणारे गाईच्या दुधाची पर्वा करीत नाहीत, गोसेवक खादी वापरीत नाहीत, आणि दोघेहि ग्रामोद्योगाच्या वस्तु वापरीत नाहीत. असें कां ? तर म्हणतात, महाग पडतें ! गाईच्या दूधवाल्याला ग्रामोद्योगाची ढेप महाग पडते...तात्पर्य आम्ही एकमेकांचे मित्र एकमेकांना महाग पडतों. म्हणूनच कदाचित् इंग्रजींत 'डियर फ्रेंड' म्हणत असावेत. पण ज्यांना मित्र महाग पडतात त्यांना शत्रु स्वस्त होतात !"

नर्मपरिहास, कोटि., विरोधाभासयुक्त अर्थान्तरन्यास इत्यादि अनेक गोष्टींचें मधुर मिश्रण या लहानशा वेच्यांत झालें आहे.

विनोबांचा सारा विनोद, परिहास, कोटिबाजपणा बोधाकरितां आहे. जें आध्यात्मिक बाबतींत तेंच साहित्यांत. शरीरादि सर्व साधनें ज्याप्रमाणे अध्यात्माकरितां राबवायचीं त्याप्रमाणे साहित्याचीं रसालंकार विनोदादि सर्व साधनें शिवेतरक्षति (आत्मकल्याण) हें जें महान प्रयोजन त्याकरितां राबवायचीं.

जसें सादृश्यदर्शन तसाच विरोधाभास. त्यांतहि विरोधदर्शनाकडे विनोबांची प्रवृत्ति विशेषच दिसते. त्याचें कारण म्हणूनच जणूं कांही त्यांनी आरंभी आरंभीच्या एका लेखांत ('स्वरूप पहा') सांगितलें आहे—"आम्ही जग सुधारण्याचा ठेका घेऊन बसतों आणि जगांत 'आमची'हि गणना होते एवढी मुद्याची गोष्ट लक्षांत घेत नाही. त्यामुळे आमचें सारें चरित्र म्हणजे 'विरोधालंकाराचें' उदाहरण झालें आहे." आमच्या चरित्राला योग्य मार्ग दर्शविण्यासाठीच ज्यांचा अवतार आहे, त्यांनी या विरोधालंकाराचें उद्घाटन साक्षेपीपणाने करावें यांत नवल काय ? आणि खरोखरच तपासणी जर केली तर विरोधाभासाचा उपयोग विनोबांनी आमच्या जीवनांतील विसंगति, असमंजसता, उक्तिकृतिविरोध इत्यादि दोष दाखविण्याकरितां केला आहे असेंच दिसून येईल. वरील उताऱ्याच्या पुढचेंच वाक्य पहा—

"आम्ही मौनाच्या प्रचारासाठी व्याख्यानें देतों आणि प्रचार झाला नाही म्हणजे विचारांत पडतों. पण उलगडा होत नाही. होईल कसा ?"

निंदखोर लोकांना 'कृष्णभक्त' अशी संज्ञा देऊन त्यांचें जें वर्णन 'कृष्णभक्तीचा रोग' या लेखांत त्यांनी केलें आहे त्यांतील एक चमत्कृतिजनक विरोधाभासात्मक मासला पहा—

"दिवसां डोळे मिटले म्हणून अंधार आणि रात्रीं डोळे उघडले म्हणून अंधार. असा स्थितप्रज्ञाच्या कार्यक्रमावरहुकूम ह्या लोकांचाहि (कृष्णभक्तांचा)

कार्यक्रम आहे. पण भगवंतांनी स्थितप्रज्ञाला मोक्ष दाखविला आहे तर यांची रवानगी कपाळमोक्षाकडे केली आहे."

'स्वच्छतेचें इंद्रिय आवरा' या लेखांत अस्पृश्यांच्या मंदिरप्रवेशाचा विषय आळवीत असतां—

"लोक म्हणतात, 'इतरत्र ठीक आहे. पण देवळांत कसें जमणार?' मी म्हणतों 'इतरत्र जमत नसल्यास आपण त्याचा कांही तरी अर्थ कल्पूं शकूं. पण देवळांत सहजच जमलें पाहिजे. लोक म्हणतात, 'देवळांत मुळीच जमणार नाही, कारण देवळें पवित्र आहेत.' मी म्हणतों, 'देवळांत सहजच जमलें पाहिजे, कारण देवळें पवित्र आहेत.'"

विरोधी विधानांच्या संतुलनाने इथे मोठी चमत्कृति साधली असून थोडक्यांत फार मोठा अर्थ आणला आहे.

'फायदा काय?' या अतिसुंदर लेखाची सुरवात युक्लिडच्या दृष्टान्तकथेने झाली आहे हें आपण मागे पाहिलें. त्याचा शेवट तितक्याच बहारीच्या विरोधाभासाने झाला आहे.—

"जोंपर्यंत तकलीफ सहन करण्याची तयारी झाली नाही तोंपर्यंत फायदा दिसणारच नाही. फायद्याचें घर नुकसानीच्या उन्हांत बांधलेलें आहे."

अहिंसेच्या प्रतिपादनांत तर विनोबांनी विरोधाभासाची मोठीच मौज केली आहे. जशास तसें या तत्त्वाची त्याच नांवाच्या लेखांत हळुवार पद्धतीने जी थट्टा केली आहे तशी करणें ही विनोबांचीच चातुरी. इतरांना तें साधणें नाही. त्याच विषयाचें निराळ्या रीतीनें प्रतिपादन 'सिंहावलोकनां'तील 'अयशाचा शक' या उदात्तमनोहर लेखांत केलें आहे. तलवारीचें उदाहरण दोन्ही लेखांत घेतलें आहे. त्यांतील विरोधाभास पहा—

"'शत्रूवर प्रेम करा'! केवढें महान शौर्य! बळकट हृदयाशिवाय कोण एवढी हिंमत करणार? पण आम्हांला वाटतें जो तलवार उपशील तो बलवान. अरे, जेव्हा तूं तलवार घेतलीस तेव्हाच तूं दुबळा पडलास! तुकारामाने विनोद केला आहे—'ढाल तलवारें गुंतले हे कर, मी झुंजार कैसा झुंजूं?'"

शिक्षण हा विनोबांचा आवडता विषय; आणि प्रचलित शिक्षणपद्धतीची झडती घेणें ही त्यांच्या लेखणीची हौसेची कामगिरी. 'फक्त शिक्षण' या लेखांत एक संवाद, ज्यांत त्यांच्या लेखणीला उपरोधाची धार चांगलीच लागली आहे, आणि त्यानंतर शिक्षणविषयक जुन्या कल्पनांची छेडणी व नव्या कल्पनांची फोडणी असें साहित्य आहे. सध्याच्या फक्त शिक्षण देणाऱ्या शिक्षकांना उद्देशून ते म्हणतात—

"ह्या फक्त शिक्षणावर जगणाऱ्यांना मनूनें 'भृतकाध्यापक' उर्फ 'पगारबंद शिक्षक' असें नांव दिलें असून त्यांचा श्राद्धाच्या कामीं निषेध केला आहे. बरोबरच आहे. श्राद्धांत मृतपूर्वजांची स्मृति जिवंत करावयाची असते. ज्यांनी प्रत्यक्ष जीवन मृत करून दाखविलें त्यांचा ह्या कामीं काय उपयोग?"

उदाहरणें किती देणार? विनोबांचें सगळें लिखाण विरोधाभासाच्या चमत्कृतीनें गजबजलेलें आहे. त्यांतल्या त्यांत 'मधुकर'मध्ये समाविष्ट झालेल्या त्यांच्या आरंभीआरंभीच्या लेखनांत याचा प्रकर्ष दिसून येतो.

उपमा दृष्टान्त, विनोद परिहास, विरोधाभास इत्यादि अर्थचमत्कृतींचीं साधनें पारिजाताच्या झाडाखाली फुलांचा सडा पडावा त्याप्रमाणें विनोबांच्या लिखाणांत कशीं गजबजून गेलेलीं आहेत हें पाहिलें. वेधकशक्तीचें दुसरें अंग जें भावनांचा उल्लास-याला आपण इथे सोयीसाठी 'काव्य' म्हणूं—त्याचाहि यथोचित प्रकर्ष विनोबांच्या लिखाणांत दिसून येतो. एवढें खरें की, विनोबांचें लिखाण बोधाकरितां अवतरलें असल्यामुळें त्यांत बुद्धिवाद, विचार आणि प्रेरणा यांच्यावर मुख्य भर असलेला आढळतो. सहसा भावनांना आवाहन करण्याची त्यांची रीत नाही. विचारांची बुद्धीला पटेल अशी चमत्कृतिपूर्ण मांडणी त्यांच्या निबंधांत केलेली असते. क्वचित् कोठे भावनांचा सूक्ष्म संनिवेशहि असतो. पण भावनांना प्रामुख्यानें आवाहन केलेलें अशीं स्थळें एकंदरीनें कमी. तथापि त्यांच्या वाणींत जेव्हा काव्य विलसूं लागतें तेव्हा—

जेथ शांताचिया घरा। अद्भुत आला आहे पाहुणेरा।
आणि येरां हि रसां पांतिकरां। जाला मानु॥

असा रसोल्लास घडून येऊन—

श्रवणसुखाची राणिव । जोडली जगा ॥

असा अनुभव येतो.

विनोबांच्या काव्यमय वाणीचें मुख्य अधिष्ठान 'गीता प्रवचनें' हा अनुपम ग्रंथ होय. नवव्या अध्याया-मध्ये (४६) 'सारें जीवन हरिमय होऊं शकतें' हें सांगतांना विनोबांच्या वाणींतून सुंदर काव्य फुललें आहे.

"रात्रीं आठ वाजतां देवळांत आरती चाललेली असावी. गंध सुटला आहे, धूप जळतो आहे, दिवे लावले आहेत, आरती ओवाळलीं जात आहे, अशा वेळेस खरोखरच आपण परमात्मा पाहत आहोंत अशी भावना होते. देव दिवसभर जागला, आता निजाव-याचा.

आता स्वामी सुखें निद्रा करा गोपाळा असें भक्त म्हणूं लागतात......तुलसीदासजी सकाळच्या वेळीं देवाला उठवीत आहेत, विनवीत आहेत—

जागिये रघुनाथ कुंवर पंछी बन बोले

आपल्या बंधुभगिनींना, नारीनरांना रामचंद्रांच्या मूर्ति कल्पून ते म्हणत आहेत, 'माझ्या रामरायांनो, उठा आता.' किती सुंदर विचार !"

दहाव्या अध्यायामध्यें मानवांतील आणि सृष्टीं-तील परमेश्वर कुठें कुठें पाहावा याचा बोध देण्यासाठी जें प्रवचन स्फुरलें आहे (गी. प्र. चतुर्थ संस्करण १९५४ पृ. ११५-१२६) तें सर्वच्या सर्व नितान्त मनोहर असें गद्यकाव्य आहे. भावनेचा ओलावा नस-णाऱ्याचेंहि मन तें आर्द्र करील व रसिकाला तर तेथें सुखामृताचा डोह लाधल्याप्रमाणे वाटेल.

सृष्टींत परमेश्वर पाहावयास सांगतांना गंगे-विषयी म्हणतात—

"आणि ती पावन गंगा ! मी काशींत असतांना गंगेच्या काठावर जाऊन बसावयाचा. रात्रीच्या एकांत वेळीं मी जात असें. किती सुंदर व प्रसन्न तो प्रवाह. तिचा तो गंभीर प्रवाह व तिच्या पोटांत साठवलेले ते आकाशांतील अनंत तारे. मी मुका होऊन जात असें. शंकराच्या जटाजूटांतून, म्हणजेच त्या हिमालयांतून, वाहत येणारी ती गंगा, जिच्या तीरावर राज्यें तृणवत् समजून फेकून देऊन राजे तपश्चर्येसाठी येऊन बसत, अशी ती गंगा पाहून मला शांत शांत वाटे. त्या शांतीचें मी कसें वर्णन करूं ?"

वाऱ्यांच्या ठिकाणीं परमेश्वर पहा.—

"आणि ते वारे ! कोठून येतात, कोठे जातात, कांही कळत नाही. वारे हे भगवंताचे दूत आहेत... हे पवित्र वारे आपल्या छातीस स्पर्श करतात. ते आप-णास जागृत करतात. आपल्या कानांत गुणगुणतात. परंतु या वाऱ्यांचा संदेश कोण ऐकतो ? जेलरने आपलें चार ओळींचें आलेलें पत्र न दिलें तर आपण खट्टू होतों. अरे कपाळकरंट्या, काय आहे त्या चिटोऱ्यांत ? हे परमेश्वराचे प्रेमळ संदेश घटकोघटकीं वाऱ्याबरोबर येत आहेत, ते ऐक."

अशा रीतीने अर्थचमत्कृति आणि काव्य या दोन्ही रीतींनी वेधक शक्ति विनोबांच्या लिखाणांत कार्यकर्ती झालेली आहे. आम्हां मराठी लोकांचें महद् भाग्य की मराठींतले सर्वश्रेष्ठ बोधदाते, जीवनदर्शनाचे प्रणेते ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम आणि विनोबा यांची शैली वेधक शक्तीने परिपूर्ण आहे. त्यांच्याकडे वळल्याखेरीज राहवणार नाही असें थोर आकर्षकत्व त्यांच्या शैलींत आहे. 'उभारूनि बाहे' ते आम्हांला पालवीत आहेत.

पालवीत आहेत कशाकरितां ? जीवनाचें सार्थक करणारा बोध देण्याकरितां. विनोबा बोधवादी आहेत असें म्हटल्याने त्यांची वाङ्मयांत योग्यता कमी होते असें कोणास वाटल्यास भलेही वाटो. ते आदि, मध्य आणि अवसानीं बोधवादी आहेत हें स्पष्ट आहे. विनोबांनी 'फक्त शिक्षण'वाला शिक्षक म्हणजे मृतजीवी माणूस असें ज्याप्रमाणे स्वच्छ सांगितलें आहे त्याप्रमाणे 'फक्त साहित्य'वाला रसिक हाहि त्यांच्या मतें मृतजीवी ठरेल. 'देहपूजेची दास्यभक्ति' या लेखांत त्यांनी जवळ जवळ हाच आशय निवेदिला आहे.

ज्ञानेश्वरांनी जीवनदर्शन दिलें, तुकारामांनी दिलें. पूर्वाचार्यांची थोरवी लक्षांत घेऊनहि आपण असें म्हणूं शकतों की समग्र जीवनदर्शन देणारे विनोबा हेच मराठींतील पहिले आचार्य होत. ज्ञानोबातुकोबांचें जीवनदर्शन पूर्णपणें पारमार्थिक असूनहि ऐहिकतेस

व्यापणारें आहे. 'याच देहीं याच डोळां' परमानंदाचें निधान दाखविणारें आहे हें सर्व खरें; तथापि आज घटकेला ऐहिकतेचा जो विकास झाला आहे त्याच्या दृष्टीने तें कमी पडणारें आहे. त्यांतील सामाजिक अंग अपुरें आहे, कमजोर आहे. राष्ट्रीय अंग तर त्याला नाहीच. देहाचा विचारहि त्यांत कमी आहे. काय खावें, काय ल्यावें, देहाला सुस्थित राखूनहि कसें राववावें आणि कां राववावें, या सगळयाचा विचार विनोबा-दर्शनांत सोपपत्तिक आढळतो तसा तो ज्ञानबा तुकोबा दर्शनांत आढळणार नाही. हा त्यांचा दोष नव्हे. ताव-त्कालपर्यंत झालेल्या मानव्याच्या विकासास अनुसरून त्यांचें दर्शन होतें.

आधुनिक काळांतहि अनेक थोर विचारवंत झाले. आगरकरांनी एक प्रकारचें जीवनदर्शन दिलें. त्यांची दृष्टि खूप व्यापक होती. तशीच व्यापक पण भिन्न रंगी दृष्टि रानडे, भांडारकरांची होती. जोतिबा फुले हे महान द्रष्टे होते. टिळक राजवाडे हेहि थोर विचारवंत होऊन गेले. पण या सर्वांचीं दर्शनें अपुरीं, किंवा एकांगी ठरतील. मानवतेचा आजवटकेपर्यंत जो विकास झाला आहे त्या दृष्टीनें परिपूर्ण ठरणारें, पूर्वपरंपरेंतून उद्भवलेलें, वर्तमानाची बूज राखणारें आणि भवि-ष्याला आकळणारें, समग्र जीवनाचा ठाव घेणारें, असें जीवनदर्शन देणारे विनोबा हेच मराठींत पहिले व एकटे होत. त्यांच्यांतील ज्ञानभक्तियोग भागवतधर्मी संतांच्या मधून आला, समग्रतेची सुंदरता गांधीजींच्या कडून प्राप्त झाली आणि या गंगायमुना संगमांत आधुनिक शास्त्रीयतेची गुप्त सरस्वती येऊन मिळाली. अशा रीतीने हा तीर्थराज सिद्ध झाला.

विनोबांच्या बोधक शक्तीविषयी काय लिहावें ? पानापानांतून, ओळीओळींतून, शब्दाशब्दांतून बोधामृत पाझरत आहे. जीवनाचें कोणतेंहि अंग तिच्या वेधांतून सुटलेलें नाही. जेथे बोधक शक्तीचा प्रकर्ष झाला आहे अशीं कांही स्थळें उल्लेखावयाचीं म्हटल्यास—

कवींचे गुण (मधुकर)
मतें आणि मतप्रचार (मधुकर)
जीवन आणि शिक्षण (मधुकर)
समग्रतेची सुंदरता (सिंहावलोकन)
श्रमजीविका (सिंहावलोकन)
सर्वेषां अविरोधेन (सिंहावलोकन)

हे या घटकेला हातांत असलेल्या पुस्तकांतील लेख सांगतां येतील. तसेंच गीताप्रवचनांतील पुढील भाग पाहावेत—

कर्म, विकर्म, अकर्म यांचें विवेचन (अ. ४, ५; पृ. ३२ ते ५०)
देह व आत्मा यांचें पृथक्करण (अ. १३, पृ. १५७)
परमात्म्याच्या स्वरूपाचा 'उपद्रष्टानुमंता च' इ० स्वरूपांत अनुभव (अ. १३, पृ. १६७ ते १७०)
अहिंसेचा विकास (अ. १६; पृ. २०७ ते २१०)

या निर्देशानें माझें मलाच समाधान नाही. वेळेच्या फरकाने निराळे लेख व निराळींच स्थळें निवडावींशीं वाटतील. इतर वाचकांचीं आणखी वेगवेगळीं स्थळें आवडतीं असतील. तात्पर्य उघड आहे. अथपासून इति-पर्यंत सर्वच धर्म्यामृत आहे. कोणतें घेणार आणि कोणतें सोडणार ?

थोड्याशा ओळींमध्ये ठोस उपदेश भरलेला अशीं कितीतरी वचनें विनोबांच्या लिखाणांतून काढून दाख-वितां येतील. पण तसें करायचें म्हटल्यास 'ग्रंथ बहु न कां वाढे ?' अगदी मोजक्या उतान्यांवर भागवून घेणें भाग आहे.—

१ कवीचे गुण—

"कवीनें सृष्टीला आत्मिक प्रेमाचें पांघरूण घातलें पाहिजे. तसेंच सृष्टीच्या वैभवाने त्याला आपला आत्मा नटवितां आला पाहिजे." (मधुकर ५७)

२ शास्त्ररहित श्रद्धेने काम होत नाही—

"शास्त्ररहित श्रद्धेने काम होत नाही. भगवं-तांनी आम्हांला गीतेंत सांगितलें आहे की श्रद्धा असणें हीच कांही विशेष गोष्ट नाही. श्रद्धा तर कोणत्या ना कोणत्या प्रकारची प्रत्येकांत असतेच. पण सात्त्विक व शास्त्रीय श्रद्धा हीच तारक आहे." (सिंहावलोकन २६)

३ मनाची चौकट करूं नका—

"अहिंसेचा प्रयोग करूं इच्छिणारांनी आपल्या मनाची एक चौकट करून किंचित भिन्न विचारप्रवाहांत सापडलेल्या तरुण कार्यकर्त्यांना टाळून चालणार नाही.

'ब्रह्म तं परादात् यो अन्यत्र आत्मनः ब्रह्म वेद' जो आपल्याहून ब्रह्माला अलग करील त्याला ब्रह्म आपल्याहून अलग करतें. म्हणून अहिंसक माणूस इतर सर्वांना आपल्या पोटांत घेण्याचा आटोकाट प्रयत्न करील."
(सिंहावलोकन ५९)

सर्वांना पोटांत घेण्याची ही जी वृत्ति शेवटच्या उताऱ्यांत उल्लेखिली आहे तिचा आदर्श खुद्द विनोबांनीच दाखविला आहे. जुना शब्द वापरायचा म्हटल्यास हिलाच समन्वयबुद्धि असें म्हणतां येईल. प्रत्येक गोष्टींतला मुख्य किंवा आपल्याला उपयुक्त असा जो अंश असेल त्याच्यावरच भर द्यायचा; असें केलें म्हणजे समन्वय सहज सुलभ होतो. अशा रीतीने इतरांना, जिथे अगदी निराळेपणा किंबहुना विरोध दिसतो अशा ठिकाणी देखील समन्वय कल्पून विनोबा संवादाचें सुखदायी वातावरण निर्माण करतात. पुष्कळांच्या मतें वैदिक धर्म आणि संतांचा भागवत धर्म हे दोन्ही परस्परांतून मूलतः भिन्न होत; पण विनोबांच्या दृष्टीने तसें कांही नाही. 'भागवत धर्म हें वैदिक धर्माचें अत्यंत मधुर स्वरूप होय' (मधु. ८५). असें ते म्हणतात. या त्यांच्या धारणेमुळे एखाद्या तत्त्वाच्या समर्थनपर वचनें देतांना वेदांतलें वचन, लगेच तुकारामादि संतांचें वचन, मध्ये जमल्यास भारत-रामायणांतील वचन, असें त्यांच्या लिखाणांत नेहमी चालतें. त्यांची समन्वयबुद्धि काम काम करूं लागली म्हणजे सगळीकडचीं वचनें, नाना ठिकाणच्या कल्पना एकत्र आणून त्यांचें मधुर पंचामृत तें बनवितात. वेदांचा धर्म आणि संतांचा धर्म हे जर एकरूप, तर भक्तिमार्गांतील श्रवणभक्ति आणि कीर्तनभक्ति म्हणजेच उपनिषदांतील स्वाध्याय आणि प्रवचन हें साम्य ओघानेच आलें. तसें विनोबांनी प्रत्यक्ष प्रतिपादन केलें आहे. (मधु. १०१, १०२). कर्म, ज्ञान, भक्ति यांची एकता त्यांनी किती सुंदर रीतीने दाखवून दिली आहे हें गीता-प्रवचनांच्या वाचकांस सांगण्याची आवश्यकता नाही. त्यांतला पृ. २०३ वरील मजकूर या दृष्टीने लक्षांत घेण्याजोगा आहे. सर्व धर्म समन्वयाची गांधीजींची, अर्थात् विनोबांची वृत्ति तर प्रसिद्धच आहे.

या सर्वांना पोटांत घेणाऱ्या विशाल उदारतेमुळेच साम्यवाद, विकेंद्रीकरण, आर्थिक स्वयंपूर्णता इत्यादि इतरांस परस्पर विसंगत वाटणाऱ्या अनेक तत्वांचें मेलन जिच्यांत झालें आहे आणि आर्थिक बाजूस प्राधान्य असूनहि जी अहिंसेच्या आध्यात्मिक पायावर उभी आहे, अशी भूदानाची अद्भुत चळवळ ते कल्पूं शकले. भूदानाला ग्रामदानाचें आता प्राप्त झालेलें विकसित स्वरूप पाहून मोठमोठे पट्टीचे अर्थशास्त्रज्ञ जे शंकित होते, विरोधी होते, ते देखील या क्रांतिकारक वाटचालीकडे तोंडांत बोट घालून बघूं लागले आहेत.

कारण असें की विनोबा ही नुसती वेधक व बोधक शक्ति नसून ती प्रेरक शक्ति आहे. त्यांच्या व्यक्तित्वांत जबरदस्त प्रेरकता आहे. तिचा आपणास इथे विचार कर्तव्य नाही. त्यांच्या वाङ्मयांतहि तीच प्रेरक शक्ति अनुभवास येते, हें इथे आवर्जून सांगावयाचें आहे. त्यांच्या वाणीचें प्रेरकत्व त्यांच्याच तोंडून एके ठिकाणीं बाहेर पडलें आहे. गीता प्रवचनांच्या तिसऱ्या आवृत्तीच्या 'दोन शब्दां'त ते म्हणतात—

"इकडे बिहारमध्ये भूदानयज्ञाचें वातावरण निर्माण करण्याच्या कामीं गीताप्रवचनांचा उपयोग होत असल्यामुळे त्याच्या हजारों प्रती गावोगाव आणि घरोघर जात आहेत."

आणि यांत नवल कांही नाही. ज्याच्यांत सामर्थ्य आहे तें इतरांस प्रेरक होणारच. कलेकरितां कला की जीवनाकरितां कला, वाङ्मयाचा जीवनावर आणि समाजस्थितीवर परिणाम होतो की नाही, इत्यादि प्रश्न काढून त्यांवर वाद केले जातात. वाद करणारे करोत. ही गोष्ट निर्विवाद आहे की वाङ्मय हें प्रेरक होऊं शकतें. ही प्रेरणा हीन असेल किंवा उन्नत असेल. त्याचप्रमाणे ही प्रेरणा शारीरिक असेल, बौद्धिक असेल, सामाजिक असेल किंवा आध्यात्मिक असूं शकेल.

विनोबांची प्रेरणा आध्यात्मिक आहे. ती धीरोदात्त आहे. या धीरोदात्ततेचा प्रत्यय विनोबांच्या उद्गारांत अनेक ठिकाणीं येतो. आताच्या विमानांच्या युगांत तुमच्या चरख्याचें व कताईचें कसें होणार असें कोणी विचारतांच ते उत्तरतात—

"अगदी छान चालेल. विमानांत वसून मी मोठ्या ऐटींत पुनाई करीन व चरखा चालवीन. कां ? तर माझ्या सृष्टीचा मी मालक आहें म्हणून. ह्यालाच माणूसपण म्हणतात. मी ईश्वराची प्रतिमा आहें.... ह्या जड दुनियेला मी आपला मालक मानीत नाही. माझ्या हातांत ही माती आहे. मी हिच्यांतून सोनें निर्माण करणार आहें.... यंत्र जड आहे. मी पाहिजें त्या यंत्रांना ठेवीन, जीं नको असतील त्यांना ठेवणार नाही...हिंदुस्थानांत ४० कोटि लोक आहेत. इतका विशाल देश आपलें वातावरण स्वतः निर्माण करणार नाही तर दुसरा कोण करील ? " (सिंहावलोकन १०, ११)

अगदी निराळी बाजू पण तीच आध्यात्मिक धीरोदात्तता—

" वेद म्हणें आहे कोठे ? अरे तुझ्या जवळच आहे तो....मीच जिवंत वेद आहें. सर्व परंपरा आता-पर्यंतची माझ्यांत जिरली आहे. त्या परंपरेचें मी फळ आहें.... माझ्या पोटांत वेद पांच पन्नास पट मोठा झाला आहे. सारांश, वेदांचें सार आपल्या हातांत आहे. सेवा, प्रेम व ज्ञान यांवर जीवन रचावयाचें आहे. म्हणजेच हातांत वेद आहे. मी अर्थ करीन तोच वेद." (गी. प्र. ब. १५. पान २०१).

गीतेच्या आधारानेच कां होईना, पण असे सामर्थ्यशाली उद्‌गार विनोबांच्याच तोंडून बाहेर पडावयाचे.

ही प्रेरणा जशी धीरोदात्त, तशीच शुचि आणि मंगल आहे. या शुचित्वाचें व मांगल्याचें दिग्दर्शन उतारे देऊन विस्ताराने करण्याची जरुरी नाही. विनोबावाङ्‌मयाच्या पानापानांत तें व्यक्त झालें आहे आणि वाचकांच्या तें अनुभवास येऊन चुकलें आहे. आपल्या प्रेरणेनें व्यक्तिव्यक्तीच्या आणि समाजाच्या मनांतील धीरोदात्तता, शुचिता, मंगलता तें व्यक्तवीत आहे आणि विकासवीत आहे. यापेक्षा अधिक कल्याण-कर दुसरें काय असूं शकेल ?

अपरिग्रही विनोबा

१९२८-२९ सालची गोष्ट असेल. आज महिला आश्रम म्हणविल्या जाणाऱ्या जागेवर इमारती व विहिरी बांधण्याच्या कामांत आम्ही स्वतः राबलों आहोंत. त्यावेळचा एक प्रसंग आहे. श्रावण भाद्रपद महिन्यांत विहीर पाण्यानें तुडुंब भरलेली होती. त्या विहीरीजवळच स्नानाच्या खोल्या होत्या. त्या ठिकाणीं मी स्नान करीत होतों. पू० विनोबाजीहि स्नानाकरिता तेथें आले आणि म्हणाले 'पाणी बिणी कसें काय आहे ? ' मी म्हणालों 'पाण्यानें विहिर भरलेली आहे. आज माझी खूप पाणी अंगावर घेण्याची इच्छा आहे.' त्यावर विनोबाजी म्हणाले, 'अरे, नाही रे! जरी विहिरींत पाणी भरपूर असलें तरी आपल्याला जेवढें आवश्यक तेवढेंच घ्यावें.'

ही घटना मी नेहमीच माझ्या आठवणींत ठेवीत असतों. आणि त्याचा माझ्या मनाशीं असा अर्थ करतों की जगांतील कोणतीहि वस्तू जरी बिनाश्रमाने व बिना पैशानें मिळत असली तरी आवश्यकते-पेक्षा जास्त वापरणें म्हणजे चैन करणें होय. अशा अर्थानें मी विनोबाजींपासून संयम करणें शिकलों.

—रामदासभाई

अनुक्रमणिका

महाराष्ट्राचें विचारधन

प्रिय भाऊसाहेब पंडित यांस,

स. न. पूज्य विनोबाजींच्या जन्मदिनानिमित्त निघणार असलेल्या विदर्भ साहित्य संघाच्या 'युगवाणी' मासिकाच्या विशेषांकासाठी लेख लिहिण्यासंबंधींचें आपलें ता. २९-८-५५ चें पत्र ज्या वेळीं माझ्या हातीं आलें, त्या वेळीं मी खरोखरीच बुचकळयांत पडलों. आपण विचाराल की, दैनिक वर्तमानपत्राचे रकाने रोज भरून काढणाऱ्या माझ्यासारख्या हरकामी पत्रकाराला आपल्या या पत्रामुळे बुचकळयांत पडण्याचें काय कारण ? कारण अगदी स्पष्ट आहे; व तें जर मी प्रांजळपणानं सांगितलें, तर विनोबांच्या कांहीं चहात्यांना जरी कदाचित् तें रुचलें नाहीं, तरीं खुद्द विनोबांनाहि तें मान्य होईल, असा मला विश्वास वाटतो.

कारण हें की, विनोबा हे कोणत्याहि रूढ अर्थानें साहित्यिक ठरत नाहीत. साहित्यिक कोणाला म्हणावें यासंबंधींचें शास्त्र तर आहेच, पण कांहीं शिष्टसंमत असे संकेतहि आहेत. त्या शास्त्राच्या काय किंवा संकेतांच्या काय काटेकोर दृष्टीने जर पाहिलें, तर विनोबांना साहित्यिक म्हणणें कठीण जाईल, असें निदान मला तरी वाटतें. हें विधान करतांना विनोबांच्या नांवावर प्रसिद्ध झालेलीं त्यांच्या प्रवचनांचीं आणि लिखाणाचीं सोळा पुस्तकें माझ्या डोळयांपुढे आहेत. आणि तरी सुद्धा, मी त्यांना साहित्यिक म्हणणें कठीण जाईल, असें विधान करीत आहें.

कां करीत आहे ? कारण, त्यांच्या या सोळाहि पुस्तकांचे विषय किंवा स्वरूप हें जर काळजीपूर्वक तपासून पाहिलें, त्यांतील चिंतन, विवरण आणि शैली हीं तिन्ही जर चिकित्सक बुद्धीने लक्षांत घेतलीं, तर कोणालाहि असें कबूल करावें लागेल की, विनोबा हे तत्त्वचिंतक आहेत, कोणत्याहि अर्थानें साहित्यिक नाहीत. आपण कांहीं उदाहरणें घेऊन हा मुद्दा स्पष्ट करूं या. श्रीज्ञानेश्वरमहाराज हेहि तत्त्वचिंतकच होते आणि तरीहि महाराष्ट्रांत गेलीं आठ शतकें केवळ 'ज्ञानियांचा राजा' म्हणूनच नव्हे, तर 'साहित्यसोनियाच्या खाणी' उघडणारा किंबहुना त्या सोनियाचे नाना परीचे अपरूप अलंकार घडविणारा किमयागार म्हणून त्यांचा गौरव एकमुखाने सतत होत आलेला आहे. कां ? कारण, त्यांची 'ज्ञानेश्वरी' हा जरी गीतेवरील भाष्यग्रंथ असला आणि त्यांत जरी तत्त्वज्ञानाचेंच विवेचन असलें, तरी तो उपमादृष्टांतांनी इतका बहरलेला आहे की, अगदी साधा विचार प्रकट करतांना सुद्धा श्रीज्ञानोबाराय तो इतक्या कल्पकतागर्भ सुंदरतेने कसा प्रकट करतात, याचा आपल्याला अचंबा वाटतो. याच्या जोडीला श्रीज्ञानेश्वरांचें म्हणून समजलें जाणारें जें भक्तिभावाच्या आर्ततेने ओथंबलेलें अभंगादि स्फुट वाङ्मय आहे, तें निराळेंच ! त्यामुळें श्रीज्ञानेश्वर हे जसे महान् तत्त्वचिंतक, तसेच महान् साहित्यिकहि होते, असें आपण शतकानुशतकें मानीत आलेलों आहोंत. त्यांच्यानंतर दासोपंतांनी गीतेवर 'गीतार्णव' हें आणि वामनपंडितांनी 'यथार्थदीपिका' हें अशीं दोन मोठी भाष्यें लिहिलीं. तथापि त्या भाष्यांना ज्ञानेश्वरीप्रमाणें कांहीं कोणी काव्य म्हणत नाही. पण इतरांचा आणि दूरचा हा दाखला तरी कशाला हवा ? खुद्द श्रीज्ञानेश्वरांच्या तरी 'अमृतानुभव' या ग्रंथाला कोण काव्य म्हणतो ? तेव्हां श्रीज्ञानेश्वर हे तत्त्वज्ञानी असतांनासुद्धा त्यांना कवि म्हणून गौरवितांना महाराष्ट्रांतील रसिक जनतेनें फार बारकाईनें विचार केलेला होता, हें उघड आहे.

या उदाहरणावरून हें स्पष्ट होईल की, विनोबांना साहित्यिक म्हणणें कठीण आहे. त्यांचे 'उपनिषदांचा अभ्यास', 'स्थितप्रज्ञदर्शन' इत्यादि जे तात्त्विक ग्रंथ आहेत, त्या ग्रंथांतील विचार कांहीं बाबतींत मौलिक आहेत आणि विवेचनाच्या पद्धतींतहि कांहीं नावीन्य आहे, हें निस्संशय. किंबहुना,

आपल्या या सर्वच सोळा ग्रंथांच्या रूपानें भारतीय प्राचीनांचें विचारधन विनोबांनी आधुनिकांच्या नव्या मार्षेत नव्या लोकसुलभ शैलीनें विशद करून दाखविलें आणि आपल्या सांस्कृतिक विचारप्रणालीचें सूत्र या विसाव्या वैज्ञानिक शतकाच्या विशाल जीवन-पटापर्यंत आणून मोठ्या मार्मिकतेने भिडविलें, ही त्यांची राष्ट्रीय कामगिरी लोकोत्तर होय. पण या त्यांच्या कार्याचा साहित्याशीं संबंध जोडणें आणि त्यांना साहित्यिक म्हणणें मात्र कठीण जाईल.

शैलीच्या दृष्टीनें विचार केला, तर विनोबा हे, माझ्या समजुतीने, संस्कृत वाङ्मयांतील प्राचीन सूत्रकार सूरींच्या कोटींत वसतात. फारच झालें, तर महानुभावांच्या आरंभींच्या कांही सूत्रग्रंथांसारखी त्यांची बोलण्याची आणि लिहिण्याची पद्धत आहे, असें म्हणतां येईल. अर्थात् हीं त्यांचीं सूत्रें "स्वल्पाक्षरमसंदिग्धं सारवत्..." या सूत्राच्या व्याख्येला न शोभणारीं म्हणजेच केव्हा केव्हा सैल असतात, ही गोष्ट खरी. पण, तो दोष त्यांचा नसून, ज्या वाचकांना किंवा श्रोत्यांना उद्देशून त्यांचें हें प्रकट चिंतन चाललेलें असतें, त्यांच्या अवधानाच्या आणि आकलनाच्या मर्यादांचा आहे, हें लक्षांत घेतलें पाहिजे. त्यामुळें झालें आहे मात्र असें की, त्यांची विवरणाची ठाशीव, तुटक पद्धत ही जरी केव्हा केव्हा सूत्रशैलीसारखी परिणामकारक वाटली आणि विरोधाभासाचा विलासहि त्या शैलींत कधी कधी प्रतीत झाला, तरी त्यांचें विवेचन अनेकदा सर्व संदेह फिटण्याच्या दृष्टीनें अपुरें आणि उणें वाटतें. अर्थात् संस्कृत वाङ्मयांतील परिणतावस्थेला पोचलेल्या सूत्रशैलीचे कांही आर्ष गुण जरी त्यांच्या शैलींत असले, तरी अल्पाक्षररमणीयता आणि असंदिग्धता नाही, हें मात्र निर्विवाद !

वैचारिक दृष्टीने जर विनोबांच्या सर्व वाङ्मयाचा आढावा घेतला, तर जीवनाचा जो आर्ष आदर्श त्यांनी आपल्या स्वतःच्या प्रत्यक्ष आचरणानें भारतीय जनतेपुढे आज साक्षात् उभा केलेला आहे, तो आपल्या परंपरेला कितीहि शोभून दिसणारा असला आणि प्रथमदर्शनीं विलोभनीयहि वाटला, तरी व्यवहार्य मात्र मुळीच नाही, हें स्पष्ट म्हणणें प्राप्त आहे. किंबहुना, स्वतःला महात्मा गांधी यांचे वारस म्हणविणाऱ्या, विनोबांच्या सर्वोदयवादाचा कागदोपत्री उदोउदो करणाऱ्या आणि कोणत्याहि धर्मसंकटाच्या वेळीं विनोबांचा कौल घेऊन त्याचें दडपण लोकांवर आणणाऱ्या भारत सरकारने या देशाचें जें औद्योगीकरण, परदेशी भांडवल, परदेशी सल्लागार आणि परदेशी तंत्रविद्या यांच्या बळावर, इतक्या ईर्ष्येने आज प्रचंड प्रमाणावर, पंचवार्षिक योजनांच्या रूपाने, चालविलेलें आहे, तें औद्योगीकरण ही विनोबांच्या आर्ष जीवनादर्शाची एक परीनें मूर्तिमन्त अवज्ञाच नव्हे काय ? भारताचा प्राचीन आर्ष आदर्शवाद आणि त्याची आध्यात्मिक जीवनदृष्टि हीं दोन्ही त्या काळांत श्रेष्ठ ठरलेलीं असतीलहि; व कदाचित् आजहि कांही घेण्यासारखे गुण त्या जीवनादर्शांत आणि जीवनदृष्टींत सापडतीलहि; पण, विनोबांनी इतक्या आग्रहाने त्यांचा जो एकांतिक पुरस्कार सध्या चालविलेला आहे, तो पुरस्कार कितीहि आदरणीय वाटला, तरी व्यवहार्य आणि आचरणीय नाही, असें निदान मला तरी वाटतें. किंबहुना, माझ्या अल्प समजुतीनें, त्यांची जीवनदृष्टि ही या विसाव्या शतकांतील अनेक गुंतागुंतीच्या बिकट आणि व्यापक प्रश्नांचा ठाव घेऊं शकत नाही. म्हणूनच ती अपर्याप्त आणि असमर्थ आहे.

व्यक्ति या दृष्टीने मात्र विनोबांची योग्यता, त्यांचें कर्तृत्व आणि या विसाव्या शतकाच्या संघर्षाकुल जीवनांतील त्यांचें स्थान हीं मला अलौकिक आणि अद्वितीय वाटतात. कारण, त्यांनी आपल्या जीवनानें प्राचीन भारतीयांचा आर्ष जीवनादर्श हा किती ऋजु, स्वच्छ आणि उदात्त होता, याचें साक्षात् प्रत्यंतर अखिल मानवजातीला आणून दिलेलें आहे; व त्या जीवनादर्शाची मोहनी या विज्ञानयुगांत सुद्धा लोकांवर किती विलक्षण पडूं शकते, हेंहि सिद्ध करून दाखविलें आहे. त्यांचें साधुत्व हेंहि मी आदरणीय समजतों. कारण, इतर कोणत्याहि ईषणांचा तर राहोच, पण लोकेषणेचा आणि सत्तेषणेचाहि डाग त्याला लागलेला सहसा दिसत नाही. त्यामुळेच विनोबा कोणत्याहि क्षणीं त्यांना पथ्य आणि सत्य वाटणारें अप्रिय बिनदिक्कत बोलूं शकतात.

(पुढील मजकूर पान ३३ वर)

विनोबांची गीताई आणि गीताप्रवचनें

आचार्य प्रल्हाद केशव अत्रे

भारतीय जीवनावर 'गीते'चा फारच मोठा प्रभाव आहे. तरीहि पण मराठी मनाला तिचें सर्वात जास्त आकर्षण आहे. मराठी भाषेंत आजपर्यंत गीते-संबंधी विपुल लिहिलें गेलें आहे. 'ज्ञानेश्वरी' हा तर अमृताचा डोहच आहे. सहासातशें वर्षें जाणते आणि नेणते तिच्यांत डुंबून कृतार्थ होत आहेत. पण ज्ञानोबा-नंतर 'गीते'वर अत्यंत मधुर आणि हृदयस्पर्शी असें लिखाण जर मराठी भाषेंत कोणी केलें असेल, तर तें आमच्या विनोबांनी. गीतेबद्दल त्यांना काय वाटतें हें त्यांच्याच शब्दांत सांगतों. ते म्हणतात, "गीतेचा आणि माझा संबंध तर्कापलीकडचा आहे. माझें शरीर आईच्या दुधावर पोसलें. त्यापेक्षाहि माझें हृदय व बुद्धि ह्यांचें गीतेच्या दुधावर अधिक पोषण झालें आहे. तर्काला छाटून श्रद्धा व प्रयोग ह्या पंखांनी मी गीतेच्या गगनांत यथाशक्ति भराऱ्या-मारीत असतों. मी प्रायः गीतेच्याच वातावरणांत असतों. गीता म्हणजे माझें प्राणतत्त्व. गीतेविषयी मी इतराशीं कधी बोलतों, तेव्हा गीतेच्या समुद्रावर तरंगत असतो. आणि एकटा असतो. त्या वेळेस त्या अमृतसमुद्रांत खोल बुडी मारून बसतों." गीतेसंबंधी विनोबा बोलूं वा लिहूं लागले म्हणजे काव्याच्या धारा त्यांच्या मुखामधून उंचवळूं लागतात.

> गीताई माऊली माझी। तिचा मी बाळ नेणता।
> पडतां रडतां घेई। उचलूनि कडेंवरी.

विनोबा हे स्वतः विलक्षण प्रतिभेचे कवि आहेत. ते सदैव काव्यच बोलत असतात. हें वाचून महाराष्ट्रां-तल्या पुष्कळशा शब्द–जुळव्या 'कवींना' धक्काच बसेल. ह्या अलौकिक प्रतिभेच्या सामर्थ्यावरच ते भगवद्गीता मराठी भाषेंत आणूं शकले. तीच त्यांची 'गीताई'. 'गीताई' हा मराठी साहित्यांतला एक मोठा चमत्कार आहे. गीताई ही ईश्वराने आपल्या हातून घडवलेली सर्वोत्तम सेवा आहे अशी विनोबांची श्रद्धा आहे. आपण 'कृतिशून्य' आहोंत असा स्वतःला ते उगाच बोल लावतात.

> प्रेरणा परमात्म्याची महात्म्याची प्रसन्नता
> वाणी संतकृपेची ही विन्याची कृतिशून्यता

कारण, 'गीताई'ही तर विनोबांची अमरकृति आहे. 'ज्ञानेश्वरी' प्रमाणेच ती आतां सहस्रावधि लोकांच्या जीवनामधलें एक नित्याचें समाधान होऊन बसली आहे. 'गीताई' लिहिण्याच्या मागची विनोबांची भूमिका अशी होती. गीतेमध्ये सर्वोत्तम आध्यात्मिक आणि व्यावहारिक मार्गदर्शन आहे अशी विनोबांची श्रद्धा आहे. कर्मयोग आणि प्रेमयोग, ध्यानयोग आणि ज्ञानयोग, बुद्धियोग आणि शुद्धियोग हे गीतेने सारे एकाच जीवनसूत्रांत ओवून टाकलेले आहेत असें त्यांना वाटे. गीतेच्या सांगण्याप्रमाणे वागण्याचा यत्न करीत गेल्याने अपार शांति मिळते असा त्यांना अनुभव येत गेला. म्हणून सर्वसामान्य जनतेची निष्ठा गीतेवर स्थिर व्हावी, ह्या तळमळीने त्यांनी गीता मराठीमध्यें आणावयाचें ठरविलें. तीस एकतीस सालीं एका विशिष्ट मानसिक योगावस्थेंत त्यांनी 'गीताई'ची रचना केली. बत्तीस सालीं ती प्रथम प्रसिद्ध झाली. तेव्हापासून आजतागायत 'गीताई'च्या कमींत कमी तरी तीन सव्वातीन लाख प्रती खपल्या असाव्यात. गीताईची रचना इतकी सोपी, रसाळ आणि प्रासादिक आहे की, ती वाचतां वाचतांच तिच्यांतला भावार्थ मनामध्ये आपोआप उमलूं लागतो. मूळ संस्कृतांत त्या श्लोकांचा बोध जाणत्यांनाच होतो. पण अर्थाचें आकलन करून घ्यावयास पदोपदीं थांबावें लागतें. ती अडचण

'गीताईच्या' बाबतींत भासत नाही. अर्थ चटकन् ध्यानांत येतो आणि चिंतनाची प्रक्रिया लगेच सुरू होते. गीता वाचावयाची म्हणजें कांही शब्द वाचावयाचे नाहीत. किंवा सुरामध्यें तिचें पठन करावयाचें नाही. दैनंदिन गीता वाचणारे पुष्कळसे लोक अंधश्रद्ध असतात. गीतेचे चारदोन श्लोक किंवा एकादा अध्याय घडाघडा वाचला की आपण एक मोठें पुण्यकृत्य केलें असें त्यांना वाटतें. 'गीता' हा कांही केवळ वाचनाचा विषय नाही. तें एक चिंतनाचें साधन आहे. विनोबांनीच स्वत: सांगितलें आहे, "गीतेवर माझी जरी अनन्य श्रद्धा बसली आहे तरी तीहि मी गौणच समजतों. आत्मचिंतनाची कड गाठायला शब्दहि बाजूस सारावा लागतो. देहाच्या साधनानें जसें देहनिरसन करावयाचें तसेंच हें आहे. गीता म्हणते म्हणून प्रमाण असें नव्हे. वस्तु स्वयंप्रमाण आहे. आणि तिनेंच गीतेलाहि प्रेरणा दिली आहे. ह्या गोष्टीचा विसर न होतां गीतेची मदत घ्यावी. शेवटी सारेंच फेकून द्यावयाचें आहे. आणि ओझें तर कशाचेंच केव्हाहि उचलावयाचें नाही !" गीतेकडे पाहण्याची ही विलक्षण जिवंत दृष्टि विनोबांखेरीज दुसऱ्या कोणी दिली आहे असें आम्हांला वाटत नाही.

*

आम्ही स्वत: संस्कृत जाणणारे आहोंत. अधुनमधून गीता कित्येक वर्षे तरी वाचीत आलों आहोंत. लोकमान्य टिळकांच्या 'गीतारहस्या'चीं कित्येकदा तरी आम्ही पारायणें केलीं. गीतेचा अर्थ आम्हांला उमगला; पण तिची गोडी अशी कधीच लागली नाही. ती आम्हांला विनोबांमुळे लागली. विनोबांमुळे आम्ही गीता वाचतांना मिटक्या मारूं लागलों. विनोबा नुसतेच तत्त्वज्ञानी आणि विद्वान् नाहीत. ते रसिक आहेत. रुक्षपणा हा ह्या देशांतील विद्वत्तेला मिळालेला फार मोठा शाप आहे. विनोबा हे एकच त्या नियमाचे उज्ज्वल अपवाद आहेत. विनोबांनी एके ठिकाणीं म्हटलें आहे की, "कोणत्याहि ग्रंथाचा सारासार विचार करावा. गीता हा एकच असा ग्रंथ आहे की, त्यांतलें कांहीच टाकावेसें वाटत नाही." हेंच नेमकें विधान विनोबांच्या लिखाणाविषयी आम्हांला करावेसें वाटतें. विनोबांचें कांहीएक टाकावेसें वाटत नाही. त्यांनी लिहिलेलें प्रत्येक अक्षर घटाघटा प्यावें असें आम्हांला वाटतें. विनोबा हे चटकन् कळतात आणि सरळ डोक्यांत आणि हृदयांत जाऊन भिनतात. हा त्यांच्या बोलण्याचा किंवा लिहिण्याचा विलक्षण गुण आहे. त्यांच्याइतका सुंदर आणि सुबोध मराठी लिहिणारा लेखक मराठी भाषेंत दुसरा आढळणार नाही. वस्तुत: हा लौकिक साने गुरुजींचा आहे; पण विनोबा हे साने गुरुजींचें गुरुजी आहेत हें ध्यानीं धरावें. विनोबा हे मराठी भाषेंतले 'सूत्रकार' आहेत. कमींत कमी शब्दांत ज़ास्तींत जास्त अर्थ कसा ठासून भरावा हें कौशल्य आज तरी निदान फक्त त्यांच्याच जवळ आहे. आम्ही सांगतों हें कित्येकांना कदाचित् अतिशयोक्तीचें वाटेल म्हणून त्यांना आम्ही विनोबांचीं 'गीताप्रवचनें' वाचण्याची शिफारस करतों. 'गीताई' ही जर अमृताची पुष्करिणी असेल तर 'गीताप्रवचनें', त्या पुष्करिणीमधलें हजार धारांचें एक सोन्याचें कारंजें आहे. त्याच्या सौंदर्याचें वर्णन करतांना आमचे शब्द तोकडे पडतात. 'गीताप्रवचनां'ची तुलना जर करावयाचीच झाली, तर ती फक्त 'ज्ञानेश्वरी'शींच होऊं शकेल. गीतेचें असें हृदयस्पर्शी रसग्रहण कोणत्याहि भारतीय भाषेंत आजपर्यंत कोणी केलें नसेल. बत्तीस सालीं विनोबा धुळ्याच्या तुरुंगांत होते. त्यांच्याबरोबर अनेक राजकीय कार्यकर्तेहि त्याच ठिकाणीं कैदी होते. त्यांनी इच्छा दर्शवल्यावरून दर रविवारीं एक अशीं विनोबांनी गीतेवर अठरा प्रवचनें दिलीं. सुदैवानें तीं टिपून घ्यावयास सानेगुरुजींसारखा सिद्धहस्त 'लेखकू' लाभला. विनोबा बोलणार अन् सानेगुरुजी टिपून घेणार. मग विचारसौंदर्याला आणि भाषामाधुर्याला किती अमर्याद बहार आला असला पाहिजे, त्याची कल्पना 'गीताप्रवचनें' वाचल्याखेरीज कशी येणार ? ह्या पुस्तकाची तिसरी आवृत्ति परवाच्या 'प्रजासत्ताक दिना'च्या सुमुहूर्तावर प्रसिद्ध झालेली आहे. ह्या पुस्तकाची आजपर्यंत आम्ही स्वत: दहापंधरा वेळां तरी पारायणें केलीं असतील. इतका आनंद आणि समाधान आजपर्यंत आम्हांला कोणत्याहि एका पुस्तकाच्या वाचनानें मिळालेलें नाही. ह्या पुस्तकाचें

कोणतेंहि पान उघडावें अन् कोणत्याहि ओळीपासून वाचायला सुरवात करावी.

दीपा नाही पाठींपोटीं अंधकार
सर्वांगें साखर अवघी गोड

अशी विलक्षण माधुरी ह्या प्रवचनामधल्या प्रत्येक शब्दामध्ये भरलेली आहे. ज्यांना वाङ्मय काय आहे हें माहीत नाही, ज्यांना वाचनाची विशेष गोडी नाही, ज्यांनी उभ्या हयातींत जीवनाचा कधी विचार केला नाही, अशा आमच्या माहितीच्या अनेक माणसांना आम्ही ह्या पुस्तकाची शिफारस केली. तीं माणसें 'गीताप्रवचनें' वाचून अक्षरशः वेडीं झालीं आहेत. हें पुस्तक आता हातांतून सोडायला किंवा दुसरें पुस्तक हातांत धरावयाला तीं मुळी तयारच नाहीत. आम्ही म्हणतों हें खरें कां खोटें हें ज्यांना पडताळून पहावयाचें असेल त्यांनी एकवार हें पुस्तक वाचूनच पहावें. पक्वान्नाची गोडी शब्दांनी काय वर्णन करावी? तें चाखूनच पाहिलें पाहिजे.

*

'गीताप्रवचनें' हें नांव 'गीताई' इतकें सोपें नाही. 'प्रवचनें' म्हटल्यानंतर त्याचें तात्त्विक आणि क्लिष्ट स्वरूपच डोळ्यांपुढें उभें रहातें. आपल्याकडचें वहुतेक अध्यात्मिक वाङ्मय हें बुद्धीला कष्ट देणारें आहे. आणि पुष्कळसें निरर्थकहि आहे. आजपर्यंत लोक तें कसे वाचीत आले ह्याचेंच मला आश्चर्य वाटतें. विनोबा हे अंतर्बाह्य शिक्षक आहेत. महान् शिक्षक आहेत. शिक्षणाची आधुनिक व्याख्या ही आहे, की मुलें शिकतील अशा रीतीनें जो त्यांना शिकवितो तो शिक्षक. पुष्कळसे शिक्षक म्हणतात, "आम्हीं मुलांना शिकविलें!" हो, तुम्ही मुलांना शिकविलेंत. पण मुलें शिकलीं कां? देण्याची क्रिया जशी घेण्यावाचून पूर्ण होत नाही, त्याप्रमाणे शिकल्यावाचून शिकवण्याची क्रिया पूर्ण होत नाही. श्रोत्यांनी किंवा वाचकांनी शिकावें हा एकच हेतु मनांत बाळगून विनोबा सारें लिहितात किंवा बोलतात. त्यामुळे त्यांचें एकहि अक्षर कधीं वाया जात नाही. तत्त्वज्ञानी विनोबा मोठे आहेत, कां कवि विनोबा मोठे आहेत, कां शिक्षक विनोबा मोठे आहेत, हा 'गीताप्रवचनें' वाचतांना वाक्यावाक्याला संभ्रम पडतो. त्यांच्या प्रतिभेचे हे तिन्ही पैलू एकमेकांवर मात करण्याचा सारखा प्रयत्न करीत असतात. त्यामुळे 'गीताप्रवचनें' वाचतांना आपण एकादी गोष्ट वाचतो आहोंत, का कादंबरी वाचीत आहोंत असें वाटतें. व्यवहारांतले नित्याचे परिचयाचे इतके साधे साधे दृष्टांत विनोबा देतात की, कितीहि कठिण मुद्दा असो, त्याचें पदर उलगडून तो आपोआप तुमच्यापुढे मोकळा होतो. 'गीतेच्या प्रारंभीं युद्ध हें मुळांतच पाप आहे असें अर्जुनाला कां एकदम वाटलें? त्याचें उत्तर देतांना विनोबांनी एका न्यायाधीशाची गोष्ट सांगितली आहे. शेंकडों अपराध्यांना त्यानें फांशीची शिक्षा दिली होती. पण एक दिवस त्याचा स्वतःचा मुलगा खुनी म्हणून जेव्हा त्याच्यासमोर उभा राहिला, तेव्हा तो न्यायाधीश बुद्धिवादाची भाषा बोलूं लागला, की "फांशीची शिक्षा अमानुष आहे. ती रद्द केली पाहिजे." मुलाबद्दलच्या ममत्वामुळे न्यायाधीश असें बोलूं लागला. युद्धाविरुद्ध अर्जुनानें केलेला सर्व युक्तिवाद हा मोहामधून निर्माण झालेला प्रज्ञावादच होता. अर्जुनाचा धर्म क्षात्र होता. तो युद्धप्रवृत्तच होता. पण त्याला आपल्या क्षात्रधर्मापेक्षा संन्यासधर्म श्रेष्ठ वाटूं लागला. तथापि, दुसऱ्याचा धर्म श्रेष्ठ वाटला तरी तो स्वीकारण्यांत आपलें कल्याण नसतें असें भगवंतांनी अर्जुनाला सांगितलें. त्याबद्दल विनोबा म्हणतात, "सूर्याचा प्रकाश मला प्रिय आहे. त्या प्रकाशानें माझी वाढ होते. सूर्य मला वंद्यहि आहे. पण म्हणून मी पृथ्वीवरचें वास्तव्य सोडून त्याच्याजवळ जाऊं पाहीन तर जळून जाईन. सूर्याचें तेज सहन करण्याचें सामर्थ्य माझ्यामध्ये नाही, तोपर्यंत सूर्यापासून दूर पृथ्वीवर राहूनच मी माझा विकास करून घेतला पाहिजे. माशाला जर कोणी म्हणेल, 'पाण्यापेक्षा दूध मोलवान आहे, दुधांत रहा. तर मासा तें कबूल करील कां? मासा पाण्यांतच वांचेल. दुधांत मरेल. दुसऱ्याचा धर्म सोपा वाटला म्हणूनहि तो स्वीकारावयाचा नसतो. बायकामुलांचें नीट रक्षण करतां येत नाही म्हणून कंटाळून का संन्यासी व्हायचें? तें ढोंग होईल. अन् तें जड जाईल. संधि सापडतांच त्याच्या वासना जोर करतील. संसाराचें ओझें झेपत नाही म्हणून वनांत

जाणारा आधी तेथें लहानशी झोपडी बांधील. मग तिच्या रक्षणासाठी ो कुंपण करील, असें करतां करतां त्याला तेथे सवाई संसार उभा करावा लागेल. ज्याची जी खरी वृत्ति तो त्याचा धर्म ! " विनोबांनी एका खाजगी पत्रांत असें लिहिलें आहे की, " मी कोण ? कोऽहं ? ह्या प्रश्नाच्या उत्तरावर स्वकर्तव्य निश्चित होतें. लक्ष्मणाने आपल्याला हाच प्रश्न विचारला, 'कोऽहम् ?' त्याला उत्तर मिळालें, 'रामबंधुरहम्.' तो दशरथाचा मुलगा होता. पण त्याचें अंतस्थ उत्तर 'मी रामाचा भाऊ आहें' असें होतें. 'मी दशरथाचा पुत्र आहे' असें त्याचें उत्तर असतें, तर तो रामाबरोबर वनांत गेला नसता." अर्जुनाला आपण कोण आहोंत ह्याचा भ्रम पडला. क्षात्रधर्मापेक्षा त्याला संन्यास धर्मच श्रेष्ठ वाटला. आता कोणी अशी जर शंका काढील की खरें पहातां जर संन्यास धर्म हा क्षात्रधर्मापेक्षा श्रेष्ठ आहे, तर मग भगवंतांनी अर्जुनाला संन्यासी कां बनविलें नाही ? त्याला विनोबांनी मोठें समर्पक उत्तर दिलें आहे. परमेश्वर हा मोकळीक देणारा आहे. ज्याने त्याने स्वतःच धडपड करावी. त्यांतच गोडी आहे. लहान मुलाला स्वतः चित्र काढण्यांत आनंद असतो. त्याचा हात धरलेला त्याला आवडत नाही. शिक्षक जर मुलांना भराभर गणितें सोडवून देऊं लागला तर मुलांची बुद्धि कशी वाढणार ? अर्जुनाच्या मनांतला मोह दूर करून त्याला त्याच्या कर्तव्याचें स्मरण करून देण्यासाठी म्हणून भगवंतांनी 'गीता' सांगितली. म्हणूनच गीता सांगून झाल्यावर त्यांनी लगेच विचारलें, "अर्जुना, गेला मोह ?" अर्जुन म्हणाला, "होय देवा, मोह मेला. स्वधर्म समजला." व्यासांनी 'महाभारत' लिहिलें तें देखील ह्याच हेतूने. 'लोकांच्या हृदयांतील मोहावरण घालविण्यासाठी मी हा इतिहासप्रदीप पेटवीत आहें' असें त्यांनी प्रारंभीं सांगितलें आहे. कितीहि कठीण विचार असो वा गहन तत्त्व असो, त्याच्या नाडीवर किंवा गाभ्यावर नेमकें बोट ठेवण्याचें कौशल्य फक्त विनोबांमध्येच आहे.

*

अध्यात्मविषयावर लिहिणारे बहुतेक विद्वान् नेहमी ठराविक रीतीने लिहितात. स्वतंत्र प्रज्ञेचा त्यांच्याजवळ अभावच असतो. त्याला विनोबा हे एक ठळक अपवाद आहेत. विनोबांचा प्रत्येक विचार हा स्वतंत्र असतो. पूर्वी आपण तो कुठेहि ऐकलेला नसतो. नावीन्य हें त्यांच्या व्यक्तिमत्वांत आमूलाग्र भरलेलें आहे. प्रत्येक गोष्टीकडे ते आपल्याला नवीन दृष्टीनें पहावयास शिकवतात. ह्याचें कारण कोणत्याहि विचाराच्या तळाशीं जाण्याचें सामर्थ्य त्यांच्या प्रतिभेंत आहे. गीतेच्या चौथ्या अध्यायांतील कर्म आणि विकर्म ह्या कल्पना विनोबांनी किती हृदयंगम शब्दांत समजावून सांगितल्या आहेत बरें ? 'कर्माबरोबर मनाचा मेळ बसला पाहिजे. म्हणजे तें कर्म निराळेंच होतें. तेल व वात ह्यांच्या जोडीला ज्योत आली म्हणजे प्रकाश पडतो. दारूला बत्ती लावली की स्फोट होतो, त्या दारूंत शक्ति निर्माण होते. कर्म ही वस्तु ह्या बंदुकीच्या दारूसारखी आहे. कर्म हें ज्ञानाचें पेटवण आहे. एकादा लाकडाचा ओंडका पडलेला असतो, परंतु त्या लाकडाला पेटवा. तो धगधगीत निखारा होतो. तें लाकूड व तो अग्नि ह्यांत केवढा फरक ! परंतु, त्या लाकडाचाच तो अग्नि असतो. कर्मात विकर्म ओतलें की कर्म दिव्य दिसूं लागतें. आई मुलाच्या पाठीवरून हात फिरवते. एक पाठ व त्या पाठीवरून वेडावाकडा एक हात फिरला. परंतु, त्या साध्या कर्माने त्या मायलेकरांच्या मनांत ज्या भावना उचंबळल्या, त्याचें कोण वर्णन करूं शकेल ? हात फिरवण्याची क्षुद्र क्रिया. पण त्या क्रियेंत आईचें हृदय ओतलेलें आहे. तुळशीरामायणांत एक प्रसंग आहे. राक्षसाशीं लढून जखमी झालेल्या वानराकडे प्रभु रामचंद्राने नुसतें प्रेमपूर्वक पाहिलें. त्याबरोबर वानरांच्या वेदना नाहीशा झाल्या. आई मुलांना मारते म्हणून तुम्ही मारून पहा बरें. तुमचें मारणें मुलगा सहन करणार नाही. आईने मारलें तरी तिच्या पदरांतच तो तोंड खुपशील. कारण आईच्या बाह्य कर्मांत चित्तशुद्धि आहे. तिचें तें मारणें निष्काम आहे. आंतरिक विकर्मामुळें रामाचें तें पाहणें केवळ प्रेमसुधासागर होतें." विनोबांच्या हृदयंगम शैलीचा हा एक प्रातिनिधिक नमुना होय. ध्यानयोगांतील चित्ताच्या एकाग्रतेची विनोबांनी एक फारच सुंदर गोष्ट सांगितली आहे. एका मुसलमान साधूच्या

अंगांत बाण रुतला. त्या बाणामुळे त्याला फार वेदना होत होत्या. बाण काढावयास जावें तर हात लावतांच जास्त वेदना होत. अशा रीतीनें तो बाण काढतां सुद्धा येईना. त्यावेळीं गुंगीचें औषध नव्हतें. मोठा प्रश्न पडला. त्या साधूची एका माणसाला माहिती होती. तो म्हणाला, "बाण काढणें तूर्त राहूं द्या. हा साधु प्रार्थनेस बसला म्हणजे मग तो बाण काढूं." सायंकाळीं प्रार्थनेची वेळ झाली. साधू प्रार्थनेस बसला. एका क्षणांत त्याच्या चित्ताची एवढी एकाग्रता झाली, की तो बाण त्याच्या शरीरांतून काढला तरी त्याला त्याचें भानहि नव्हतें. केवढी ही एकाग्रता? अडाणी माणसाची सुद्धा भावना किती महत्वाची आहे हें समजावून सांगतांना विनोबांनी एक गोष्ट सांगितली आहे. यमुनेच्या पुलावरून आगगाडी जात असतांना एका भाविकानें नदींत दिडकी टाकली. शेजारीं एक गृहस्थ होते. ते विनोबांना म्हणाले, "आधींच देश दरिद्री. अन् त्यांत हे लोक असें व्यर्थ पैसे दवडतात." विनोबा त्यांना म्हणाले, "तुम्ही त्या माणसाचा हेतु नाही ओळखलात. ज्या भावनेनें त्या दोन दिडक्या त्यानें फेकल्या त्या भावनेची किंमत दोनचार पैसे होईल की नाही? नदी म्हणजे ईश्वराची जणूं करुणा वाहून राहिली आहे, असें मनांत येऊन जर त्या भाविकाच्या मनांत त्यागाची भावना उत्पन्न झाली, तर त्या भावनेला तुमच्या अर्थशास्त्रांत कांही स्थान आहे कां? देशांतील एक नदी पाहून त्याचें अंतःकरण द्रवलें. ही भावना तुम्हांस समजेल तर मग मी तुमच्या देशभक्तीची पारख करीन. देशभक्ति म्हणजे का भाकर! देशांतील महान् नदी पाहून सारी संपत्ति तिच्यांत बुडवूं दे. तिच्या चरणीं अर्पूं दे. असें मनांत येणें ही केवढी देशभक्ति. परमेश्वराच्या पायापुढे ही सारी धूळ तुच्छ आहे. तुम्ही म्हणाल नदीचा न् परमेश्वराचा काय संबंध? नदी म्हणजे ऑक्सीजन आणि हायड्रोजन. सूर्य म्हणजे किटसन् वत्तीचा एक मोठा प्रकार. त्याला काय नमस्कार करावयाचा? नमस्कार फक्त तुमच्या भाकरीलाच! मग त्या भाकरींत तरी काय आहे? ती भाकरी म्हणजे तरी एक पांढरी मातीच. तिच्यासाठी का मिटक्या मारतां? एवढा सूर्य उगवला, अशी ही सुंदर नदी दिसली. तेथें परमेश्वरी अनुभव यावयाचा नाही तर कोठे यावयाचा?" दहाव्या अध्यायाच्या प्रवचनांत तर विनोबांच्या प्रतिभेला असा कांही बहर आलेला आहे म्हणतां! सृष्टींत परमेश्वर भरून राहिला आहे ह्याचीं उदाहरणें देतांना विनोबांच्या मुखांतून काव्याचा धबधबा बाहेर पडला आहे. सबंध मराठी वाङ्मयांत असें रमणीय गद्यकाव्य कुठेहि आढळणार नाही. त्यामधले काय काय अन् किती किती उतारे द्यावेत? हा एकच नमुना पहा, "आणि तो घोडा! किती उमदा, किती प्रामाणिक किती स्वामिनिष्ठ! अरब लोकांचें घोड्यावर किती प्रेम! ती त्या अरबाची गोष्ट तुम्हाला आहे ना माहीत? तो अडचणींत सापडलेला अरब सौदागरास घोडा विकण्यास तयार होतो, हातांत मोहरांची थैली घेऊन तो तबेल्यांत जातो. परंतु घोड्याच्या त्या गंभीर प्रेमळ डोळ्यांकडे त्याची नजर जाते; पण ती थैली तो फेकतो व म्हणतो, 'जीव गेला तरी हा घोडा मी विकणार नाही. माझें काय व्हायचें तें होईल. नाही जेवायला मिळालें तर नाही. परमात्मा पाहून घेईल.' पाठीवर थाप मारतांच कसा प्रेमानें फुरफुरतो. कशी त्याची ती आयाळ! खरोखरच घोड्यांत अमोल गुण आहेत. सायकलींत काय आहे? घोड्याचा खरारा करा. तो तुमच्यासाठी मरेल. तो तुमचा मित्र होईल. माझा एक मित्र घोड्यावर बसावयास शिकत होता. घोडा त्याला पाडी. तो मजकडे येऊन म्हणाला, 'घोडा पाठीवर बसूंच देत नाही.' मी त्याला म्हटलें, 'तुम्ही घोड्यावर फक्त बसावयास जातां, परंतु त्याची सेवा करतां का? सेवा दुसऱ्यांनी करायची आणि तुम्ही पाठीवर बसायचें. हें कसें जमेल? तुम्ही स्वतः त्याला दाणापाणी द्या, त्याचा खरारा करा आणि मग बसा!' तो मित्र तसें करूं लागला. कांही दिवसांनी तो मजकडे येऊन म्हणाला, 'आता घोडा पाडीत नाही.' घोडा हा परमेश्वर आहे. तो भक्ताला का पाडील? त्याची भक्ति पाहून घोडा नमला. हा भक्त आहे का तिऱ्हाईत आहे, हें घोडा बघतो. भगवान् श्रीकृष्ण स्वतः खरारा करावयाचे व पीतांबरांतून चंदी चारावयाचे. टेकडी आली, नाला आला, चिखल

आला, की सायकल अडली. परंतु घोडा उड्या मारीत जातो. सुंदर प्रेमळ घोडा म्हणजे परमेश्वराची मूर्ति." राम व वानर दोस्त झाले, ह्यांतच खरोखर रामाचें रामत्व व रमणीयत्व आहे. रामाने वानराच्या ठिकाणचा परमात्मा पाहिला. त्यांच्याशीं प्रेमाचे जिव्हाळ्याचे संबंध जोडले. रामायणाची ही किल्ली. ही किल्ली सोडाल तर गोडी गमवाल. पितापुत्रांचे, मायलेकराचे संबंध अन्यत्रहि दिसतील. परंतु नरा-वानराची अन्यत्र न दिसणारी मधुर मैत्री रामायणांत आहे. वानरांच्या ठिकाणचा देव रामायणानें पचनीं पाडला. ही दृष्टि विनोबांखेरीज दुसऱ्या कोणाला असणार? सृष्टीबद्दल लहान मुलाला जें हें कौतुक वाटतें त्यावर सारी इसापनीति उभारलेली आहे. इसापाला सर्वत्र ईश्वर दिसत होता. इसापाच्या राज्यांत दोन हातांचा दोन पायांचा हा मनुष्य प्राणीच तेवढा नाही. तेथें कोल्हेकुत्रे, ससेलांडगे, कावळेकासवें सारे आहेत. सारे बोलतात. सारे हसतात. एक प्रचंड संमेलनच आहे तें. इसापाशीं सारी चराचर सृष्टि बोलत आहे. त्याला दिव्य दर्शन झालें आहे. हा विचार विनोबांखेरीज दुसऱ्या कोणाला सुचणार? अभिनव विचारांनी आणि माधुर्यपूर्ण भावेनें सारीं 'प्रवचनें' अगदीं फुलीं फुलून गेलीं आहेत. अठराव्या अध्यायाच्या अखेरीस भगवंतांनी अर्जुनाला आधी विचारस्वातंत्र्य देऊन मागाहून तें काढून घेतलें. आणि "मला शरण ये" असें सांगितलें. "आता 'मी' हा विचारच नको. सारे 'तूं' असें व्हावें" असें भगवान म्हणाले. त्यावेळीं विनोबांनी एका जुन्या दृष्टांताची आठवण करून दिली आहे. बकरें जिवंत असतांना 'में–में–में' करीत असतें. म्हणतें मी–मी–मी. पण तें मरून त्याची तात पिंजणाला लावली कीं तें म्हणतें, 'तुहि–तुहि–तुहि!' तूंच–तूंच–तूंच–तुहि–तुहि तुहि–विनोबांच्या लेखनाबद्दल काय लिहावें अन् काय बोलावें? विनोबांचीं 'गीताप्रवचनें' हा विचारामृतानें तुडुंब भरलेला एक सुवर्णकलशच होय!

ब्रह्मचर्या

ब्रह्म चेतलें—जीव जाहले
जीव होउनी—सौख्य भोगिलें ॥१॥
सौख्य भोगणें—आवडे तया
ब्रह्म तो पुन्हा—होय कासया? ॥२॥
जीव सर्वही –आत्मरूप तो
मानुनी खरें—सौख्य भोगतो ॥३॥
त्यजुनि वासना—करित कर्म तो
त्याहि कारणें—सौख्य भोगतो ॥४॥
सौख्य भोगता—मृत्यु त्यासही
ब्रह्मिं लीन हो—अंतिं सर्वही ॥५॥

—डॉ. भाऊजी दफ्तरी

महाराष्ट्राचें विचारधन (पान २७ वरून)

म्हणून त्यांचे साधुत्व आणि आर्ष जीवन हा या विसाव्या शतकांतला मी एक दैवी चमत्कार समजतों.

आणि, त्यांच्या या व्यक्तित्वाचें प्रतिबिंब म्हणून, त्यांच्या आत्मचिंतनाचा आणि आत्मानुभूतीचा आविष्कार म्हणून मला त्यांचें संपूर्ण वाङ्मयहि विलोभनीय वाटतें. त्यांत साहित्याचें वैदग्ध्य नसलें, तरी त्यांच्या व्यक्तित्वाची विशालता आणि तीक्ष्णताहि आहे. त्यामुळें त्यांचें वाङ्मय हें या विसाव्या शतकांतील महाराष्ट्राचें मोठेंच विचारधन म्हणतां येईल. कारण, त्या वाङ्मयानें श्रीज्ञानेश्वरांपासून चालत आलेली महाराष्ट्राच्या जीवनादर्शाची आणि साधुत्वाची परंपरा या विज्ञानयुगांतहि खंडित झालेली नाही, हें सिद्ध केलें आहे.

म्हणून, 'युगवाणी'त केलेल्या त्यांच्या गौरवांत माझा, कदाचित् कांहींना विसंवादी वाटेल असा, सूर मिसळण्याची संधि आपण स्नेहभावानें मला दिली, हे मी आपले उपकार समजतों. विनोबा हे या युगाचे ऋषि आहेत. त्या या महान् भारतीय युगर्षीचा गौरव 'युगवाणी'नें त्यांच्या जन्मदिनीं करावा, हें तिचें कर्तव्य नाही काय?

नागपूर
२८–९–५५

आपला,
ग. त्र्यं. माडखोलकर

पूज्य विनोबा

मा. ज. कानेटकर

म्हणे 'विनोबांचें वर्णन करा'! नर करणी करे तो नरका नारायण होय हा एक अमर सिद्धांत आहे. पैकी कोणीहि जेव्हा "नर" या नात्याने प्रस्थानविंदूच्या आसपास वावरतो, तेव्हा तो इतका उपेक्षणीय असतो कीं कोणीहि त्याचें वर्णन करण्याच्या भानगडींत पडत नाही. नंतर क्रमशः तो जसजसा पराक्रम गाजवूं लागतो तसतसें त्याचें वर्णन होऊं लागतें. तें शक्यहि असतें. पण एखादी अद्वितीय विभूति जेव्हा 'नर'त्वाची परमोच्च मर्यादारेषा ओलांडून 'नारायण'त्वाच्या क्षेत्रांत प्रवेश करते तेव्हा ईश्वराचें वर्णन करण्याबाबतच्या सर्व अडचणी कोणाहि वर्णन करूं इच्छिणाऱ्यापुढे उभ्या राहतात. समुद्राची शाई व मेरूची लेखणी यांच्या साहाय्याने धरणीमातेचा कागद लिहून अगदी संपविला तरी म्हणे नारायणाच्या गुणांचें वर्णन संपणार नाही. बुद्धिसर्वस्व खर्च करून एखादी व्याख्या करावी नि मग स्वतःच 'नेति नेति' म्हणून तिच्यावर लाल शाईची रेघ ओढावी, तशागत कांही तरी होत असतें.

मग प्रश्न असा की जर विनोबा मानवतेची परमोच्च सीमारेषा ओलांडून आज 'नारायण'त्वाच्या क्षेत्रांत वावरत असले (आणि तसे ते वावरत आहेत या बाबत माझ्यापुरती तरी मला यत्किंचित्हि शंका नाही) तर अशा विभूतीचें वर्णन करण्याचा प्रयत्न करून मी त्यांना मोठेपण मिळवून देणार-की लहान बनविणार, या शंकेमुळें माझा खरोखर कांहीहि लिहिण्यास धजावण्याचा विचार नव्हता. विशालत्वाची एक अशी मर्यादा आहे की तिच्या समोरासमोर उभें राहिल्याबरोबर वाचा बंदच व्हावी. असें ज्या विनोबांचें विशालत्व आहे, त्या विनोबांचें वर्णन काय करणार? पण ज्यांना ज्यांना "युगवाणी"च्या संपादकांनी विनंती केली त्या सर्वांनीच लेखणी खुंटल्याची खबर पुढे केली तर त्यांचा विनोबा "खास अंक" निघणार तरी कसा, हाहि विचार मनांत आला, म्हणूनच मोठा प्रयत्न करून पूज्य विनोबांबद्दल थोडेंफार लिहिण्याचा प्रयत्न करीत आहें.

विनोबांना मी प्रथम १९२१ मध्यें पाहिलें. त्यानंतर तब्बल २५ वर्षांनी पवनारच्या आश्रमांत १९४६ मध्ये एका मित्राबरोबर त्यांना भेटलों. त्यांचा प्रत्यक्ष संपर्क अथवा समागम असा मला फारच कमी लाभला; पण पूर्ण २५ वर्षांनंतर त्यांनी मला प्रश्न विचारला, "कायहो १९२१ मध्ये नागपूरच्या टिळक विद्यालयांत कोणी कानेटकर होते ना?" मी उत्तरलों, "तोच मी." "परगुणपरमाणून्पर्वतीकृत्य" या वृत्तीचा द्योतक असा त्यांचा प्रश्न होता. विनोबांचें मला विस्मरण होणें शक्यच नव्हतें. पण माझ्या स्मृतीला त्यांच्या हृदयांत एक कायमचें स्थान आहे हें पाहून मला फार आनंद वाटला. थोडा अभिमानहि वाटला.

या पंचवीस वर्षांत विनोबांत एक अत्यंत आल्हाद-दायक फरक घडून आलेला मला दिसला. हा फरक कदाचित् त्यांच्यांत झालेला नसेल; संभवतः माझ्या नजरेंतच झाला असावा. पण १९४६ च्या भेटींत माझा विनोबांबाबतचा आदर पराकोटीला पोचला आणि तो सतत वाढीवरच आहे.

पंचवीस वर्षांच्या मुदतींत विनोबांच्या तपस्येंत, योग्यतेंत, उपयुक्ततेंत, प्रभावांत सतत वाढ व्हावी हें क्रमप्राप्तच होतें. पण १९२१ मधील विनोबा मला थोडे अहंकारी वाटले. मी अगदीच तरुण होतों; अहंकाराने तर आजहि मला पीडिलेलें आहे. तेव्हा १९२१ चें काय पुसतां? खरं मला जो अहंकार विनोबांत दिसला तें कदाचित् माझ्या स्वतःच्या अहंकाराचें प्रतिबिंब असावें. पण कांही कां असेना १९२१ मध्यें माझा तसा समज झाला हें खास.

१९४६ मध्ये जेव्हा पवनार आश्रमांत त्यांना भेटावयास गेलों तेव्हा पूर्वीचेंच अहंकारी विनोबा तर

अनुक्रमणिका

भेटणार नाहीत ना ? अशा थोडया भयानेच गेलों. पण त्या दिवशींच्या विनोबांत अगदी माझ्याहि नजरेला अहंकाराचा वास सुद्धा दिसेना, तेव्हा मात्र माझ्या त्यांच्याबद्दलच्या आदरभावाने निमिषार्धांत अनन्यत्वाची परिसीमा गाठली.

स्वराज्यप्राप्तीनंतर तर विनोबा आधुनिक दधीचि प्रमाणे वावरत आहेत. डॉक्टरी सल्ला, आरोग्याचे नियम या सर्वांना वाऱ्यावर वसून निव्वळ आत्मिक बळावर आमच्या देशाला सन्मार्गावर खेचून आणण्याच्या प्रयत्नांत असलेले विनोबा स्वतःचीं हाडें ज्या प्रकाराने झिजवीत आहेत, तो प्रकार कदाचित् एकाकी देह विर्सजित करून हिंसात्मक युद्धांत उपयोगी पडणारें एक अस्त्र देवांना उपलब्ध करून देण्याकरिता सर्व हाडांची मोळी एकदम देवांना उपलब्ध करून देण्याच्या प्रकारापेक्षाहि श्रेष्ठ ठरेल. विनोबांची गीताई, उपनिषदांवरील प्रवचनें, प्रार्थनोत्तर भाषणें, जगांतील यच्चयावत् समस्यांबाबत त्यांनी वेळोवेळीं प्रकट केलेले विचार, त्यांचा बेसुमार व्यासंग, डझनांवर भाषांवरील प्रभुत्व इत्यादींपैकी एखादीहि गोष्ट करून कोणालाहि प्रसिद्धी मिळाली असती. तेव्हा हा सर्व समुच्चय ज्या विनोबांत एकाच वेळीं सापडतो त्या विनोबांचें काय मोजमाप करावें व कसें ?

त्यांच्या भूदान यज्ञ कल्पनेने तर जगाचे डोळे दिपविले आहेत. शेतांतील धुरा एक दोन हात इकडे तिकडे झाला की जे लोक प्राणघातक मारामारी करण्यास मागे पुढे पहात नाहीत ते लोक लक्षावधि एकरांचें स्वयंस्फूर्त दान विनोबांना कां व कसें देत आहेत हें न कळून खुद्द आमच्या देशांतील कैक विचारवंत सुद्धा मूक बनले आहेत.

असें किती तरी लिहितां येईल. विनोबांनी देशास उपयोगी पडावें या हेतूने आत्मोन्नतीचा परमोच्च बिंदु गाठला असून ते आमचे सतत मार्गदर्शन करीत आहेत. भौतिक क्षेत्रांत आम्हाला पं. नेहरूं सारखे पंतप्रधान मिळावे व सोबतच आध्यात्मिक क्षेत्रांत विनोबांसारखे ऋषि सतत मार्ग दाखवीत असावे यापेक्षा अधिकाची आम्हांला अपेक्षा करण्याचा काय हक्क आहे ! आणि हें सर्व मार्गदर्शन उपलब्ध असूनहि जर आम्ही देशोद्धाराचे बाबतींत मागे राहणार असूं, कर्तव्य पराङ्मुखतेचें जीवन कंठणार असूं, तर भावी इतिहासकार आम्हांला करंटे म्हटल्याशिवाय राहणार नाहीत. योग्य मार्गदर्शनाची कल्हई उपलब्ध आहे, पण जोंवर आमच्या मनाचीं ताटें देशकल्याणाच्या निदिध्यासाने तापून लाल होणार नाहीत तोंवर आमच्या थंड हृदयांवर विनोबांच्या मार्गदर्शनाच्या कल्हईची कांडी कशीहि व कितीहि फिरली तरी आमच्यावर मानवतामूल्यांची कल्हई चढणार कशी ? या प्रश्नाचें उत्तर मात्र अजून मिळालें नाही.

वामनावतार

भारतीं नव्याने अवतरला वामन
हें त्याच्या पावन पायीं लवलें मन !

'भूपतीं' खरे जे, झोळी त्यांच्या हातीं
रीतच जगाची मुळी अशी उफराटी !
'सब भूमी गोपालकी' करित ललकारी
भूभिक्षा मागे हिंडत हा पदयात्री
ठेवतांच पहिलें सत्याचें पाऊल
लागली जगाला तेजाची चाहूल
टाकतांच पाऊल दुसरें—सरली हिंसा
राणीव गाजवी सकलजनमनिं अहिंसा
हा शांतिदूत टाकितसें पाऊल तिसरें
साम्राज्य शांतिचें अखिल जगावर पसरे

हीं तीन पावलें विश्वाला व्यापितीं
हीं तीन पावलें आनंदा निर्मितीं
भारतीं नव्याने अवतरला वामन
हीं तीन पावलें त्याचीं, त्यां वंदन !

—माधव गोपाळ जामदार

विनाशाकडून शाश्वत सौख्याकडे

प्रा. गो. स. कामत

निसर्गाने मनुष्याला बुद्धि देऊन इतर प्राण्यांहून निराळें असें वेगळेपण बहाल केलें आहे. पण मनुष्य-जात आज जितकी केविलवाणी दिसत आहे तितकी पूर्वी ती कधीच दिसली नव्हती. इतर प्राणिचरांहून अधिक दयनीय अवस्था मनुष्यप्राण्याची आज झालेली आहे. साधनें व शस्त्रें निर्मिणारा सृजनशील बुद्धीचा मानव असहायपणें भविष्याकडे पाहत आहे, ही गोष्ट आश्चर्याची व खेदाचीहि नाही काय? जीवनाचीं मूल्यें ढासळूं लागलीं आहेत. जीवनाचें अधिष्ठान कोणतें, यावावत गोंधळ उडाला आहे. विज्ञान आणि श्रद्धा यांत काडीमोड झाली आहे. नवीन मार्ग दिसत नाही. जुना तर त्याज्य वाटत आहे. पण अगतिकता पिच्छा सोडीत नाही. त्यामुळे तुंबलेल्या जलाशयाचें मालिन्य समाजावर साकळलें आहे. हीच परिस्थिति चालूं राहिली तर विनाश अटळ आहे. म्हणून समाजांतले विचारवंत द्रष्टे वेळोवेळीं मार्गदर्शन करून समाजांत नवचैतन्य ओतण्याचा प्रयत्न करतात. आपलें जीवन त्याप्रीत्यर्थ वाहून टाकतात. आचार्य विनोबाजी भावे अशा थोडयांपैकी एक आहेत.

समाजाच्या आजच्या वैफल्याचीं कारणें केवळ आर्थिक आहेत काय? प्रत्येक प्रश्न हा मुळाशीं व्यक्तीच्या कल्याणाचा असला तरी तो केवळ आर्थिकच असतो असें नाही. आर्थिक विवंचना दूर झाली तर समाज सुखी होईल, हें अंशतः खरें आहे. असंख्य गरजांचें समाधान करणें हा अर्थशास्त्राचा विषय आहे. पण ज्या गरजांचें मिळून मानवी जीवन बनतें त्या जीवनाला एकादें अधिष्ठान असणेंहि आवश्यक आहे. आणि तें नैतिक असलें पाहिजे. यांत दुमत व्हावयाचें कांही कारण नाही. रूढ समजुतीप्रमाणे अर्थशास्त्र नुसतें वर्णन करतें, आदेश देत नाही, हें अर्थशास्त्रापुरतेंहि मान्य करणें सोयीचें नाही. कारण समाजशास्त्राचीच तें एक शाखा आहे. त्या शास्त्राच्या मूलभूत ध्येयाशीं अर्थशास्त्रासहि कर्तव्य आहे. समाजशास्त्राचें ध्येय व्यापक व विधायक आहे. व तें गाठण्यास अर्थशास्त्रानेहि साहाय्य केलें पाहिजे. म्हणून केवळ 'अर्थ आणि काम' पुरेसा नाही. त्याची 'धर्म व मोक्षाशीं' सांगड घातली जाणें आवश्यक आहे.

समाजांतली आजची अर्थव्यवस्था यंत्राधिष्ठित विशाल उत्पादन, खासगी लाभाचें उद्दिष्ट आणि खासगी मालमत्ता यांनी आवृत अशी आहे. शोषण, विषमता, अन्याय हीं त्याची फळें आपण अनुभवीत आहोंतच. उपभोगासाठी उत्पादन व्हावें. गरजा अनुसार तें व्हावें. पण विद्यमान समाजांत वस्तूंचें उत्पादन आधी होतें आणि तें खपविण्यासाठी गरजा निर्माण केल्या जातात. हा क्रम अनैसर्गिक म्हणून उलटा आहे. एवढेंच नव्हे तर त्यामुळे मनुष्याला दुय्यम स्थान मिळालें आहे. हें अर्थात् योग्य नाही. ज्यांच्या लक्षांत हा दोष आला आहे ते नवीन नवीन अधिष्ठान समाजाला देऊन त्यानुसार परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. आजची अर्थव्यवस्था मूठभर लोकांच्या स्वार्थाला अनुकूल आहे आणि स्वाभाविकपणें कोणत्याहि नवीन वैचारिक अधिष्ठानाला त्यांचा विरोध होतो.

आचार्य विनोबाजी हे महात्मा गांधींच्या प्रभावळींतील प्रमुख पुरुष आहेत. तेव्हा गांधीजींच्या आर्थिक व इतर विचारांचा त्यांच्या आचारविचारांवर परिणाम होणें अपरिहार्य आहे. तरीहि एका अर्थानें विनोबाजींनी गांधीजींचें तत्त्वज्ञान अधिक पुढे नेलें आहे हें मान्य करावयास कांही प्रत्यवाय दिसत नाही. त्यांतच त्यांच्या आचारविचारांची मौलिकता दिसून येते. महात्माजी विनोबांचें स्फूर्तिस्थान होते. पण विनोबाजींनी आपलेंहि 'स्वतंत्र दर्शन' भारतीय जनतेला करून दिलें आहे. गांधींनी राजकारणांत अहिंसा व सत्याग्रह आणून त्याला नैतिकता प्राप्त करून दिली. कोणत्याहि राज-

कारणाचा अंतिम हेतु व्यक्तिविकास साधणें हाच असतो. त्यासाठी प्रत्यक्ष सामाजिक व आर्थिक क्षेत्रांतहि उतरावयास हवें. महात्माजी असते तर त्यांनी या क्षेत्रांत पदार्पण केलें असतें. पण त्यांच्या मृत्यूनंतर हेंच कार्य एकदम पुढे येऊन विनोबाजींनी हातीं घेतलें आणि वेळेची सावधानता दर्शविली. याबद्दल आपण त्यांचें ऋणी राहिलें पाहिजे. विनोबाजी सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रांत जी क्रांति घडवून आणूं इच्छितात ती अहिंसामय, भूदानमूलक व ग्रामोद्योगप्रधान आहे. या ध्येयाने प्रेरित होऊन सुरू केलेल्या त्यांच्या कार्याला फार दिवस झाले, असें म्हणतां येणार नाही. पण त्याहि अवधींत त्यांनी मिळविलेल्या यशावरून याहि किरकोळ देहयष्टि असलेल्या व्यक्तीच्या इच्छाशक्ति आणि कार्यशक्ति यांचा अचंबा वाटल्यावाचून राहत नाही.

१८ एप्रिल, १९५१ मध्ये पोचमपल्ली या तेलंगणांतल्या एका गावांत त्यांनी भूदानाचा श्रीगणेश केला. हा क्रांतिकारी विचार त्यांच्या सम्यक् विचारभूमिकेची एक बाजू आहे. भू-दान हा तात्कालिक उपाय नाही. तो एक मूलगामी विचार आहे. सामाजिक विकासाच्या दिशेने नेणारी ती एक मौलिक प्रेरणा आहे.

आर्थिक विषमता नाहीशी करण्याचें ध्येय बाळगणारें समाजवादी तत्त्वज्ञान आधुनिक युरोपांत उगम पावलें. त्यासाठी आधारभूत होईल अशी राज्यसंस्था निर्माण करण्याची कल्पना हीहि मुळांतील तिकडचीच. पण त्यांची निर्भेळ भौतिकवादी बैठक भारतीय वातावरणांत रुजविणें कितपत उचित होईल, हा विचारणीय प्रश्न आहे. महात्माजींच्या आध्यात्मिक दृष्टिकोनाशीं त्याची सांगड घालून माणसाचें 'मानव्य' त्याला प्राप्त करून देणाऱ्या प्रयत्नांचें स्वागत केलें पाहिजे. सत्य, शिव व सुंदर असें साध्य गाठावयाचें तर साधनांचीहि शुचिता राखावयास हवी. दण्डधारी राज्यसंस्थेशिवाय समाजाला स्वतःचें शासन करतां आलें पाहिजे. हें जर ध्येय मान्य केलें तर अनत्याचारी सर्वोदयनिष्ठ सेवावृत्ति स्वीकारली पाहिजे, हें ओघानेंच येतें. विनोबाजींनी या आपल्या कार्यासाठी प्रत्यक्ष जनसमूहांतच उडी मारली आहे. सरकारी साह्याची अपेक्षा धरली नाही. यांतलें मर्म उघड आहे. पुष्कळांना भूदान हें दंतविहीन ध्येय (टूथलेस आयडियल) वाटतें. प्रत्यक्षांत तें पूर्णतया येऊं शकेल की नाही, याची त्यांना शंका वाटते. विनोबाजींचें प्रभावी व्यक्तित्व व भारतीय धर्मश्रद्धा यांचें पाठबळ सध्या असल्याने ध्येय आकारास येत असल्याचा भास होतो आहे, असें त्यांचें म्हणणें आहे. कम्यूनिस्टांना भूदानाची मर्यादित उपयुक्तता वाटते याला सदिच्छेरलीकडे अर्थ नाही. पण विनोबाजींची भूदानाची कल्पना संकुचित नाही, हें लक्षांत घेणें प्रथम आवश्यक आहे. मालकी हक्काविरुद्ध सुरू झालेल्या सामाजिक सत्याग्रही क्रांतींतील तें पहिलें पाऊल आहे. वर्गविहीन समाज निर्माण करावयाचा तर 'असंग्रहाचें' तत्त्वहि मान्य केलें पाहिजे. भारतीय घटनेंत तें अन्तर्भूत केलेलें नाही. त्यामुळे खरें स्वातंत्र्य अजून यावयाचें आहे! नाममात्र स्वराज्य झालें. सुराज्य दूर राहिलें. धनसंचयावर आधारलेली समाजरचना या ना त्या अवस्थेंत कमी अधिक प्रमाणांत हुकूमशाही, साम्राज्यवादी बनण्याचा संभव नाहीसा होत नाही. विनोबाजींना इतक्या दूरवरचा पल्ला गांठण्याची आकांक्षा आहे. पण त्यासाठी समाजाची मनोवृत्ति तयार करायला हवी. भू-दानाच्या द्वारां ती तयार करण्यास सुरुवात झाली आहे. कृषिप्रधान भारतांतील ग्रामीण जनतेंत हें चैतन्य निर्माण करतां आलें तर इतर आर्थिक क्षेत्रांना वळवून घ्यावयाला वेळ लागणार नाही. सामाजिक स्वामित्वाच्या कल्पनेला भारतांतील राजकीय पक्षांतील विचारवंतांनी तात्त्विक का होईना पण पाठिंबा दिला आहे. राजकीय क्रांतीनंतर आर्थिक क्रांतीच्या घोषणा होण्याचें तरी कारण हेंच आहे! विनोबाजी केवळ भू-दान यशस्वी झाल्यानें समाधान पावणार नाहीत. कारण भूमि वाटून टाकल्याने सर्व प्रश्न सुटत नाहीत, हें त्यांनाहि मान्य आहे. पण ही मोहीम सफल झाल्यामुळे जी मनोभूमिका तयार होईल तीमुळें इतर प्रश्न सुटण्यास साहाय्य होईल. व्यक्तींनी आपल्या स्वार्थातला 'स्व' समाजव्यापी केला पाहिजे. त्यासाठी त्याग अभिप्रेत आहे. सक्तीचा नव्हे, स्वयंप्रेरित! भूदानामुळें हें वातावरण निर्माण होईल अशी अपेक्षा आहे. स्वाभि-

त्याच्या कल्पनेला धक्के बसत आहेत. या मोहिमेचें यश तुलना म्हणून सरकारी भूमि-सुधार कायद्याने घडवून आणलेल्या प्रगतीशीं ताडून पाहण्यासारखें आहे. भूदानाच्या बाजूचें पारडें जड झालेलें दिसेल ! अहिंसक स्वरूपामुळे तें यश अधिक भव्य व काव्यमय दिसतें ! 'कल्पना' हळूहळू लोकक्रांतीचा आकार घेत आहे. दान देणारा व तें घेणारा या दोघांच्याहि मनोवृत्ति उंचावत आहेत. यांचा समूह वाढत जाईल तसतसा समाज विकसित होत जाईल.

यामुळेच 'दान' या शब्दाला विशेष अर्थ प्राप्त होतो. 'दानं समविभागः ।' यांत अभिप्रेत असलेल्या दानाच्या अर्थाला कर्तव्यबुद्धीची जोड आहे. रूढार्थाने उच्चनीचतेचा होणारा बोध या कल्पनेशीं बिलकुल सुसंगत नाही. संपत्तिदान ही भूदानाच्या पुढली पायरी. कर्तव्यबुद्धीची जोड दिल्याने संग्रहाची भावना क्षीण होत जाईल. विकेन्द्रीकरण घडून येईल. आजच्या समाजांत पैशाला मानवापेक्षा अधिक प्रतिष्ठा आहे म्हणून संग्रहभावना बळकट झालेली दिसते. पैशाची ही प्रतिष्ठा कमी करतां आली तर संग्रहाची भीति कमी होईल. यासाठी अर्थात् मानवाला प्रतिष्ठा अगोदर मिळवून दिली पाहिजे. व्यवहारांत पैसा राहणार नाही, असा याचा अर्थ नाही. विनिमयाचें माध्यम म्हणून तो राहूं शकेल. पण केवळ पैशासाठी व्यवहार होणार नाही. विनोबाजींनी यासंबंधांत दिलेला एक दृष्टान्त पाहण्याजोगा आहे. 'यशोदेच्या अर्थव्यवस्थेचा आधार पैसा होता. कृष्णाच्या अर्थव्यवस्थेचा आधार वितरण हा होता. ग्रामांतील लोकांचें 'भोज्य' लोणी शहरांत विकावयास जाई. हें कृष्णाला मान्य नव्हतें. म्हणून तें तो बाळगोपाळांत वाटून टाकी !' गावांतले कापूस पिकवतात व बाहेरच्यांना विकतात. बाहेरून कापड विकत घेतात. तीळ विकतात व तेल विकत घेतात. स्वास्थ्यप्रद लोणी विकतात व 'वनस्पति' विकत घेतात. आणि हें कशासाठी ? पैशासाठी ! गावांत निर्माण होणाऱ्या वस्तु गावांतल्या लोकांना प्रथम उपलब्ध व्हावयास हव्यात.

आजचा मनुष्य पैशामागे आहे. जड वस्तूचें माहात्म्य चैतन्यमय वस्तूहून आपण अधिक मानीत आहोंत. म्हणजें पैशाला पोकळ प्रतिष्ठा दिली गेली आहे. तीच त्यांतून काढली तर असंग्रह वृत्ति बाणवितां येईल. व्यक्तीच्या मोठेपणांत समाजाचाहि भाग असतो. म्हणून समाजाचा भाग समाजाला देण्यांत आपल्यावर अन्याय होत नाही. उलट कर्तव्य पार पाडल्याचें श्रेय मिळतें. समाजाचें ऋण फेडलें नाही तर तो तें हक्कानें मागून घेईलच. पण आपण होऊन ही वृत्ति जाणणें शहाणपणाचें आहे. त्यामुळे समाजाने न मागतां आपण समाजाला संपत्ति देण्यायोगे उपकार केल्याची कल्पना येऊं शकत नाही. संपत्तिदानानुसार विनोबाजी सहावा हिस्सा व्यक्तीच्या संपत्तीचा मागत आहेत. हें प्रमाण समाजाची मनोभूमि जसजशी तयार होईल तसतसें वाढत जाईल. आणि त्यांची अशी साधार श्रद्धा आहे की, संग्रहाची गरज पडणार नाही, अशी सामाजिक अवस्था प्रत्यक्षांत दिसेल ! कारण त्यावेळीं प्रत्येकाची अशी खात्री पटलेली असेल की, घरोघर असलेली संपत्ति सर्वांसाठी आहे !

श्रीमंतांकडून संपत्ति हिरावून घेण्याची कल्पना विनोबाजींच्या तत्त्वज्ञानाशीं विसंगत आहे. कारण त्यांत सक्ती आहे. त्याऐवजीं दुसरा सनदशीर मार्ग आहे. श्रीमंत संग्रह करतात कशासाठी ? प्रतिष्ठेसाठी. ती पैशांत नाही हें त्यांना पटवून देतां आलें, तोच पैसा त्यांनी समाजाकरिता वापरल्यानंतरहि त्यांचें जीवनमान, प्रतिष्ठा, भविष्याची शाश्वति त्यांना मिळवून देतां येईल अशी त्यांची खात्री पटली म्हणजे त्यांना संग्रह करण्याचें कारण उरणार नाही. संपत्तीसाठी संपत्तीचा संचय कोणी करीत नाही. असें करणाऱ्या व्यक्तीला कृपणच म्हणावें लागेल. अशी व्यक्ती समाजाला साधन उपलब्ध करून देत नाही. म्हणून त्याला चोराइतकाच गुन्हेगार मानलें पाहिजे. विनोबाजींनी सांगितल्याप्रमाणे न मागतां घेणें हा जसा गुन्हा आहे तसाच गरजवंताला न देणाराहि गुन्हेगार समजणें योग्य होईल.

शिक्षकाचें उदाहरण देऊन त्यांनी 'निष्कांचनाची' आगळी कल्पना स्पष्ट केली आहे. प्राचीन काळांतील अध्यापक निष्कांचन होता. याचा अर्थ 'कांचन चिन्तामुक्त' होता. दरिद्री नव्हे, त्याच्या प्रतिष्ठेप्रमाणे त्याला

मिळत असे. आणि तोहि त्याचा घर्म सांभाळीत असे. विद्या दिल्याने जशी वाढते, तशी संपत्तिहि दिल्याने वाढते, असाहि एक विनोबाजींचा विचार आहे. समाजाला व्यक्तीने आपली बँक मानल्यावर तदनुकूल समाजांत खेळणारा त्याचा पैसा अधिक सुरक्षित राहील. सामाजिक अर्थोत्पादन वाढेल. अधिक चांगल्या प्रकारें त्याचें वितरण होईल. एकूण संपत्ति वाढेल. यथाशक्ति प्रत्येकाने श्रम केले पाहिजेत आणि आवश्यकते अनुसार त्याने आपल्या गरजांचें समाधान करावें. समाजाने तितकें त्याला द्यावें. नैसर्गिक गुणनिष्ठ विषमता राहणारच. व्यक्तीचा त्यांत दोष नसतो. जो यथाशक्ति श्रम करतो तो सामूहिक वाटपांत समान भागीदार आहे. From each according to his ability to each according to his needs. यासाठी जी वितरण व्यवस्था असेल ती श्रेष्ठांच्या हातीं हवी. कनिष्ठांचें संरक्षण करण्यांत श्रेष्ठांचें श्रेष्ठत्व असतें. याशिवाय कनिष्ठांचीहि एक स्वतंत्र शक्ति असतेच ! आणि ते जितके स्वावलंबी बनत जातील तितकी त्यांची शक्ति वाढत जाईल. या विचारांतून निघणारा दुसरा विचार स्वयंपूर्ण खेड्यांशीं संबंधित आहे. प्राथमिक गरजांचें समाधान खेड्यांतच झालें पाहिजे. जास्तींत जास्त दुय्यम गरजाहि खेड्यांत भागल्या जाव्यात. अवशिष्ट गरजा भागविण्याची जबाबदारी शासनसंस्थेने उचलावी. अशी समाजव्यवस्था सर्व दृष्टीनें आदर्श असेल अशी विनोबाजींची श्रद्धा आहे. असा समाज प्रत्यक्षांत आणला तर सुखशांतीची हमी आहे, यांत शंका नाही

हा ध्येयावा ध्रुवतारा जनतेने गाठला तर समाजांत सुखशांति अक्षय, अढळ राहील, हें खरें आहे. पण त्यासाठी तयारी करतांना पुष्कळ त्यागाची, सहिष्णुतेची, स्थिरबुद्धीची (पेशन्स) आवश्यकता आहे. मनुष्याचा स्वभाव सहज बदलतां येत नाही. मानवजातीचा हृदयपालट घडवून आणणें त्याहून विकट काम आहे. पण शेवट सुखांत आहे, हेंहि निश्चित आहे. मग हें आव्हान मनुष्याने झेलावयाचें नाही तर कोणी ? खूप मागे जावें लागेल. गरजा कमी कराव्या लागतील. पुष्कळ तडजोड, समन्वय करावा लागेल. जीवनविषयक दृष्टिकोण बदलावा लागेल. पण हें केलें नाही तर विनाश अटळ आहे. तो जवळहि आहे ! फिरावयाचें असेल मागे तर तेंहि आताच ! जग ज्या वेगाने विनाशाकडे धावत आहे त्याला बांध घालण्याची क्षमता मानवांत आज आहे काय ? जो काळ अभिप्रेत आहे त्याच्या आंत ही येण्याची शक्यता आहे काय ? ही क्षमता मानवाने स्वतःत आणण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणें केला नाही तरी विनाश अटळच आहे. तरमग प्रामाणिक प्रयत्न करणेंच मानवाला भूषणावह आहे. विनोबाजींचा एक विचार दुसऱ्या त्यांच्या विचारांत साखळीतल्या कडीप्रमाणे निबद्ध आहे. एक विचार मान्य करावयाचा तर नंतरच्या विचारांना ओघानेच मान्यता द्यावी लागते. नाही तर पहिल्या विचाराचे परिणाम दिसून येणार नाहीत. या प्रक्रियेंत तडजोडीला, समन्वयाला वाव नाही. घ्यावयाचें तर सगळें घ्यावें लागेल. सगळें सोडून द्यावयाचें तर आजची अगतिकता आपलें कार्य बजावल्याशिवाय राहणार नाही. भारतीय नियोजन मंडळाशीं चर्चा करतांना विनोबाजींनी स्पष्ट सांगितलें होतें की, "आमच्या विचारांत व नियोजन मंडळाच्या योजनेंत असा मामूली मतभेद नाही की, जरा दहा पांच आकडे इकडे तिकडे केले की भागून जाईल. आमच्या विचारांना मान्यता द्यावयाची तर त्यांना सारी योजनाच बदलणें भाग पडेल" (संत विनोबाकी यात्रा–श्री. मुदंडा.)

विनोबाजींसारख्या मानवश्रेष्ठांच्या मागून जाण्याचा मानवजातीने निर्धार करण्याची वेळ आली आहे. श्रद्धा असेल तर शक्ति वाढते. चांगलें ध्येय गाठतांना आपली शक्ति तोकडी पडल्याने आपण पोचूं शकलों नाही तरी तें अपयशहि भूषणभूत ठरेल. कल्याणकारी ठरेल. पण बुद्धया क्षुद्र ध्येय स्वीकारल्याने विनाश निश्चित होतो आणि बुद्धि दिल्याने श्रेष्ठ ठरलेल्या मानवप्राण्याचा अवःपात हा अधिक केविलवाणा वाटणार नाही काय ?

अनुक्रमणिका

विनोबाजींचा भारतीय संस्कृतीचा पायाशुद्ध प्रचार

जिवाजी व्यंकटेश याळगी, बेळगांव

पूज्य श्री विनोबाजींनी व्यक्तीच्या सामाजिक जीवन शुद्धीसंबंधांचे आपले विचार अनेक वर्षांच्या चिंतनमननानंतर आणि प्रत्यक्ष कृति-कार्यांच्या 'सोटिया-मधून गाळून विशुद्ध करून समाजापुढे वेळोवेळीं मांडले आहेत. त्यांच्या परिशीलनाने विनोबाजींची जी विचार-प्रणाली मी समजूं शकलों आहे तीच येथे पुढे मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

मानवी मनाच्या विकसनाला खंडित करणारीं जीं कांही अनेक बंधनें आहेत त्यांपैकी 'सोनेरी शृंखला' हें एक प्रमुख आणि जबरदस्त बंधन आहे. या 'बंधना-पलीकडे' गेल्याशिवाय—या जबरदस्त पाशांतून सुटका करून घेतल्याशिवाय मनाच्या पूर्ण विकासासाठी लागणारी शांति आणि समाधान लाभणें कठीण आहे. यासाठीच विनोबांनी कांचन-मुक्तीचा सन्देश दिला आहे. पण ही कांचनमुक्ति अंगमेहनतीनें भूसेवा आणि गोसेवा केल्यावाचून साध्य होणें दुर्लभ आहे हें पूर्ण आणि सूक्ष्म विचारांनी कळून येईल. अध्यात्म हा भारतीय तत्वज्ञानाचा आत्मा असल्यामुळे मानवी जीवनाचें ध्येय व तें गाठण्याचे मार्ग आपल्या ऋषि मुनींना स्वानुभवाच्या कसोटीवर घासून उपनिषदां-मधून त्यांचें दिग्दर्शन केलेलें आहे.

जन्मापासून तों मृत्यूपर्यंत प्राणधारणेंसाठी अन्न, वस्त्र आणि निवास यांची आवश्यकता प्रत्येक व्यक्तीला आहेच. ज्या परमेश्वरानें जन्मास घातलें तो त्याच्या भाकरीची व्यवस्था करतोच. परंतु त्याच परमेश्वरानें दिलेल्या आपल्या हातापायांचा निरसलपणें जेथे सदुप-योग होतो त्या भू व गोसेवेची जोड तिला अवश्य हवी ! म्हणजेच व्यक्तीला समाजजीवनाशीं समरस होता येईल. परंतु त्यासाठी आपल्या गरजा मात्र किमान पातळीवर ठेवल्या पाहिजेत.

या नव्या युगांत व्यक्तीच्या राहणीचें मान उंचा वण्याकडे मानवाची प्रवृत्ति दिसून येते. परंतु तें कोठ-पर्यंत नेवून पोचवायचें याला अंतच राहणार नाही. समाजस्वास्थ्यासाठी शुद्ध हवा-पाणी, सकस धान्य आणि थंडी-वाऱ्यापासून निवारण या गोष्टींची गरज आहे. या सर्व मूलभूत गोष्टी सामान्य जनतेला मिळा-ल्याच पाहिजेत. सर्वांना सिमेंटचीं घरें, पंचपक्वान्नाचें जेवण व करमणुकीसाठी सिनेमा, हें राहणीच्या दर्जाचें परिमाण ठरवितां येणार नाही; व तसें ठरविणें धोक्या-चेंहि आहे. एकदा मनुष्य गरजा वाढवूं लागला की त्या वाढूंच लागतात व त्या भागविण्यासाठी धनाचा लोभहि वाढत जातो. आणि तें मिळविण्यासाठी त्याची भल्या-बुऱ्या मार्गाने धडपड चालूं असते. गरजा वाढतच अस-तात आणि त्यापाठीमागून त्या भागविण्याची मानवाची अविश्रांत धडपड धावत असते. ही शर्यंत अविरत चालूंच राहते आणि त्या शर्यतीचा चालक मात्र निराश, अशांत व असमाधानी वृत्तींतच मरण पावतो. 'अशांतस्य कुतः सुखम् ?'

व्यवहारांत परस्परांतील विनिमयाचें साधन नाणें अगर नोटांच्या रूपांत असलें तरी त्याची शक्ति सरकारी गंगाजळींतील सुवर्णावरच अवलंबून असते पूर्वी खेड्यापाड्यांतून नाण्यांचा वापर क्वचितच होत असे. आपल्या दैनंदिन गरजेंच्या वस्तू त्या त्या खेड्यांत उत्पन्न होणाऱ्या धान्याच्या बदलांत मिळत असत. कुंभार, कोष्टी, न्हावी, परीट, तेली, सुतार, लोहार, माळी, चांभार वगैरेंना गावकऱ्यांकडून ठराविक प्रमा-णांत धान्याच्या स्वरूपांत त्यांच्या कामगिरीबद्दल वार्षिक मोबदला मिळत असे. खेडीं स्वावलंबी होतीं. अलीकडे कारखानदारीच्या युगामुळे खेड्यांतील उद्योग-धंदे बसले व शहरांत तयार होणाऱ्या मालाचा खप

खेड्यांमधून सुद्धा वाढूं लागला. अनावश्यक परदेशी वस्तूंचाहि प्रसार झपाट्याने होऊं लागला. एकेकाळचीं स्वयंपूर्ण खेडीं आपल्या नित्याच्या गरजा भागविण्यासाठी शहरांकडे पाहूं लागलीं.

महात्माजींनी ही परिस्थिति पाहिली आणि सामाजिक आणि विधायक कार्यकर्त्यांना खेड्यांत जावून राहण्याचा आदेश दिला. खादी व ग्रामोद्योगाला चालना देऊन भारताच्या समाजजीवनाचा आधार–जीं लक्षावधी खेडीं–तीं स्वयंपूर्ण बनविण्यासाठी समग्र–ग्राम–सेवा मंडळासारख्या संस्था स्थापिल्या.

पूर्वी खेड्यांमधून सर्रास परस्परांमध्ये देवाण–घेवाण होत असे. ती मक्तेदारी आता देशाचें सरकार करीत आहे. आपल्या शेतांत उत्पन्न झालेला कच्चा माल शहराच्या बाजारपेठेंत विकून त्याचे पैसे घ्यावयाचे व पुन: पैसे देवून आपल्या गरजेचा माल–कापड, तेल वगैरे खरेदी करावयाचा. या व्यवहारामुळे पैशाचें निष्कारण महत्त्व वाढलें आहे; व मध्यस्थ दलालांची संख्या वाढल्यामुळे महागाईहि जाणवते. कारखानदारीमुळें खेड्यांत उद्योग करून उदरनिर्वाह करणारीं कारागिरांचीं कुटुंबें बेकार बनलीं आहेत. आज सरकारपुढे ही एक मोठी समस्याच आहे. याला एकच उपाय आहे. 'सरकार' या संस्थेमध्ये सर्वच गोष्टी केंद्रीभूत झालेल्या आहेत. त्यांचें विकेंद्रीकरण झालें पाहिजे. कारखानदारीचें, सत्तेचें, भांडवलाचें निरनिराळ्या उत्पादन–साधनांचें विकेंद्रीकरण झालें पाहिजे. सध्या मोठ्यामोठ्या शहरांकडे व मुंबई–दिल्लीकडे एकसारखें लक्ष असतें तें सोडून बहुजनसमाजाचें वसतिस्थान जीं खेडीं त्यांचेकडे लक्ष पुरविलें पाहिजे.

आजकाल समाजविकास योजनांच्या अंमलबजावणीमुळे खेड्यांकडे लक्ष पुरविलें जातें. दिल्ली–मुंबईच्या 'सोनेरी चमच्याने दूध' खेड्यांतील समाजजीवन सुधारणार नाही. त्यांना त्यांच्याच बळावर स्वावलंबी बनतां आलें पाहिजे. श्रीगोपालकृष्णाच्या भारतांतील मुलांच्या आरोग्यरक्षणासाठी अमेरिका-डेन्मार्कमधून सुकविलेल्या दुधाचे डबे मागवावे लागत आहेत ही गोष्ट आम्हांस मुळीच भूषणावह नाही !

महात्माजींची रामराज्याची कल्पना म्हणजे ग्रामराज्येंच होत, ही गोष्ट पूज्य विनोबांनी स्पष्ट केलेली आहे. ग्रामराज्यांत सरकार या संस्थेला मुळीच स्थान नाही. कायदा अगर राजदंडाच्या भीतीने जीवन सुखी व समृद्ध होऊंच शकत नाही.

विमानासारख्या शीघ्रगति वाहनांच्या युगामध्यें विनोबांनी पायीं प्रवास करण्याचें ठरविलें. याचा अर्थ विनोबांना वेळेची किंमत नाही असें समजावयाचें कां ? बिहारमधील पूरग्रस्त भागांतील दौऱ्याचे वेळीं त्यांनी नावेंत बसण्याचेंहि नाकारलें. छातीइतक्या पाण्यांतून चालत गेले. विनोबांच्या पायीं प्रवासाच्या निर्णयानें थोर थोर माणसेंहि चकित झालीं. त्यांच्या मतें विनोबांनी आपले विचार भारतामध्ये पसरविण्याचें कार्य विमानांतून नाही तरी रेल्वे आणि मोटारीच्या सहाय्याने करावयास पाहिजे होतें. परंतु गेल्या तीन वर्षांचा अनुभव सांगतो की विनोबांनी आपल्या पाययात्रेने जें साधलें तें शीघ्रगति वाहनांतून प्रवास केल्याने मुळीच साधलें नसतें. विनोबा आपल्या यात्रेंत त्या ठिकाणच्या सामाजिक जीवनाशीं तादात्म्य पावतात; त्यांच्या सुखदु:खांत समरस होतात. त्यामुळेच त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्या दूर करण्याचा मार्ग विनोबांना सुचतो. विनोबांच्या हातीं सत्ता नाही की पैसा नाही. त्यांच्या अंतकरणांतील तळमळीचा प्रभाव इतका आहे की त्यांचे शब्द ऐकणारांच्या अंत:करणाचा ठाव घेतात. सर्व उपनिषदांचें सार श्री गीताई विनोबांची मार्गदर्शिका. गीतेंत वर्णन केल्याप्रमाणें सात्त्विक पद्धतीचें दान करण्याविषयी जे जे लहान थोर भेटतील त्यांना ते सल्ला देत आहेत.

विनोबा भारतीय संस्कृतीचा पाया–शुद्ध प्रचार करीत आहेत. त्यांचा जीवनप्रवाह म्हणजे मूर्तिमंत भारतीय संस्कृतीचा ओघ आहे. त्यांच्या जीवनाच्या निर्मल प्रवाहामध्यें आम्हा भारतीयांना "सर्वेत्र सुखिन: संतु, सर्वे संतु निरामया: । सर्वे भद्राणि पश्यन्तु, मा कश्चित् दु:खमाप्नुयात् ॥" हें ध्येय गाठण्याची तळमळ दिसून येते.

अनुक्रमणिका

भूदानयज्ञ–अभिनंदन

कृ. ना. देशपांडे

पू. विनोबांचें अभिनंदन करावयाचें म्हणजें त्यांच्या कार्याचें अभिनंदन करावयाचें ! म्हणजे त्यांच्या कार्याचें महत्त्व लक्षांत घ्यावयाचें ! कारण एकदा का त्या कार्याची महति लक्षांत आली की मग कोणताहि मनुष्य त्यांत अहमहमिकेनें उडी घेणारच. विनोबांनी आपल्या जयंतीला भूमिजयंति हें नांव दिलें आहे. विनोबाजी हे निस्संशय थोर संत आहेत. ज्ञानोबा, तुकोबा त्या क्रांतिकारी संतांच्या मालिकेंतीलच विनोबा हे एक थोर संत आहेत. संत साहित्याचें गाढ अध्ययन विनोबांनी केलें आहे. नुसतें अध्ययनच केलें आहे असें नाही तर संतसाहित्य त्यांनी जिरविलें आहे, आत्मसात केलें आहे. म्हणून त्यांचा आत्मा सतेज झाला आहे व बुद्धि प्रगल्भ बनली आहे. विनोबांच्या विचारांना तपश्चर्येची धार आहे. आधी केलें मग सांगितलें हा त्यांचा बाणा आहे. अशा ह्या थोर संताची दिव्य प्रतिभा भूदानयज्ञांत प्रखरतेनें विलसत आहे. विनोबांची तपश्चर्या, त्यांची दलित जनतेबद्दलची असीम प्रेम-निष्ठा, त्यांच्या बुद्धीची प्रखर झेप, त्यांची योगावस्था व प्रयोगावस्था हें सारेंच कांही निस्संशय प्रशंसनीय आहे. त्या सर्वांबद्दल लिहावयाचें ठरविलें तर एक स्वतंत्र पुस्तकच होईल एवढी सामुग्री तयार आहे. परंतु त्या सर्वांहून महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी सुरू केलेलें भूदानयज्ञ आंदोलन ! म्हणून आपण भूदानयज्ञ आंदोलनाचीच महति नीट लक्षांत घेऊं या.

हें आंदोलन म्हणजे कांही एकाएकीं निर्माण झालेला दिव्य चमत्कार नाही. विनोबांच्या मनाच्या आणि भोवतालच्या परिस्थितीच्या निरनिराळ्या प्रक्रि-येंतून हें आंदोलन एक प्रकारें सहजच निर्माण झालें आहे. म्हणून विनोबा आपल्या भाषेंत सांगत असतात की हें माझें कार्य नसून ईश्वराचें कार्य आहे. मी निमि-त्तमात्र आहे.

हिंदुस्थानला स्वराज्य मिळाल्यानंतर विनोबांनी उत्तरेकडे व तिच्या आसपास शरणार्थी लोकांचा प्रश्न हातीं घेऊन कांही दिवस दौरा केला होता. शरणार्थी लोकांची सेवा तर ते आपल्यापरीनें करीतच असत; पण ती सेवा करीत असतांना त्यांचें चिंतन सुरू असे. 'आपण ही सेवा करतों आहोंत हें तर ठीकच आहे, पण आता यापुढें स्वराज्य मजबूत करण्यासाठी मूलभूत सेवेची गरज आहे.' असें चिंतन करीत करीत ते परं-धामला आले व नंतर त्यांनी वाहनपरित्यागाचा आपला निश्चय जाहीर केला. नंतर त्यांनी कांचन-मुक्तीच्या प्रयोगाला प्रारंभ केला. भारतांत आता यापुढें पैशाची प्रतिष्ठा नष्ट होऊन श्रमाची प्रतिष्ठा उत्पन्न झाली पाहिजे या उद्देशानें विनोबांनी आपला कांचनमुक्तीचा प्रयोग सुरू केला. त्याचवेळेस त्यांनी पवनारला स्वावलंबनाच्या तत्त्वावर शेती करण्यास सुरवात केली. हिंदुस्थानांत माणसीं एक एकर जमीन वहीतीखाली आहे; व त्या एक एकरांत एक मनुष्य स्वतःच्या बळावर उत्तम तऱ्हेनें जगूं शकतो हें जर सिद्ध झालें तर भारतांतील दारिद्र्य दूर होऊं शकतें, या भावनेनें त्यांनी आश्रमाची ९ एकर जमीन स्वतःच्या मेहनतीनें वाहण्याचें ठरविलें. त्यांत त्यांचे ११ अनुयायी काम करूं लागले. विनोबा देखील शेतांत ८-८ तास परिश्रम करीत असत. त्या प्रयोगांत त्यांना फार चांगला अनुभव आला. चांगली मेहनत जर झाली तर माणसीं एक एकर जमीन त्याच्या उदरनिर्वाहास पुरेशी होऊं शकते हें त्यांनी आपल्या प्रयोगांतून सिद्ध केलें !

मनुष्य एक एकरांतहि स्वावलंबनानें सुखानें जगूं शकेल हें तर विनोबांनी सिद्ध केलें; पण ज्यांच्याजवळ मुळीच शेती नाही अशा लोकांनी शेतींतून स्वावलंबनानें पीक कसें काढावयाचें हा प्रश्न आपोआपच निर्माण झाला. कारण ज्यांच्याजवळ मुळीच शेती नाही पण

अनुक्रमणिका

शेतींत काम करण्याची तयारी व माहिती ज्या लोकांत आहे असे करोडो लोक हिंदुस्थानांत आहेत. त्यांना स्वतःच्या मालकीची शेती असल्याशिवाय ते स्वावलंबी कसे होऊं शकतील? ता. १२-२-५१ ला गांधी मेळाव्याच्या दिवशीं मी पवनारला होतों. तिथे मी विनोबांना जे कांही प्रश्न विचारले होते त्यांत हाहि एक प्रश्न विचारला होता की तुम्ही स्वावलंबनाने शेती करीत आहांत हें चांगलें आहे, पण ज्याच्या जवळ मुळीच जमीन नाही अशा लोकांना जर स्वावलंबी शेती करावयाची इच्छा असेल तर त्यांना जमीन कशी मिळावी? . त्यावेळीं विनोबांनी उत्तर दिलें कीं त्यांना जमिनी मी मिळवून देईन.

मग मी विचार करूं लागलों की, विनोबाजी लोकांना जमिनी मिळवून कशा देणार? यासाठी गांधीवादाप्रमाणे स्वतःपासून सुरवात करणें हाच एक मार्ग संभवतो. जमिनीचा प्रश्न सुटला पाहिजे असें जर आपल्याला वाटत असेल तर आपण स्वतःपासून त्याग करण्याला आरंभ केला पाहिजे; असा विचार करून मी त्या वर्षी माझ्या मालकीच्या जमिनीपैंकी कांही जमीन माझ्या वहितदारांना मक्ता वगैरे न ठरवितां त्यांनीच त्या जमिनीच्या उत्पन्नाचा पूर्ण हिस्सा घ्यावा असें सांगून वहावयास दिली.

पुढे विनोबाजी त्याच वर्षी शिवराम पल्लीच्या सर्वोदय संमेलनासाठी पवनारहून पैदल यात्रा करीत निघाले. संमेलन आटोपल्यावर त्यांनी आपला निश्चय जाहीर केला की मला तेलंगणांत यात्रा करावयाची आहे. पुढे तेलंगणांत यात्रा करीत असतांना ता. १८-४-५१ रोजीं पोचमपल्ली या गावांत एका हरिजनाने त्यांना त्यांच्या सभेंत उभें राहून स्वतः कसण्यासाठी जमीन मागितली. विनोबांनी विचारलें, 'तुला किती एकर जमिनीची आवश्यकता आहे?' त्यानें उत्तर दिलें, '८० एकर जमीन जर आम्हाला मिळाली तर आमच्या सर्व हरिजन लोकांना ती पुरूं शकते?' विनोबांनी पहिल्याप्रथम त्याला म्हटलें की तूं यासाठी तुझ्या सहीचा अर्ज माझ्याकडे लिहून दे. मी तुला सरकारकडून जमीन मिळवून देतों. पण पुन्हा विनोबांनी विचार केला, असे शेकडों, हजारो, करोडो अर्ज सरकारकडे येत गेल्यास सरकार तरी कोणाकोणाला जमीन देऊं शकणार आहे! म्हणून मग त्यांनी सभेंत बसलेल्या लोकांनाच विचारलें की या ठिकाणीं कोणी या गृहस्थाला जमीन देऊं शकतो काय? त्याबरोबर रामचंद्रराव रेड्डी नांवाचा एक सद्गृहस्थ उठून उभा राहिला व त्याने १०० एकर जमीन देण्याचें आश्वासन दिलें. हीच भूदान यज्ञाची गंगोत्री होय.

विनोबांचा तत्त्वप्रचार भूदानयज्ञाच्या सुरवातीपासूनच अगदी शुद्ध, स्पष्ट व क्रांतिकारक राहिला आहे. त्यांचा भूदानयज्ञ सुरवातीपासूनच याचनात्मक स्वरूपाचा नव्हता. भूदानयज्ञ आरंभापासूनच नवधर्माची दीक्षा देणारा राहिला; कारण विनोबांचें क्रांतिकारी तत्वज्ञान पूर्वीपासूनच अगदी स्पष्ट होतें. भूदानयज्ञ सुरू होण्याच्या अगोदरच शिवरामपल्ली येथील सर्वोदय संमेलनांत ते म्हणाले होते की खुली हवा व पाणी यांच्याप्रमाणेच जमिनीचा हक्कदार देखील प्रत्येकजण आहे. जो जमीन मागेल त्याला ती मिळाली पाहिजे.

भूदानयज्ञ आंदोलन हें सुरवातीला केवळ दयाभावाचें (humanatarian) आंदोलन होतें व पुढे पुढे विनोबांनी त्यांत क्रांतिकारक विचार ओतले असें समजणें पूर्णपणें चुकीचें आहे. भूदानयज्ञाचे विचार सुरवातीपासूनच अगदी क्रांतिकारक राहिले आहेत. शिवरामपल्ली येथील सर्वोदय संमेलनांत देखील विनोबांनी दया व समता यांवर फार मननीय भाषण केलें होतें. त्या भाषणांत एके ठिकाणीं ते म्हणतात—

"हम अक्सर क्या करते हैं कि पुराने कवि, धर्म या पुरुष दया का गान करते हैं तो हम कहते है कि उस गुणका हमको आकर्षण नहीं है। हमें समता का आकर्षण होता है। दया हम करना नहीं चाहते। उसमें कुछ अहंकारभी आता है। दया का निषेध करके अगर हम समता की स्थापना करना चाहते है तो हम एक बडी भारी ताकद को खोते हैं और एक नाहकका विरोध हमारे सामने खडा करते है। हमें समझना चाहिये कि समता का विरोध विषमतासे हो सकता है, दयासे नहीं। तो सोचनेका ऐसा ढंग हमें

सूझना चाहिये जिससे कि दया का विकास करने-वालोंका सारा पुण्यबल, उनकी सारी तपस्या समताके विकासके उद्योगमें हमें मिल जाय। सोचनेका वह ढंग यह होगा कि हम यों कहें कि दया का विकास करते करते आखिर अनुभवसे हम इस नतीजेपर आये है कि समता निर्माण करना यही सच्ची दया है। अगर विषमता रखते हुये हमें कुछ न कुछ दया जरुरी होती है, वह अच्छा गुणभी है, उसे आत्मा का कुछ समाधान होताहि है। फिरभी पूरा समाधान नहीं होता और सच्ची दया उतनेसे नहीं होती है। सच्ची दया तब होती है जब हम समता स्थापित करते है। इसीलिये दया का विकास करनेके कारणहि और उस अनुभवसेहि हमें यह सूझा है कि अब हमें समता प्रस्थापित करनी चाहिये। इस तरह अगर सोचोगे तो पूर्वजोंकी सारी तपस्या हमको मिल जायगी, और उस आधारपर हम एक नयी तपस्या खडी कर सकेंगे। तो यह भूल हमें नहीं करनी चाहिये कि हम पुरानी दयाविकासकी परंपरा का खंडन करे और हमारा एक नया विचार स्थापित करना चाहें"

विनोबांच्या ह्या विचारांचें प्रतिबिंबच भूदान-यज्ञप्रक्रियेंत पडलें आहे. भूदानयज्ञ म्हणजे दयेचा विकास करणाऱ्या लोकांची तपस्या व आशीर्वाद हस्तगत करून समतेच्या मार्गावरची एक नवीन तपश्चर्या होय !

आम्ही दयेचा निषेध करीत नाही, पण आता अशी लहानसान दया उपयोगी पडणार नाही. आताची दया म्हणजे समता उत्पन्न करणें ! तुकारामानें एका ठिकाणीं दयेबद्दल उद्‌गार काढले आहेत—

ज्यासि आपंगिता नाही। त्यासि धरी जो हृदयीं ॥
दया करणें जे पुत्रासी। तेचि दासा आणि दासी ॥
तुका म्हणे सांगों किती। तोचि भगवंताची मूर्ति ॥

तुकारामाच्या ह्या अभंगांतील दया आज आमच्या युगाला पाहिजे आहे. आपण पुत्रावर ज्या प्रकारची दया करतों, म्हणजे बापाची संपत्ति मुलाला वारसा हक्कानेच मिळते. मुलाला आपली संपत्ति देण्यांत आपण फार उपकार केला अशी भावना बापाची नसते; त्याचप्रमाणे दास, दासी वगैरे निराश्रित लोकांचा आपल्या संपत्तीवरचा हक्क आपण मान्य केला पाहिजे. या अभंगांत तुकाराम महाराजांनी असा दयाभाव राखणाऱ्याला भगवंताची मूर्ति म्हणून गौरविलें आहे. आजच्या समतेच्या युगांत मात्र असा दयाभाव राखणाऱ्यालाहि भगवंताची मूर्ति म्हणून कुणी गौरविणार नाही. विनोबाहि त्याला भगवंताची मूर्ति समजत नाहीत; तर त्याने आपल्या पापाचें फक्त विसर्जन केलें असें विनोबा म्हणत असतात म्हणजे आजच्या समतेच्या युगांत अशा प्रकारचा दयाभाव ही विशेष उल्लेखनीय गोष्ट राहिली नाही; सामान्य गोष्ट झाली आहे.

तेलंगण यात्रेचा उपसंहार करतांना मंचेरियलला विनोबांनी जें भाषण केलें त्यांतहि भूदानयज्ञाच्या क्रांतिकारकत्वावर प्रकाश पडलेला दिसून येईल. त्यांत ते म्हणतात, 'गरिबोंको जमीन तो मिलेगी, लेकिन उतनेसे मेरा काम नहीं होता है। मेरा काम तो तब होगा, जब हम समझे कि जैसे हवा और पानीपर हरेकका हक है वैसे जमीनपर हरेकका हक है और जबकि कई लोगोंके पास बिलकुल जमीनें नहीं है, उस हालतमें बहुत जादा जमीन अपने पास रखना गलत बात है। उस गलतीसे मुक्त होनेके लियेहि हम जमीन देते है, इस ख्यालसे देना चाहिये।'

भारतीय संस्कृतींतून (भारतीय संस्कृति म्हणजें दयाभावाचा विकास करीत जाणें) आणि विनोबांच्या प्रयोगावस्थेंतून भूदानयज्ञाचा जन्म नैसर्गिक रीतीनेंच कसा झाला यासंबंधी मी आतापर्यंत लिहिलें आहे. आता आपण भूदानयज्ञ आंदोलनापासून कोणकोणते फायदे झाले आहेत या महत्त्वाच्या गोष्टीकडे वळूं या.

(१) स्वराज्य मिळाल्यावर हिंदुस्थानांत दारिद्र्य दूर करण्याकडे लोकांचें लक्ष विशेष रीतीनें लागावयास पाहिजे होतें. पण लोकांना ह्या प्रश्नाचा उकल कसा करावा हें नीट समजेना. त्यांना वाटे की लोकशाहींत हें काम लोकनियुक्त सरकारनेंच करावयास पाहिजे. आमचें सध्याचें कर्तव्य मत देत राहणें व सरकारवर टीका करीत राहणें हेंच आहे. सरकार म्हणे की

लोकांच्या विचारांत जोंपर्यंत परिवर्तन होत नाही, तोंपर्यंत आम्ही कांहीहि नवीन बदल करूं शकत नाही. कोणतेंहि सरकार रूढ समाजरचनेच्या पुढे जाऊं शकत नाही. अशा रीतीने लोकांनी केवळ बेजबाबदार-पणे टीका करीत रहायचें व सरकारने लोकमत अनुकूल नाही म्हणून आम्ही कांही करूं शकत नाही असें टुणटुणें वाजवीत रहायचें हाच काय तो कार्यक्रम स्वराज्य मिळाल्यानंतर हिंदुस्थानांत सुरू झाला होता. आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी कम्युनिस्ट आपल्या मार्गानें प्रयत्न करीत होतेच, परंतु हिंदुस्थानांतील बहु-जनसमाज त्यांच्यावरहि केवळ टीकाच करण्यांत मग्न होता. 'तुमचा मार्ग भारतीय संस्कृतीला अनुकूल नाही. हिंसामय मार्ग आहे तुमचा ! तुम्ही वर्गद्वेष माजवून राहिला आहांत.' अशा प्रकारची बेजबाबदार टीका कम्यूनिस्टांवर देखील बहुजन समाज करीत होता. वरील दोन्ही प्रकारची बेजबाबदार टीका भूदानयज्ञाने खतम केली. भूदानयज्ञ भारतीय संस्कृतीवर अधिष्ठित असलेला विधायक कार्यक्रम असून शिवाय तो स्थिति-शील न राहतां गतिशील (Progressive) राहिला. ह्या कार्यक्रमामुळे भारतीय संस्कृतीदेखील एक टप्याने विकसित झाली. विनोबाजींनी तेलंगणांतील आपल्या एका भाषणांत सांगितलें होतें की भिन्न भिन्न काळीं भिन्न भिन्न संस्कृतींचा संपर्क जेव्हा हिंदुस्थानच्या संस्कृतीशीं झाला त्यावेळीं आमच्या संस्कृतीने त्या त्या संस्कृतींतील चांगलेपणाचा अंश घेऊन आपला एक-सारखा विकास करून घेतला. म्हणून कम्यूनिझमचा विरोध करावयाचा असेल तरीहि तो त्यांच्यांतील चांगल्या अंशाचा स्वीकार करूनच आपल्याला केला पाहिजे. म्हणून कम्युनिस्टांची समतेबद्दलची तळमळ आपण स्वीकारलीच पाहिजे.

कुणाचाहि विरोध न करितां व कुणावरहि बेजबाबदारपणे टीका न करितां सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी आपल्याजवळ जी कांही शक्ति विद्यमान असेल ती शक्ति आपण जर पहिल्या प्रथम (दुसऱ्यांची वाट न पाहतां) लावली तर तिचा असर भोवतालच्या वातावरणावर पडतो. जमीनवाल्यांनी आपल्या जमिनीचा कांही भाग भूदानयज्ञांत अर्पण करावा, संपत्तिवाल्यांनी संपत्तिदान करावें, बुद्धिवंत लोकांनी क्रांति यशस्वी करण्यासाठी बुद्धिदान द्यावें, ज्यांच्याजवळ श्रमशक्ति आहे अशा लोकांनी श्रमदान करावें व महान त्यागी लोकांनी आपलें जीवनच क्रांती-साठी अर्पण करावें. अशी जर त्यागाची लाट देशामध्यें पसरावयास लागली तर ह्या सक्रिय लोकांच्या त्यागां-तून देशांतील वातावरण परिशुद्ध बनून जाईल, त्या वातावरणाचा असर वरच्या वर्गावर पडेल, सरकारवर पडेल व सर्ववादी लोकांवर देखील पडेल; व देशांत सुस्थिर क्रांति निर्माण होईल. भूदानयज्ञाने ४ वर्षांत अशा प्रकारचें क्रियाशील वातावरण निर्माण केलें आहे.

(२) अशा प्रकारची त्यागभावना जेव्हा समाजा-मधे पसरावयास लागते त्यावेळीं लोकमत चेतन बनत असतें. भूदानयज्ञामुळे लोकमत चेतन बनलें आहे. स्वराज्य मिळाल्यानंतर कांही दिवस एक प्रकारची वैचारिक मंदता जनतेंत निर्माण झाली होती, ती भूदान-यज्ञ आंदोलनाने घालविली आहे. गावांतील एका माणसाने कां भूदानयज्ञांत आपला योग्य हिस्सा अर्पण केला की सबंध गावांत त्याबद्दल वैचारिक लाट निर्माण होते. या माणसाने भूमि कुणाला दिली—समाजाला की विनोबाला, दिलेल्या जमिनीचें वाटप कोण व कसें करणार, वाटप करतांना कोणत्या तरी स्वरूपांत (black marketing) होणार नाही काय ? ही जमीन कोणाला दिल्या जाईल, कोणत्या अटीवर दिल्या जाईल, किती किती दिल्या जाईल, वाटपामुळे जमिनीचे तुकडे तुकडे होणार नाहीत काय ? मग शेती आर्थिक लाभदायी कशी होईल ? यापेक्षा सहकारी तत्वावर शेती कां करूं नये, चांगली जमीन दान दिली की वाईट, अशा-प्रकारें किती लोक दान देतील, त्यापासून सर्व देशाचा प्रश्न कसा काय सुटेल ? यापेक्षा कायद्यानें जमिनीचें वाटप कां करूं नयें, क्रांति म्हणजे काय, अहिंसक क्रांति म्हणजे काय, रक्तमय क्रांति कुठें झाली होती काय ? वगैरे शेकडो प्रश्न एका सुयोग्य भूदानामुळे सामान्य लोकांच्याहि मनांत निर्माण होतात, ते आपसांत त्याबद्दल चर्चा करतात व मग कार्यकर्त्यांना त्यांचीं उत्तरें द्यावयाची संधि मिळते; व अशा तऱ्हेने लोकमत चेतन व सुशिक्षित बनतें.

म्हणून पंडित नेहरूंनी ठीकच म्हटलें आहे की भूदानयज्ञ आंदोलन हें एक नवचेतना निर्माण करणारें आंदोलन आहे. अशा प्रकारची नवचेतना एकदा का लोकांत उत्पन्न झाली की मग त्यांतून भूमिहीनांची संघटनाहि तयार होऊं शकते, सुयोग्य कायदाहि बनूं शकतो व तो स्थिर राहूं शकतो, लोकांचा आत्मविश्वासहि वाढतो व शासनमुक्त समाजरचना निर्माण करण्यासाठी लोकांना तालीमहि पण मिळते, असा 'एक साधे सब साधे' चा हा मार्ग आहे. म्हणून भूदानयज्ञाने जर कोणतें मुख्य काम केलें असेल तर तें म्हणजे सामान्य लोकांचीहि विचारशक्ति भूमीच्या समस्येवर जागृत केली. खरा पुढारी कोण, खरा त्यागी कोण आहे, ढोंगी देशभक्त कोण आहेत हें ठरविण्याचें गमक लोकांच्या हातीं आलें व त्यांना एकप्रकारचें विशुद्ध सामाजिक शिक्षण मिळत चाललें.

(३) देशांतील कार्यकर्त्या लोकांनाहि भरीव कार्य करण्याचें क्षेत्र त्या आंदोलनाने दिलें आहे. तेलंगणाचा दौरा संपवून विनोबा जेव्हा सेवाग्रामला वापस आले त्यावेळीं तेथील भाषणांत त्यांनी असे उद्‌गार काढले होते की, 'आता यापुढे कम्यूनिझम आणि सर्वोदय या दोनच वादांचा मुकाबला होणार आहे; कारण ह्या दोन वादांत साम्यहि तितकेंच आहे व विरोध देखील तेवढाच; आणि आजच्या जमान्याची आवश्यकता देखील हीच आहे. बाकीचे वाद आता फार काळ टिकूं शकणार नाहीत. जर सर्वोदयी लोकांनी कसून काम केलें नाही तर कम्यूनिझमची कार्यप्रणाली आल्याशिवाय राहणार नाही.' सर्वोदयवादावर विश्वास असणाऱ्या लोकांना भूदानयज्ञ हें जबरदस्त कार्यक्षेत्र मिळालें आहे. म्हणून त्यांत जिवापाड प्रामाणिकपणें काम करावयास पाहिजे व अहिंसक क्रांति सफल करण्यासाठी हरतऱ्हेचा प्रयत्न केला पाहिजे. अन्यथा कम्यूनिझमच्या मुकाबल्यांत सर्वोदयवादी लोक टिकूं शकणार नाहीत.

(४) भूदानयज्ञ आंदोलनाने देशांतील तरुण लोकांना देशकार्य करण्यासाठी आव्हान केलें व त्यांना पुढे आणलें. विनोबांनी तर अगोदरच घोषित केलें होतें की नवीन क्रांति ही नवीन लोकांसाठी येत असते. आज हजारो तरुण विनोबांच्या आंदोलनामध्ये धडाडीने कामें करून राहिले आहेत.

(५) भूमिदानयज्ञ आंदोलनानें एक फारच महत्त्वाची गोष्ट केली आहे. ती म्हणजे सर्व पक्षांच्या व सर्व पंथांच्या व सज्जन लोकांना एका सर्वसाधारण समस्येवर एकत्रित होऊन काम करावयास शिकविलें! आज देशांतील सर्व पक्षांना आणि सर्व पंथांना भूदानयज्ञाचा विचार पसंत आहे. भिन्न भिन्न पक्षांतील सज्जन लोक आज एकत्र येऊन भूदानयज्ञांत काम देखील करीत आहेत. पक्षबाजी माणसामाणसांत फूट पाडते. एखाद्या पक्षांतील सज्जन माणसालाहि दुसऱ्या पक्षांतील लोक दुर्जन समजतात. दोन्ही पक्षांत सज्जन लोकहि असतात व दुर्जन लोकहि पण असतात. जर एका पक्षाविरुद्ध दुसऱ्या पक्षाचा संघर्ष झाला तर एका पक्षांतील सज्जन लोक दुसऱ्या पक्षांतील सज्जन लोकांच्या विरुद्ध लढणारच! पण अशा प्रकारच्या सज्जन, सज्जनांचा संघर्ष देशविघातक ठरत असतो. सज्जनासज्जनांत लढाई होऊं नये. तर सर्व सज्जन एकीकडे व सर्व दुर्जन एकीकडे अशी परिस्थिति निर्माण व्हावी; कारण त्यामुळे देशांतील दुर्जन कमजोर बनून जातात. दुर्जन लोक सज्जनतेचा बुरखा घेऊनच जगांत थैमान घालीत असतात. जेव्हा त्यांचा असा बुरखा काढून घेण्यांत येतो, त्यावेळीं ते उघडे पडतात, त्यांची दुर्जनता स्पष्ट होते व त्यामुळे ते शरमून जातात व चांगल्या मार्गाला वळतात. यदाकदाचित त्यांचें अशा प्रकारचें हृदयपरिवर्तन झालें नाही तरी देखील हरकत नाही; कारण मग सज्जनांच्या ताकदवान संघटनेशीं त्यांना संघर्ष करावा लागतो व त्या संघर्षांत दुर्जन लोक खतम होतात. सज्जनांच्या संघटनेंत सहजता व चिरंतनता असते. ह्या उलट दुर्जनांची संघटना एकतर होतच नाही अथवा झाल्यास ती नेहमी टिकून राहूं शकत नाही. म्हणून सज्जन लोकांच्या संघटनेपुढें दुर्जनांचा टिकाव लागूं शकत नाही. अशा प्रकारें निरनिराळ्या पक्षांतील सर्व सज्जन लोकांना एका सामान्य कार्यक्रमावर एकत्रित (संघटित) करण्याची शक्ति आज फक्त भूदानयज्ञ ह्या एकाच आंदोलनांत वास करीत आहे.

(पुढील मजकूर पान ४७ वर)

ॐ विनोबा

पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

'ॐ विनोबा' हें काय प्रकरण आहे ? असा प्रश्न तात्काळ वाचकांच्या मनांत उभा राहील. साहजिक आहे तें. पण 'ॐ विनोबा' हेंहि तितकेंच साहजिक आहे, असें मला सांगावयाचें आहे.

विनोबा म्हणजे विनोबा भावे; विनोबा म्हणजे महात्मा गांधींचे आध्यात्मिक वारसदार; विनोबा म्हणजे भूदानक्रांतीचे जनक, इत्यादि अनेक प्रकारांनी विनोबांचें वर्णन केलें जाऊं शकतें. पण त्यांपैकी कोणतेंहि वर्णन 'विनोबा म्हणजे काय ?' या प्रश्नावर यथार्थ प्रकाश पाडूं शकत नाही.

*

'सॅम्सन व डलायला' हा बोलपट पुष्कळांनी पाहिला असेल. कांहींनी ही कथाहि वाचली असेल. या कथेंत व्यक्तिपरिचयाबाबत एक महत्त्वाची खूण अंतर्भूत झाली आहे. कोणतीहि व्यक्ति ही वस्तुतः काय चीज आहे, हें समजून घ्यावयाचें झाल्यास त्या व्यक्तीची शक्ति कशांत केंद्रित होऊन बसली आहे, हें संशोधून काढलें पाहिजे. सॅम्सन हा भीमासारखा प्रचंड पार्थिव बळ असलेला माणूस होता. पार्थिव शक्तीच्या बाबतींत कोणाचीहि डाळ त्याच्यापुढे शिजत नसे. त्याला पराभूत करण्याचे मोठमोठ्यांचे सर्व प्रयत्न असफल झाले होते. शेवटीं त्याच्यावर डलायलाचें मोहिनी अस्त्र सोडण्यांत आलें. तो तिच्या प्रेमांत पडला होता हें त्याच्या विरोधकांना कळून चुकलें होतें. त्यांनी डलायलेवर, त्याच्या शक्तीचें वर्मस्थान कोणतें, हें हुडकून काढण्याची कामगिरी सोपविली. सॅम्सन तिच्या बाहुपाशांत व प्रेमाच्या धुंदींत बेहोष असतांना तिनें अत्यंत लाडिकपणे व बालकाच्या निरागस वृत्तीने विचारलें, "सॅम्सन तुझ्या प्रचंड शक्तीचें वर्म कशांत आहे, हें तूं मला सांगशील तरच मी तुझ्यावर खरें प्रेम करीन." सॅम्सन भाळला व "माझी शक्ति माझ्या केशकलापांत साठलेली आहे" हें वर्म त्याने तिला सांगून टाकलें आणि तिच्या कुशींत अर्भकाच्या निरागस विश्वासानें तो झोपला असतां, तिनें त्याच्या केसांवर कात्री चालविली. सॅम्सन झोपेंतून जागा होतो आणि पाहतो तों त्याच्या डोक्यावरील भव्य व सुंदर केशकलाप नाहीसा झालेला. त्याच वेळीं त्याला पकडायला राजाचे दूत आले होते. डोक्यावर केस असते तर त्याने या दूतांना हां हां म्हणतां लोळविलें असतें. पण त्याची असामान्य शक्ति त्याला सोडून गेली होती. तो आता एक सामान्य शक्तीचा माणूस झाला होता. आणि म्हणून तो पकडला गेला.

*

विनोबा हा एक अत्यंत हाडकुळा, शारीरिक दृष्टचा अत्यंत दुर्बल असा माणूस आहे. या माणसांत

भूदानयज्ञ-अभिनंदन

(पान ४६ वरून)

भूदानयज्ञ आंदोलनाची महति वरीलप्रमाणे अगदी थोडक्यांत दिली आहे. पू. विनोबांचें आम्ही अभिनंदन करावयाचें म्हणजे भूदानयज्ञ आंदोलनाचें महत्त्व लक्षांत घेऊन त्या कार्यांत धडाडीने उतरावयाचें आहे. केवळ शब्दांनी ह्या आंदोलनाचें अभिनंदन होणें कठीण आहे. जर एकसमयावच्छेदेंकरून सर्वांनी हें आंदोलन सफल करण्यासाठी कष्ट घेतले तर हां हां म्हणतां म्हणतां देशाचा कायापालट होऊन जाईल व आंतरराष्ट्रीय परिस्थिति सुधारण्यासाठीहि फार मोठी मदत होणार आहे. प्रेमशक्तीचें सामर्थ्य एकदा कां आपल्या देशांत सिद्ध झालें की मग सर्व जग तिचा फायदा घेणारच आहे. मग आंतरराष्ट्रीय तेढ मिटून जाईल, युद्धें बंद होतील व पृथ्वीवर नंदनवन अवतरेल !

ईश्वर आम्हां सर्वांना भूदानयज्ञांत उडी घेण्यास बळ आणि बुद्धि अर्पण करो !

शारीरिक शक्ति जशी अभावानेच तळपते तशीच मानसिक शक्तीहि बेतबातच असावी, असें अनेकांना, गांधीजी हयात असेपावेतों वाटत होतें. हिमालयाप्रमाणे भासणाऱ्या गांधीजींच्या भव्य व्यक्तिमत्वाच्या तुलनेंत विनोबा म्हणजे एक ठेंगणीशी टेकडी देखील असूं शकतील किंवा नाही, याविषयीं त्या काळीं पुष्कळांना शंकाच वाटत होती. कुठे गांधीजींची भव्य गणेशमूर्ति आणि कुठे विनोबारूपी उंदिरमामा ?

पण हा 'उंदिरमामा' आता स्वतःच गणेशाप्रमाणे भारतभूमि पादाक्रांत करूं लागलेला पाहून सर्वांना, गांधीभक्तांना देखील, विस्मयाचा धक्का बसला आहे. कांही गांधीभक्त, विनोबांची गांधीजींशी कोणी तुलना करूं लागतांच, क्रोधाने लालबुंद होऊन जातात. मीराबेन व थलीकडे 'हरिजन'चे संपादक श्री देसाई, यांचे विनोबांबावतचे विचार पाहिले म्हणजे विभूतिपूजा व गुरुभक्ति मोठमोठ्या माणसांना देखील कशी विवेकशून्य व आंधळे बनवून टाकते, याची साक्ष पटते.

पांच वर्षांपूर्वी भारतांत देखील फारच थोड्यांना माहित असलेले विनोबा आज आंतरराष्ट्रीय कीर्तीची एक महान विभूति बनले आहेत. विनोबांच्या व्यक्तिमत्वाने आज राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय अशा एका विराट् शक्तीचें रूप धारण केलें आहे.

प्रश्न असा आहे की, ही किमया कशी घडून झाली ? विनोबांच्या शक्तीचें केंद्रस्थान कोणतें ?

पुष्कळ लोक म्हणतील की, गांधीजींचे आध्यात्मिक वारसदार म्हणूनच विनोबांना आज महत्त्व प्राप्त झालें आहे. पण विनोबांनाच कां ? गांधींचे आध्यात्मिक वारसदार होण्याच्या लायकीचीं अनेक माणसें देशभर पसरलीं आहेत. गांधीजींच्या आसपासहि विनोबांपेक्षा अधिक बुद्धिमान व प्रभावी मानलीं गेलेलीं माणसें अनेक होतीं. शिवाय आध्यात्मिक वारसदारी ही कांही कौटुंबिक मालमत्तेची वा राजसत्तेची वारसदारी नव्हे की, मूळ पुरुषाच्या मृत्यूनंतर कोणालाहि गादीवर बसवितांच त्याला मूळ पुरुषासारखाच मान मिळूं लागावा. आध्यात्मिक वारसदारीसाठी "पाहिजें जातीचे, येरा गबाळाचें काम नोहे" !

इतरांप्रमाणे मीहि विनोबांच्या शक्तीचें केंद्रस्थान कोणतें, याचा बराच विचार केला. माझ्या विचारांचा निष्कर्ष हा की, विनोबा म्हणजे ॐकार !

*

विनोबांची सारी शक्ति म्हणजे त्यांच्या ओंकारोपासनेची किमया होय. पुष्कळांना हें विधान चमत्कारिक व अतिरंजित वाटेल. पण माझ्या मतें तें अगदी यथार्थ आहे.

सन १९२३ सालीं विनोबा कोण होते ? कोणीच नव्हते. पण १९२३ सालीं त्यांनी 'महाराष्ट्रधर्म' मासिकांत "उपनिषदांचा अभ्यास" ह्या मथळ्याखाली चार लेख लिहिले आणि त्यांत फारच किरकोळ दुरुस्त्या करून ते लेख "उपनिषदांचा अभ्यास" याच नांवाने पुस्तकरूपाने सन १९४६ सालीं प्रसिद्ध झाले. हें पुस्तक जे वाचतील, याचें जे मनन करतील, आणि याचें जे वर्म ओळखूं शकतील, त्यांना 'विनोबा म्हणजे ॐकार' हें माझें विधान तात्काळ पटेल.

विनोबांची ओंकारोपासना म्हणजे एखाद्या भोळ्याबापड्या, अंधश्रद्ध व निर्बुद्ध कर्मठाची उपासना नव्हे. तींत ओंकाराला अंधश्रद्धेने वंदना करणाऱ्यांचा परंपरागत भाव जितका खच्चून भरला आहे तितकाच प्रगतिशील अशा वैज्ञानिक डोळसपणाचा सारासार विवेकहि ओतप्रोत भरला आहे. 'ॐ' या एकाक्षरी गूढ संकेतांत वेदोपनिषदांतील ब्रह्मविद्येचें सार कसें अंतर्भूत झालें आहे, हें ज्यांना जाणून घ्यावयाचें असेल त्यांनी 'उपनिषदांचा अभ्यास' हें पुस्तक वारंवार वाचावें, त्याचें शक्य तितकें मनन करावें आणि त्याचा आशय आपल्या अंतःकरणांत जितका साठवितां येईल तितका साठवावा. हें ज्यांना करतां येईल, त्यांना विनोबांची सारी शक्ति म्हणजे ओंकारोपासनेची किमया कशी आहे, याची साक्ष पटणें फारसें जड जाऊं नये.

*

सॅम्सनची शक्ति त्याच्या केशकलापांत होती केस कापले जातांच सॅम्सन शक्तिहीन झाला. पण विनोबांच्या शक्तीचें वर्म अशा वस्तूंत व अशा ठिकाणी

अनुक्रमणिका

केंद्रित झालें आहे की, त्यावर कसलाहि आघात करणें कोणालाहि, कदापिहि शक्य होणार नाही. 'ओम्' हा तीन मात्रांचा एकाक्षरी मंत्र ॐकाराच्या उच्चारांत सा?ेतीन मात्रांचा होतो. ओम=तीन मात्रा (अ+उ+म्) असें व्याकरणी समीकरण ॐकाराच्या उच्चारांत साडेतीन मात्रांचें कसें होतें ? अभावांतून जणूं प्रकट होणाऱ्या या अधिकच्या अर्धमात्रेंत ब्रह्मविद्येचें सारें गूढ कसें साठलें आहे, यावरील विनोबांचें भाष्य म्हणजे ऋतंभरा प्रज्ञेची एक भव्य भरारी आहे.

ओंकारांत विनोबा जितके रंगले आहेत, ॐकाराच्या उच्च रवांत ते जितके रमले आहेत, ॐकारांतील गूढतम अर्धमात्रेशीं ते जितके समरस झाले आहेत, तितके जीवनांत ते कशाशींहि समरस झालेले नाहीत गांधीजींच्या अभिनव सत्य-अहिंसेने त्यांना आरंभीं आकृष्ट केलें हें खरें. पण सत्य अहिंसेच्या या अभिनव आविष्काराचें मर्म संशोधून काढण्याच्या प्रयत्नानें त्यांना ॐकारापाशीं नेलें आणि ॐकाराचें दर्शन होतांच ते तेथेंच कायमचे रमले ! गांधीजींच्या माध्यमांतून सत्य-अहिंसेचे अभिनव प्रयोग जसे प्रकट झाले तसेंच विनोबांच्या माध्यमांतून ॐकारांतील विराट शक्तीचे आविष्कार आतां प्रकट होऊं लागले आहेत.

पुष्कळांना ही भाषा गूढगुंजनात्मक वाटेल. पण हें गूढगुंजन नसून तें एक यथार्थ दर्शन आहे; याची साक्ष पटविण्यास विनोबांचें 'उपनिषदांचा अभ्यास' हें एकच पुस्तक पुरेसें आहे. विनोबांचें हें छोट्या आकारांतील केवळ १६४ पानांचें पुस्तक म्हणजे 'उपनिषदांचें उपनिषद' होय. वेदोपनिषदांतील ब्रह्मविद्येचें सार इतक्या कमी शब्दांत आणि इतक्या प्रतिभाशाली व प्रभावी रीतीने प्रकट झाल्याचें उदाहरण अध्यात्म-वाङ्मयांत सापडणें दुष्कर आहे.

आणि म्हणून मी म्हणतों, विनोबा म्हणजे ॐकार आणि ॐकाराचा एक प्रतिभाशाली असा आधुनिक आविष्कार म्हणजे विनोबा.

गांधी आणि विनोबा

लक्ष्मीनारायण भारतीय, वर्धा

बापू आणि विनोबा यांच्यांत भिन्नत्व दर्शविणारीं मतें स्वार्थी क्षेत्राकरवीं कितीहि समोर आणलीं गेलीं, तरी आता हें सूर्यप्रकाशवत् स्पष्ट झालें आहे की गांधींचेंच कार्य विनोबा पुढे चालवीत आहेत आणि त्यांच्याच प्रमाणे क्रांतिकारी स्वरूपांत. कदाचित इतिहास फार पुढे जाऊन 'बापसे वेटा सवाई' असेंहि म्हणूं शकतील. पण आम्ही इतिहासकाराची भूमिका घेऊं इच्छित नाही. म्हणून साधी मान्यताच येथे स्पष्ट करतों की गांधींचें काम नि विनोबांचें काम एकसारखेंच कसें आहे.

गांधीजींनी जगाला 'सर्वोदय-मंत्र' दिला आणि त्याचें तंत्र म्हणून 'सत्याग्रह शास्त्र' अस्तित्वांत आणलें. थोडक्यांत गांधींच्या जीवनकार्याचें वर्णन हें असें होऊं शकतें. 'भूदानयज्ञ' या दोन मंत्र-तंत्राच्या चौकटींत बसतें की नाही हेंच आता आपणांस पहावयाचें आहे.

सर्वोदयाचें तत्त्वज्ञान थोडक्यांत हें की 'बहुजन सुखाय बहुजन हिताय' या बुद्ध तत्त्वज्ञानाला आत्मसात करून 'सर्वजनहिताय सर्वजनसुखाय'च्या स्वरूपांत जगापुढे तें मांडावें. याला बुद्धाच्या पुढचें एक पाऊल म्हणावयाचें असेल तरी त्याला हरकत नाही, पण बुद्धतत्त्वज्ञानाच्या खोलींत जर आपण शिरलों तर हेंच दिसून येईल की, 'बहुजना'मध्ये 'अल्पजनांचा विरोध' त्यांत गर्भित नाही. पण सर्वोदयानें हें निखालसपणें स्पष्टच सांगितलें व त्याचें स्वरूपहि विशद केलें.

सर्वोदयाच्या तत्त्वज्ञानाचें विवेचन करण्याची ही जागा नव्हे, किंवा सत्याग्रह शास्त्र चर्चिण्याची पण ही जागा नव्हे, परंतु 'सर्वोदय व सत्याग्रह म्हणजे काय येवढें येथे सांगणें अपरिहार्य आहे. सर्वोदयाला सर्वांचें, अगदी सर्वांचेंच हित साधायचें आहे हें खरें, पण त्यांत हिताची व्याख्या थोडी भिन्न आहे. श्रीमंतांचेंहि हित साधायचें व गरीबांचेंहि हित साधायचें हें खरें, पण गरीबांचें हित म्हणजे त्याची गरीबी दूर करून त्याला सर्व तऱ्हेनें उन्नत व कर्तव्य-परायण करणें हें जसें आहे, तसेंच श्रीमंतांचें हितहि त्याची श्रीमंती दूर करूनच त्याला गरीबाच्या बरोबरीनें आणण्यांतच आहे. 'बरोबरीनें' याचा अर्थ असा नव्हे की श्रीमंताला कंगाल करून सोडावयाचें! "माणूस" म्हणून दोघेहि सारखेच आहेत, परस्परांचें हित परस्परांचें गरीबी व श्रीमंती वाटून घेण्यांतच आहे, दोघांनाहि उच्च पातळीवर रहावयाचें आहे, येवढा सर्व अर्थ 'बरोबरीं'त सामावलेला आहे. 'सर्वेषाम् अविरोधेन' हें त्याचें मूल सूत्र.

आणि याच्या जोडीला सत्याग्रह-शास्त्र दिलें गेलें आहे. सर्वोदयाची साधना 'तटस्थ सज्जनते' द्वारें होऊं शकत नाही. तटस्थ सज्जनता ही कित्येक वेळां दुर्जनतेची पोषकच ठरते. आम्ही अन्याय न करणें, अन्यायांत सामिल न होणें हें जरी सौजन्य असलें तरी त्यामुळे अन्यायाचा प्रतिकार होत नाही. हा प्रतिकार जर नसला तर ती सज्जनता नपुंसकच ठरेल. म्हणून सत्याग्रह शास्त्रानें "अन्यायाचा प्रतिकार सत्यानें व प्रेमानें" करावयाचें शिकविलें. या सत्याग्रहाचीच परिणति सर्वोदयांत होईल. मग दुर्जनाची दुर्जनता लयाला जाऊन त्याच्यांतला 'माणूस'च काय तो शिल्लक राहील. "आत्मौपम्य-भावना" दोघांच्या अशा मीलनानें मूर्त रूप धारण करील. हीच ती परिणति.

भूदानयज्ञ भूमी-प्रश्नाच्या निराकरणाचाच प्रयत्न नसून तो सर्वोदयाचाच साधक-मंत्र बनला आहे. भूदानाचें तत्त्वज्ञान सर्वोदयाच्या मार्गातल्या अडगळी दूर करण्याचें साधन बनलें आहे. सर्वोदयाला "शोषण, शासन" वगैरे वर्ज्य आहेत. पण नुसतें वर्ज्य असून उपयोग नसतो. त्यासाठी परिस्थिति उत्पन्न करावी लागते. शोषण बंद करावयाचें असेल तर 'वैयक्तिक मालकी'चें शास्त्र पार मोडावेंसेंच लागेल व भूदान

सर्वप्रथम हीच गोष्ट अमलांत आणण्याचें साधन बनत आहे. आज जमिनीच्या वैयक्तिक मालकीच्या भावनेला भूदानानें सुरुंग लावला असून जमीनी प्रेमानें वाटण्याची किमया प्रत्यक्ष करून दाखवली आहे. यानंतर, 'शोषण-मूळ' काढून फेकल्यानंतर, ग्रामोद्योगाद्वारें शासन-बद्धतेंतून मुक्त होण्याचें काम भूदानाला करावयाचें आहे व तें यापुढील काळांत होणार आहे. "जमीन सर्व समाजाची," हें ध्येय व्यापक स्वरूपांत ओरिसा येथे प्रत्यक्षांत आलेलें दिसलें. 'भूमि क्रांति' तेथें झाली. आता याच बळाच्या आधारें पुढील कांही वर्षांत शासनतंत्रांतून मुक्त व्हायचें आहे. म्हणजे 'माणूस' शोषण व शासन-मुक्त होणार असून दंडशक्तीने नियंत्रित होण्याऐवजी आंतरिक अनुशासनानें नियंत्रित होणार आहे. अर्थातच याला वेळ लागेल. अजून शोषण मिटविण्याची प्रक्रिया पूर्ण व्हायची आहे. कांही वर्षांत ती पूर्ण झाली की शासन-मुक्तीची प्रक्रिया सुरू होणार. आज जी 'राज्यसापेक्षता' उत्पन्न झाली आहे, ती भूदान-प्रक्रियेच्या विकासामुळे कमी कमी होत नष्ट होणारच. अशा प्रकारें सर्वोदयाचा मार्गच भूदानामुळे प्रशस्त झाला आहे. याच्या जोडीला 'शुद्ध विचार,' 'शुद्ध ज्ञान-प्रचार' आणि 'स्वतप' मदतीला घेऊन सत्याग्रह-शास्त्रहि विकसनशील बनत चाललें आहे व सर्वोदयाचा मंत्र सिद्ध करण्याजोगी परिस्थिति उत्पन्न करीत आहे. सत्याग्रहाच्या 'निषेध' स्वरूपाची पुढची पायरी 'विधायक' आहे व तीच भूदानाचें प्रत्यक्ष बळ आहे. याच विधायक स्वरूपाचा आविष्कार भूदान-तत्त्वप्रणालींतून होत असून सत्याग्रहाचें संपूर्ण दर्शन अस्तित्वांत येत चाललें आहे.

